# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक १८.०९.२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्व सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिं.१८/०९/२०१० रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.४५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा. आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
३. स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४. स.स.श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.राजगौरव हरिदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
११. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१२. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
२३. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

२४. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२५. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२७. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२८. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२९. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
३०. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
३१. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
३२. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
३३. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
३४. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
३५. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३६. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३७. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३८. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३९. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
४०. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
४१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
४२. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
४३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
४४. स.स.श्री.अफसर खान यासीन खान
४५. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
४६. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४७. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्नीसा खाजा
५०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
५१. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५२. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
५३. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटू कुरेशी
५४. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
५५. स.स.श्री.खान आगा मिया
५६. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान

५७. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५८. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५९. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
६०. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
६१. स.स.श्रीमती काथार रेखा कैलास
६२. स.स.केनेकर संजय किसनराव
६३. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
६४. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६५. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
६६. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
६७. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६८. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६९. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
७०. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
७१. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
७२. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
७३. स.स.दिग्विजय संभाजी शेरखाने
७४. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७५. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७७. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७८. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
७९. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
८०. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
८१. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८२. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८३. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८४. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८५. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
८६. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

श्री.गिरजाराम हळनोर :जालना येथे दुर्देवी अपघातात स्व.उदयजी दंताळे व प्रभाकरजी काळे सिने कलाकार यांचे निधन झाले त्यांचे जाण्याने हे शहर दोन चांगल्या कलाकारांना मुकले आहे.त्यांना सभागृहाच्या वतीने

श्रध्दांजली अर्पण करावी व तसा संदेश त्यांचे नातेवाइ्कांना कळविण्यात यावा

श्री.संजय जोशी :स्व.उदय दंताळे हे मराठवाडयातील पहिले रेकॉर्डीस्ट होते त्यामूळे मराठवाडयाची मोठी हानी झाली जो प्रस्ताव मांडला यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ०२ मिनिटे उभे रहावे.

स्व.उदयजी दंताळे व प्रभाकरजी काळे यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण केली.

मा.महापौर :विषयपत्रिकेला सुरूवात होत आहे.

श्री.संजय जोशी :दिनांक१२-८-२०१० रोजी पत्र देवून अग्निशमन विभागाकडे विचारणा केली की या शहरात १५ मीटर पेक्षा उंच इमारती किती अशा इमारतीला आग लागल्यास महापालिकेकडे काय व्यवस्था आहे. व्यवस्था नसल्याचे.उंच शिडी वगैरे घ्याव्या लागणार असे उत्तर मिळाले.जसे सन २०३५ या वर्षापर्यत होणा-या लोकसंख्येला पाणीपुरेल या दृष्टीने समांतर लाईन करीत आहोत त्याच प्रमाणे अग्निशमन विभागाच्या बाबतीत श्री.रंगदळ यांनी युनोत भारताचे डिझास्टर मॅनेजमेंन्टचे नेतृत्व केले होते.अशा तज्ञ व्यक्तीला आमंत्रित करून शासनाला विनंती करून त्यांचेकडून शहरातील १५ मीटर पेक्षा जास्त किंवा अशा इमारतीच्या ४ थ्या १० व्या मजल्यावर आग लागल्यास १५ मीटर वरील व्यक्तीला खाली कसे आणायचे यासाठी काय साहित्य लागेल त्यांचेकडून शहराचा सर्वे करून माहिती घ्यावी.जे आवश्यक साहित्य आहे ते नियमानुसार टेंडर वगैरे काढून खरेदी करावे हे करीत असतांना तज्ञ व्यक्ती जे आहे त्यांचे सजेशन घ्यावे.

मा.महापौर :स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी आताच जो मुद्दा मांडला युनो मध्ये ज्यांनी डिझास्टर मॅनेजमेंन्टचे प्रतिनिधीत्व केले असे श्री्.रंगदळ यांना बोलावून अग्निशमन दलाचे काय काय साहित्य पाहिजे कोणत्या स्पेशिफिकेशनमध्ये पाहिजे हे ठरवावे तदनंतरच खरेदी करावे.

सौ.रेखा जैस्वाल :दिलेल्या वेळेनुसार सभेचे कामकाज सुरू व्हावे सर्वांचा वेळ वाया जातो.

मा.महापौर :याचा निश्चितच विचार केला जाईल.महत्वाच्या विषयावर बैठकीत चर्चा चालू होती त्यामूळे उशीर झाला.वेळेवर बैठक सुरू करण्याचा प्रयत्न राहिल.

श्री.गिरजाराम हळनोर :विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक ९९ अगोदर घेण्यात यावा. चर्चा नंतर घ्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :निवडणुका होवून ६ महिणे झाले विकास कामे होत नाही.अर्थसंपकल्पास केंव्हा मंजूरी देणार आहे ते मंजूर होत नाही तोपर्यत विकास कामे होणार की नाही.याचा खुलासा व्हावा सभागृहात कोणत्या विषयावर बोलावे प्रश्न पडतो नुसती चर्चा करायची व निर्णयाची अमलबजावणी होत नाही.अर्थसंकल्प मंजूरीस न येण्याचे

कारण काय विषय घेवून मंजूर करून कोणतीच कामे होणार नसेल तर योग्य नाही.वार्ड कार्यालयाशी संपर्क केला असता अधिकारी कर्मचारी वसुलीला गेले असे सांगितले जाते.किती वसुली होते कुठे होते या बाबत माहिती मिळत नाही. वसुलीसाठी स्वतंत्र विभाग असून कर्मचारी आहे असे असतांना इतर विभागाचे कर्मचारी वसुलीसाठी देण्याचे कारण काय ?आज मितीला पाण्याचा ड्रेनेजचा व इतर विकास कामे जे जनतेच्या निगडीत आहे अशी १.५ ते २ लक्षच्या खर्चाची कामे होत नाही.संत ज्ञानेश्वर कॉलनी मुकूंदवाडी बाजूच्या वार्डात ३.४१ लक्षचे पाणी पुरवठयाचे कामास मा.आयुक्तांची मंजूरी दिली लेखा विभागात विचारणा केली असता त्यावर ठप्पा मारल्यानंतर वरीष्ठाची सही झाल्यास काम सुरू होईल असे सांगितले जाते.कार्य.अभियंता सांगतात काम सुरू खालचे अधिकारी सांगतात ठप्पा पडत नाही लेखा विभागात बजेट नसल्याचे सांगितले जाते अशा पध्दतीने कामकाज होत असेल तर योग्य नाही.विकास कामे होणार की नाही माहिती दयावी सर्वांत हा विषय महत्वाचा वाटतो व त्यावर चर्चा व्हावी.

श्री.गिरजाराम हळनोर :स.सदस्यांनी मांडलेला मुद्दा गांर्भीर्याने घ्यावा.अदयाप बजेट नाही जे विषय अर्थसंकल्पात यायला पाहिजे ते विषयपत्रिकेवर आलेले आहे.विकास कामे होणार की नाही प्रश्नचिंन्ह निर्माण झाले अर्थसंकल्प केंव्हा सादर होणार खुलासा घ्यावा.

मा.महापौर :अर्थसंल्पातील विषय आजच्या विषयपत्रिकेवर आलेले आहे ते यापूढे येवू नये मा.सभापती अर्थसंकल्प सादर करणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.सभापती बजेट सादर करणार असे बोलून विषय संपत असेल एवढयावर संपणार का.बजेट केंव्हा सादर करणार हा खुलासा अपेक्षीत आहे.

श्री.मीर हीदायत अली :शहरात पॅचवर्कचे काम चालू आहे चांगली बाब आहे.एक वर्षापूर्वी १८ कोटीची रस्त्याची विकास कामे केली.ती कोणत्या रस्त्याची कामे केली

श्री.त्र्यंबक तुपे :बजेट सादर करणे हा विषय मा.सभापती यांचेकडे आहे. विषयपत्रिकेवर अनेक विकासाच्या कामा संबधी प्रस्ताव आहे यापूर्वीही प्रस्ताव सभेत होते.सभेत प्रस्ताव देवून तरतूद करावी की बजेट मध्ये करावी या बाबतीत स.सदस्य गोधळांत पडले आहे.

मा.महापौर :अशा प्रकारचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत यापूढे येउ नये प्रस्तावाच्या संदर्भात त्या त्या स.सदस्यांनी वैयक्तिक पत्र माझेकडे आणून दयावे

श्री.त्र्यंबक तुपे :यापूर्वी प्रस्ताव मंजूर झाले ते विषय थांबवू शकतो का त्या बाबतीत तरतुदीचे नियोजन करावे लागणार आहे बजेट मध्ये तरतूद असेल तरच प्रशासन मान्यता देईल. तरतूद नसेल तर कामे होणार नाही.लवकरात लवकर बजेट सादर करण्यास मा.सभापती यांना विनंती करतो.

श्री.गजानन बारवाल :बजेट लवकरच सादर करणार असे म्हटले.या विषयी चर्चा करून बैठक घेण्यात यावी. अनेक विकास कामे थांबलेली आहे.शहरातील अनेक रस्त्याची कामे चांगल्या प्रकारे झाली पॅचवर्कची कामे झाली मा.मंत्रीमहोदय आले त्या निमित्ताने रस्त्याची कामे करण्याचा प्रयत्न

झाला अभिमानाची बाब आहे मा.आयुक्तांचे व त्यांचे टिमचे अभिनंदन करतो. बजेट लवकर सादर करण्याचे मा.सभापतीकडे मागणी करावी.

श्री.मुजीब खान :बजेट मंजूर होणे व त्यानुसार विकास कामे करावी ही सभागृहाची भावना आहे. ३ महिण्याच्या खर्चासाठी लेखाअनुदानास मंजूरी दिली होती त्यानंतरही अनेक विकास कामे होत आहे.त्या खर्चाची मंजूरी घेणेसाठी स्थायी समिती व सर्वसाधारण सभेपूढे आले नाही असे असतांना सदर कामे कोणत्या नियमाने व कशाच्या अधारे होत आहे सभागृहाची मंजुरी न घेता ती करता येतात का ,खुलासा करण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे:विषयपत्रिका घेणेपूर्वी स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करणे गरजेचे आहे होत असलेली विकास कामे कुठे व व सभागृहाची मान्यता नसतांना कोणत्या नियमाने होत आहे कोणत्या वार्डात कामे झाली आहे माहिती दयावी.

मा.महापौर :प्रशासनाने या बाबत खुलासा करावा.

श्री.मुजीब खान : ३ महिण्याच्या लेखा अनुदान खर्चा नंतर पुढील खर्चास प्रशासन कशाच्या अधारे मान्यता देत आहे स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेत मंजूरी दिली नाही मा.आयुक्त किंवा उपआयुक्त यांनी खुलासा करावा.सभागृहाच्या मानसन्मानाचा विषय आहे

मा.महापौर :स्थायी समितीने बजेट मंजूर केल्यानंतर विकास कामास मंजूरी मिळतेच मुख्यलेखाधिकारी खुलासा करतील.

श्री.मुजीब खान :जमा-खर्चाचा हिशोब विचारत नाही मुख्यलेखाधिकारी यांचेकडून खुलासा अपेक्षीत नाही मा.आयुक्तांनी खुलासा करावा..

मुख्यलेखधिकारी :३१ जुलै २०१० पर्यत ४ महिण्यासाठी लेखाअनुदान मंजूर केलेले होते.ही मुदत संपण्यापूर्वी प्रशासनाने स्थायी समितीसमोर अर्थसंकल्प सादर केलेला आहे स्थायी समितीने अर्थसंकल्प मंजूर केला सर्वसाधारण सभा मान्यता देत नाही तोपर्यत स्थायी समितीने मंजूर केलेला अर्थसंकल्प नुसार कामे व खर्च करता येतो.

श्री.मुजीब खान : प्रशासन दिशाभूल करीत आहे. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर बजेटला सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते.मान्यता न घेता प्रशासन कोणत्या नियमानुसार खर्चास मंजूरी देत आहे याचा खुलासा अपेक्षीत आहे.प्रशासन मनमानी करीत आहे सभागृहाची मान्यता घेत नसेल तर हे सभागृह व ही सभा कशासाठी घेत आहोत. पुर्ण जबाबदारी प्रशासनाकडे सभागृह देण्यास तयार आहे परंतु चोख माहिती प्रशासनाकडून सभागृहासमोर येणे आवश्यक आहे.माहिती दिली जात नसेल व विकास कामे परस्पर होत असेल तर सभागृहाला प्रशासन काहीही महत्व देत नाही असा अर्थ निघतो.ही पध्दत योग्य नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे स्थायी समितीची बजेटला मान्यता झाली त्यानुसार विकास कामे सुरू केली असे म्हणणे असेल तर स.सदस्यांनी एखादया कामाची मागणी केली तर कार्य.अभियंता ,क.अभियंता मा.आयुक्ताची मान्यता होते परंतु लेखा विभाग मान्यता देत नाही.सभेची खर्चास मान्यता नसतांना

कामे होतात तर वरीष्ठाची मंजुरी झाल्यास लेखा विभाग मान्यता देत नाही नियमात काय तरतूद आहे खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी :प्रशासनाने अर्थसंकल्प स्थायी समितीकडे सादर केला स्थायी समितीने त्यास मंजूरी दिली सर्वसाधारण सभेत ठेवण्यासाठी अर्थसंकल्प तयार आहे.तत्पुर्वी मा.सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्प मंजूर होत नाही तोपर्यत मा.स्थायी समितीने मंजुर केलेला अर्थसंकल्पानुसार कामे व त्यावरील खर्च करता येतो.ज्या ज्या कामाचे अंदाजपत्रक लेखा विभागाकडे आलेले असतील त्या बाबत कार्यवाही केली आहे. कुठलेही काम थांबविलेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :संत ज्ञानेश्वर कॉलनी मुकूंदवाडीच्या बाजूच्या वार्डातील पाणी पुरवठा संबधीत कामाची सचिंका लेखा विभागात २ महिण्यापासून आहे त्यावर कार्य. अभियंता जे.ई तसेच मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली परंतु लेखा विभागात मंजूरी होत नाही पाण्याचा प्रश्न आहे अधिकृत भाग आहे १०० टक्के टॅक्स भरणा केलेला आहे.असे असतांना सदर काम बजेट होत नाही तोपर्यत केले जाणार नाही असे लेखा विभागातून सांगण्यात आले.तरतूद असतांना काम होत नाही तेथील कर्मचारी अधिका-यांचे ऐकत नसावे एक संचिकेचे उदा. दिले अशा किती संचिका लेखा विभागात आहे.सविस्तर माहिती दयावी.

मुख्यलेखाधिकारी :सदर संचिका लेखा विभागात असेल तर तपासून घेतले जाईल.

श्री.मीर हीदायत अली : पॅचवर्क व इतर कामे होत आहे चांगली बाब आहे ड्रेनेज व पाणीपुरवठया संबधीची कामे अत्यावश्यक असतात ती कामे डायरेक्ट देणे सयुक्तीक वाटते परंतु डांबरीकरणाची १.५० कोटीची कामे डायरेक्ट निविदा न मागविता दिली जाते हे योग्य नाही यात महापालिकेचे २०-२५ लक्षचे नुकसान झाले मंत्रीमहोदय येणार म्हणून पॅचवर्कचे काम केले पावसाळा किती दिवस असतो याचा विचार करून यापूर्वीच नियोजन करून अंदाजपत्रक तयार करणे तीन दिवसाची अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करणे प्रशासनाचे काम होते डायरेक्ट काम देवू शकतो का जे नुकसान झाले त्यास जबाबदार कोण याचा खुलासा घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : सिटीचौकापासून हर्षनगरकडे जाणा-या रस्त्यावरील पुलावर मोठा खडडा पडला होता तेथे मा.आयुक्त याचेसह,मा.महापौर,यांनी प्रत्यक्ष पाहणी केली काम करण्याचे आदेशील केले परंतु अदयाप कार्यवाही झाली नाही. कलम ६७ (३) (क) व ५ (२) (२) वापरावे.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

श्री.मीर हीदायत अली :मागिल वर्षी १८ कोटीची जेथे कामे केली त्याच ठिकाणी पॅचवर्कची कामेकेली का खुलासा करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : आवश्यक नसलेले ५-२-२ नुसार पेव्हर ब्लॉकची कामे होतात जो रस्ता खराब आहे रहदारी आहे ,पाण्याच्या लाईन मध्ये गटारीचे पाणी जाते लाईन खराब असते ते दुरूस्त करण्यासाठी ५-२-२ चा वापर होत नाही एक दुस-या विभागाचा ताळमेळ नाही.सदर ठिकाणी व्हिजीट दिली असतांनाही काम का झाले नाही.स.सदस्यांनी तसे पत्र ही दिले मा.आयुक्तांची या संदर्भात भेट घेतली एक कामासाठी

स.सदस्यांना चकरा माराव्या लागत असेल तर महापालिकेचे दुर्देव आहे

शहर अभियंता :रोहिला गल्ली येथील तुटलेच्या ब्रिजच्या कामाचे अंदाजपत्रक करून ३-४ महिणे झाले ४०-४५ लक्षचे काम आहे.या कामासाठी ४ वेळेस निविदा काढल्या एकाही गुत्तेदाराने यास प्रतिसाद दिला नाही.तेथे आरसीसी ब्रिज करण्याचे काम होते. शेवटी असा विचार केला की तात्पुरते तेथे १२०० डायमीटरची पाईप लाईन टाकून तेथील रस्ता ४-८ दिवसात वाहतूकीस खुला केला जाईल.

श्री.रऊफ खान :माझे वार्डातील पुलावरील रस्ता तसेच काळादरजावा मार्गे असलेला असे दोन्ही रस्ते बंद आहे.

शहर अभियंता :या पुलाच्या कामासाठी चार वेळेस निविदा काढल्या रिस्पॉन्स मिळाला नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :या कामासाठी निविदा काढल्या,कोणीही भरल्या नाही डीएसआर कोणते ,अटी शर्ती काय होत्या प्रोव्हीजन कशी केली होती पुर्वीचे डीएसआर होते का सर्व माहिती दयावी.

शहर अभियंता :रेग्यूलर ए-१ टेंडर असते त्याप्रमाणे निविदा काढलेल्या होत्या. चालू डीएसआर नुसार पुन्हा टेंडर रिवाईज केले पुर्वी ३० लक्षचे होते आता ४५ पर्यंत झाले न येण्याचे कारण सांगता येणार नाही.

मा.उपमहापौर :मागिल वर्षातील किती डांबरीकरणाची व पेव्हर ब्लॉकची बिलो मध्ये असलेली कामे प्रलंबीत आहे खुलासा करण्यात यावा.

श्री.मीर हीदायत अली :मागिल वर्षी १८ कोटीची डांबरीकरणाची कामे झाली पुन्हा १.५० कोटीची कामे डायरेक्ट विना टेंडर का दिली यात २०-२५ लक्षचे नुकसान झाले यास जबाबदार कोण ३ दिवस अल्प मुदतीची निविदा का काढली नाही.ड्रेनेज, पाणीपुरवठया सबधीची कामे डायरेक्ट देणे ठिक आहे असे असले तरी ५ लक्षच्या वर डायरेक्ट काम देता येत नाही त्यापेक्षा जास्त रक्कमेची कामे डायरेक्ट देवून काम करून घेतले जाते हे अत्यंत चुकीचे आहे.

शहर अभियंता :जी पॅचवर्क व डांबरीकरणाची कामे शहरात चालू आहे त्या संबधीच्या निविदा पावसाळया पूर्वी काढलेल्या होत्या

श्री.रऊफ खान :माझे वार्डातील पुलाचे काम केंव्हा सुरू करणार आहे.दोन्ही रहदारीचे रस्ते आहे नागरीकांना जा-ये करण्यास रस्ता नाही.

शहर अभियंता :रोहिला गल्ली येथील रस्त्याचे काम सुरू करण्या अगोदर पर्यायी रस्ता शोधून तातडीने काम सुरू केले जाईल.उपअभियंता यांना २ दिवसापूर्वी तसे आदेशीत केले आहे.या कामासाठी निविदा काढल्या होत्या प्रतिसाद न मिळाल्यामूळे उशीर झाला.

श्री.संजय जोशी : ठेकेदार काम दयावे म्हणून मागणी करत असत आता चार वेळेस निविदा काढून ठेकेदार पूढे येत नाही याची कारणे प्रशासनाने शोधली पाहिजे.

श्री.मीर हीदायत अली :डांबरीकरणाची कामे १५-२० टक्के बिलोने जातात

श्री.त्र्यंबक तुपे :या वर्षी पावसाळा जास्त होता गणपती उत्सव, व रमजान ईद हे दोन्ही सण एकत्र आले रस्त्यावरील पॅचवर्क तरी करावे अशी सर्व सदस्यांची मागणी होती त्यानुसार प्रशासनाने काम हाती घेतले निविदा

काढल्या की नाही अबाऊ/ कि बिलो हा वेगळा प्रश्न आहे.गुंठेवारी भागात खडडे तेथे साचलेले पाणी हे लोकांना फार त्रासदायक ठरते.प्रशासनाने काही कामे केली होणेही आवश्यक होते. वारंवार आम्हीच सांगत होतो.

श्री.आनंद घोडेले : लिकिजेस लाईन व देखभाल दुरूस्तीचे रेटलिस्टचे काम करण्यास ठेकेदार तयार नाही सार्वजनिक बांधकाम ,पाटबंधारे,एमआयडीसी विभागात एकाच कामासाठी ५०-६० ठेकेदार काम करण्यास पूढे येतात वार्ड अभियंता यांनी सुचना दिल्या तरी देखभाल दुरूस्तीची कामे होत असत.ती परीस्थिती राहिली नाही.भाववाढ होवून ही रेटलिस्टचे ३००० रक्कमेचे काम असते यात दुरूस्ती करावी.

श्री.मुजीब खान :ठेकेदारांची बिले देणे बाकी असल्याने मागिल बिले अदा करणार नाही तोपर्यत काम करण्यास कोणीही पूढे येणार नाही.निविदा अशा प्रकारे परत जातील ठेकेदाराच्या बिलापोटी किती रक्क्म देणे बाकी आहे माहिती देण्यात यावी.

सौ.किर्ती शिंदे :अनेक नागरीकांच्या घरात पावसाचे पाणी गेले अधिका-यांनी अनेक ठिकाणी पाहणी केली अतिवृष्टीच्या काळात वित्तहाणी जिवत हाणी होते अशा वेळी काय तरतूद केली जाते

श्री.नासेर खान :आताच म्हटले की स्थायी समितीने बजेट मंजूर केल्यानूसार विकास कामे होत आहे. सदर कामे कोणत्या भागात व कोठे व किती रक्कमेची कामे केली याची माहिती दयावी अनेक सदस्यांनी कामे होत नसल्याचा आरोप केला सर्वसामान्य नागरीकासाठी ५० रू चे काम होत नाही परंतु पैठणगेट जवळ एका पार्कीगच्या जागेवर २०-२५ लक्ष खर्चाचे पेव्हर ब्लॉकचे काम होत आहे ते कुणाच्या परवानगी चालू आहे काही ठिकाणी पॅचवर्कचे काम होत आहे ते करणे जरूरी आहे विषयपत्रिका घेता येईल परंतु स.सदस्य जे प्रश्न मांडतात तेही समजून घ्यावे. ४०-५० लक्ष १-१ कोटीची मोठया रक्कमेची कामे होता कामे होतात परंतु ५-१० हजार रक्कमेची वार्डातील कामे का होत नाही खुलासा करावा. माझ्या वार्डात १०-१२ लक्षचे नाल्याचे काम असून अनेक वेळा मुद्या मांडला काम त्वरीत करावे सभागृहाने आदेशीत केले ३ महिने झाले अदयाप काम सुरू केले नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा यानंतर विषय पत्रिका घेतली जाईल.

श्री.नासेरखान :विषयपत्रिका मंजूर करावी त्यापूर्वी सदस्यांचे प्रश्न समजावून घेवून खुलासा घेण्यात यावा सभागृहाची मानमर्यादा राहिलेली नाही.परवाच सकाळ पेपरमध्ये पीरबाजार येथील स्वीमींग पूल ३० वर्षासाठी बीओटीवर देणार असल्याचे आले अगोदर पेपरला येते नंतर ठराव येतो मंजूरी होते रजिस्ट्री करून सर्वच बीओटीवर दिले जाते हे योग्य नाही.

श्री.गिरजाराम हळनोर : बीओटीसाठी समिती आहे समिती समोर तो विषय आलेला होता सर्व अभ्यास करूनच कार्यवाही करावी.

श्री.नासेर खॉन :बीओटीसाठी समिती आहे माहित आहे बीओटीचे कामे होतात इतर विकासाची कामे का होत नाही.

शहर अभियंता :पैठणगेट पार्कीगमध्ये मोठया प्रमाणात कचरा साचलेला होता पाणी साचून चिखल झाला ,दुर्गंधी येत होती त्यापासून प्रादुर्भाव होवून रोगराई होवू नये त्यामूळे तातडीने पेव्हर ब्लॉकचे काम हाती घेतले त्याशिवाय पर्याय नव्हता.

श्री.नासेरखॉन ठेकेदार काम करीत नाही हे काम कसे होत आहे.सिल्लेखाना ते सावरकर चौक तसेच कोटला कॉलनी पाण्याची टाकीच्या बाजूला मोठया प्रमाणात कचरा साचलेला दिसून येतो ते उचलण्याचे काम का होत नाही. जे पेव्हर ब्लॉकचे काम होत आहे ते चुकीचे आहे सभागृहाला चुकीची माहिती दिली जाते.

मा.महापौर :आता विषयपत्रिकेला सुरूवात होत आहे.

श्री.नासेरखॉन :जो खुलासा झालेला आहे तो बरोबर नाही यास माझा विरोध आहे इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी.

श्री.गिरजाराम हळनोर :विषय क्र. ९९ अगोदर घेण्यात यावा.

यावेळी डायस समोर अनेक स.सभासद एकाचवेळी बोलत असतात.

श्री.राजू शिंदे : विषय क्र. ९० पासून सुरूवात करावी.

मा.महापौर :सर्व स.सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे विषय क्र. ९० पासून घेण्यात येईल.

**विषय क्र. ९०:-** :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामध्ये सन २००९-१० मध्ये आंतर जिल्हा बदलीने ८ शिक्षकांना मनपा सेवेत घेण्यात आले आहे.

| अ.क्र. | शिक्षकांचे नांव | सध्या कार्यरत शाळेचे नांव | पुर्वीचा जिल्हा | वेतन श्रेणी | संवर्ग | पती अथवा पत्नी कार्यरत संस्थेचे नांव | मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | उर्मिला भास्कर भालेराव | पदमपुरा | जालना | ५२००-२०२०० | खुला | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे त्यांचे पती कार्यरत आहेत. | ०७.०८.२००९ |
| ०२ | सय्यदा अर्शिया तस्नीम | नु.मा.शा. ज्युबलीपार्क | बृहन्मुंबई | ५२००-२०२०० | इ.मा.व. | औरंगाबाद येथे प्राध्यपक म्हणून त्यांचे पती कार्यरत आहेत. | १६.०२.२०१० |
| ०३ | श्रीमती उर्मिला दर्बेसवार | उस्मानपुरा | परतुर, जि.जालना | ५२००-२०२००/- | अनुसुचित जमाती | एकतर्फि बदली | २९.०३.२०१० |
| ०४ | तेजस्विनी धनंजय देसले | नु.मा.शा. ज्युबलीपार्क | उस्मानाबाद | ५२००-२०२००/- | इ.मा.व. | पती ऑरचिफ केमीकल ॲन्ड फार्म वाळुज येथे् कार्यरत आहेत. | ३१.०८.२००९ |
| ०५ | श्री.कैलास ओमप्रकाश बुर्कुल | पडेगांव | वैजापुर | ५२००-२०२००/- | खुला | एकतर्फि बदली | २५.०२.२०१० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | काळुसे प्रमोद संपतराव | बेगमपुरा | कडेढाण पैठण | ५७५०/- | इ.मा.व. | एकतर्फि बदली | ०५.०१.२०१० |
| ०७ | कु.प्रणिता मधुकर खंदाडे | एकनाथ नगर | बुलढाणा | ८५६०/- | इ.मा.व. | इंडोरेन्स सिस्टीम इंडिया लिमिटेड औरंगाबाद येथे त्यांचे पती कार्यरत आहेत. | २२.०२.२०१० |
| ०८ | श्रीमती एस.डी.थोरात | उस्मानपुरा मुलीची | नांदेडा गंगापुर | ५२००-२०२००/- | इ.मा.व. | टाईयो लुसीड प्रा.लि. औरंगाबाद येथे त्यांचे पती कार्यरत आहेत. | ११.१२.२००९ |

करीता वरील प्रमाणे या ८ शिक्षकांचे जिल्हा बदलीचे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.त्र्यंबक तुपे :प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव यात आठ शिक्षकांना महापालिका सेवेत सामावून घेतले कर्मचारी एकत्रिकरणाचा महापालिकेचा नियम काय कोणत्या नियमाने एकत्रिकरण केले जाते.व या शिक्षकांना कोणत्या नियमाने समावेश करून घेतले.महापालिकेचे नियम काय आहेत खुलासा करावा.

श्री.गजानन बारवाल :पती-पत्नी एकत्रिकरण यात शिक्षक घ्यायचे असेल, खाजगी कंपनीत सेवेत असेल तर त्यांना लागू होते का ?

श्री.मुजीब खान :१९९२ मध्ये याच सभागृहात दोन शिक्षकांना येथे सामावून घेणे बाबत मी बोललो होतो परंतु घेता येत नाही असे मला पत्र दिले होते.परत केले होते.आज या शिक्षकांना कोणत्या आधारावर कोणत्या नियमानुसार व का समावेश करून घेतले १९९२ निर्णय झालेला आहे का घेण्यात आले खुलासा घ्यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :निमशासकीय सेवेतील शिक्षकांना सेवेत समावेश करून घेता येते का ?

श्री.प्रमोद राठोड :या प्रस्तावात एका ठिकाणी त्यांचे पती केमिकल कंपनीत कार्यरत असल्याचे म्हटले आहे.शासकीय सेवेतील पती-पत्नी एकत्रिकरणाचा हा जीआर आहे निमशासकीय सेवेसाठीचा हा जीआर आहे.एखादया पती-पत्नीला बदली करून घ्यायची असेल व तेथे एका खाजगी ठिकाणी काम करेल व बदली करण्यासाठी अशा प्रकारचे प्रस्ताव सादर करतील असा नियम आहेत का? खाजगी ठिकाणी काम करणा-या कर्मचा-याची पत्नीची बदलीने त्या ठिकाणी समावेश करून घेता येते का ?

डॉ.खान नुझत तरन्नुम:आठ शिक्षकांना बदलीने येथे समायोजन करून घेतले त्यांना वेतनश्रेणी ५२००-२०२०० या नुसार पगार दिला जातो. नवीन शिक्षक सेवक भरती केल्यास त्यांना ३ वर्षासाठी ३०००रू दरमहा वेतन दिले जाते. नवीन शिक्षक नियुक्त केल्यास महापालिकेचा खर्च कमी होईल या शिक्षकांचा समावेश करून खर्च का वाढवित आहेत.नविन शिक्षक भरावेत.

श्री.प्रमोद राठोड :आता पर्यत पती-पत्नी एकत्रिकरण या नुसार अशा किती कर्मचा-यांनी महापालिकेकडे अर्ज केलेले आहे त्या सर्वांचा प्रस्ताव ठेवलेला आहे काय ?

श्री.गिरजाराम हळनोर:पती -पत्नी एकत्रिकरणाचा नियम काय आहे खुलासा घ्यावा.

उपआयुक्त(प्र.) :दिंनांक १८-१-१९९९ च्या सर्वसाधारण सभेत एक ठराव मंजूर केला की औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर विविध विभागात कार्यरत असलेल्या काही कर्मचा-यांच्या पती अथवा पत्नी बालवाडी शिक्षीका अथवा अन्य पदावर कार्यरत आहे.त्या कर्मचा-यांनी शासनाचे पती-पत्नी एकत्रिकरण या धोरणा अधारे सेवा महापालिकेकडे वर्ग करण्याची मागणी राज्य शासनाने वेळोवेळी नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार जे शासन निर्णय ५ आहे ते येथे नमूद केले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :महापालिकेचा ठराव झालेला आहे की शासन निर्णय आहे.तो खुलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : शासन निर्णय झालेला आहे त्यामध्ये अपेक्षीत असे की,पती-पत्नी इतर खात्यामध्ये नोकरीला असतील व त्यांचे पैकी एकजण महापालिकेच्या सेवेत असेल हा शासन निर्णय आहे.

श्री.मुजीब खान :जो खुलासा केला दिशाभूल करीत आहे.१९९२ मध्ये याच सभागृहात ठराव झाला की बाहेरील कर्मचारी येथे कुणी घ्यायचे नाही हा प्रस्ताव कसा आला.या पदावर ८ कर्मचारी यांना ३०००रू प्रमाणे नियुक्ती करायला पाहिजे ते न करता यांना समावून घेतले शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या त्यांचे पैकी नियुक्त न करता यांना का घेतले स्थानिक उमेदवार ३ ते ५ हजार दरमहा पगारावर काम करण्यास तयार आहे त्यांना संधी न देता बाहेरील कर्मचारी यांना २०-२५ हजार रू दरमहा पेमेंन्ट देवून घेणार असेल तर योग्य नाही विनंती की या कर्मचा-यांना परत पाठवावे.

श्री.संजय चौधरी :सभागृहात ज्या मान्यवराचे तैलचित्र लावलेले आहे या सर्वांनी शिक्षणाचे महत्व व त्याची आवश्यकता काय हे सांगितले आहे.महापालिकेचे माजी आयुक्त यांनी सुध्दा पेपरला बातमी दिली की शिक्षणाशिवाय राष्ट्राचा विकास होणार नाही.स्थानिक संस्थेचे काम ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याचे काम असते.त्या नुसार शिक्षण दिले जाते का ?प्रस्ताव पाहिला असता त्यात मोठया चुका दिसून येतात.झालेल्या नेमनुका बेकायदेशीर आहे.जो खुलासा आताच केला तो योग्य नाही.आतंर जिल्हा बदलीने १२ शिक्षकाची नेमणूक केली प्रस्ताव ८ कर्मचा-यांचाच सादर केला शासनाच्या नियमानुसार जर पती अथवा पत्नी महापालिकेच्या सेवेत असेल तर घेता येते.जे शिक्षक आंतर जिल्हा बदलीने समावून घेतले ते बिदू नामावलीनुसार घेतलेले नाही.असे असतांना या नेमनुका केल्या व महापालिकेकडे शिक्षक होते तर ३३ नवीन शिक्षक घेतांना सीईटीला का कळविण्यात आले .३३ शिक्षण सेवक आपण धेतलेले आहे आठ शिक्षकांना सांगण्यात येते की महापालिकेकडे पुरेसे शिक्षक आहे समावून घेवू शकत नाही विदयार्थ्यांचे नुकसान होते याची जबाबदारी कुणाची आहे.५० टक्के पगारापोटी शासन निधी देते ५० टक्के महापालिकेला खर्च करावा लागतो हा खर्च होत असतांना सर्व गोष्टीची पडताळणी झाली पाहिजे.ती आजपर्यत केली नाही.शिक्षण उपसंचालक यांचे पत्र माझेकडे आहे आजपर्यत महापालिकेचे १६ कोटीचे नुकसान या प्रशासनाने केले. त्यात असे म्हटले की ,-------

रजा मंजुरी न घेता देयक पारीत केले त्यामूळे खर्च अमान्य करण्यात येतो. वाजवी पेक्षा जास्त कार्यरत असलेल्या शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यामूळे खर्च अमान्य करण्यात येतो.शाळा निहाय मंजूर पदानुसार शिक्षक न दिल्यामूळे खर्च अमान्य करण्यात येतो गरज नसतांना काही ठिकाणी जास्तीचे शिक्षक ठेवल्यामूळे खर्च अमान्य करण्यात येतो. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकाचे समायोजन करण्यासाठी शिक्षण विभागास आदेश देवूनही महापालिकेने समायोजन न केल्यामूळे खर्च अमान्य करण्यात येतो.जवळपास २.८४ ोटी खर्च शिक्षण उपसंचालक यांनी अमान्य केला एवढाच खर्च महापालिकेने ५० टक्केनुसार केलेला आहे.या पत्रानुसार एकाच मुद्यावर ५.५० कोटीचे नुकसान प्रशासनाने केले याची जबाबदारी कुणावर आहे.मला शेरशायरी येत नाही परंतु एक आठवते असे की ,एक ही उल्लू काफी हैं । बरबादें गुलिस्तॉ के_ लिये याह तो हर डाल पे उल्लू बैठे है । हा सर्व प्रकार प्रशासन गांभीर्याने घेत नसेल तर योग्य नाही.अनेक शाळांवर शिक्षक नाही बनेवाडी शाळेत ७५० विदयार्थी असतांना एकही शिपाई नाही पोलीस हेडक्वॉर्टरच्या शाळेत ४ शिपाई कार्यरत आहे यास जबाबदार कोण आहे.प्रशासन याची दखल घेत नाही त्यामूळे शिक्षणा विषयीची अवस्था दयनीय झालेली आहे.या विभागाचा सर्व गोष्टीचा विचार करता शिक्षण सभापती म्हणून मी या ठरावास विरोध करीत आहे नवीन शिक्षकास ३०००रू.प्रमाणे पगार दिला जातो या शिक्षकांना जवळपास २५००० रू पगार आहे ५० टक्के खर्च महापालिकेच्या तिजोरीवर पडतो त्यामूळे या शिक्षकांना ठेवून महापालिकेचा खर्च वाढणारा आहे हा ठराव सर्वानुमते फेटाळण्यात यावा.

श्री.महेश माळवतकर :३३ शिक्षकांची मागणी जिल्हा परीषदेकडे केली होती १४० मार्कस पडलेले शिक्षक जिल्हा परीषदेत रूजू झाले परंतु या वर्षी १६०पेक्षा जास्त मार्क सीईटीमध्ये घेतलेल्या विदयार्थ्यांना येथे आलेले विदयार्थ्यांना नियुक्ती देवू शकलो नाही.१३ शिक्षकांनाच समावून घेतले ३३ शिक्षकांना महापालिका एक वर्षाच्या आत नोकरी देवू शकते का? पती-पत्नी एकत्रिकरणात जर ते शासकीय कर्मचारी असेल कोणत्याही विभागाचे असेल अशांना म्हणजे पती -पत्नी यापैकी कोणासही महापालिकेत समावून घेता येत असेल तर घेतले पाहिजे.हे करीत असतांना गुणवंत विदयार्थी जे कष्ट करून डीएड ,सीएटीमध्ये चांगल्या गुण घेवून पास झाले त्यांना डावलून त्यांचे नुकसान महापालिकेला करता येणार नाही.किती शिक्षक एक वर्षात सेवानिवृत्त होणार आहे त्यांचे जागेवर यांची नियुक्ती होईल का याचाही खुलासा करावा तसेच या प्रस्तावातील जे शासकीय सेवेत असेल त्यांचे पत्नीला महापालिकेत समावून घेता येत असेल तर घ्यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे:पुणे शिक्षण मंडळाने संपूर्ण महाराष्ट्रात मे २०१० मध्ये सीईटीची परीक्षा घेतली शिक्षकांच्या रिक्त जागा असलेल्याची यादी महापालिका नगरपालिकेकडून मागविली होती.महापालिकेकडून ३३ शिक्षकाचे मागणीचे पत्र तेथे नोंदविले गेले.सीईटीमध्ये मिरीट यादीनुसार जे विदयार्थी पात्र ठरले अशांची ३३ शिक्षकाची यादी महापालिकेला पाठवली त्यांना रूजू करून घेतले नाही.जागा रिक्त नव्हत्या मागणी का

केली होती. या शिक्षकांना ६ महिण्यात रूजू करून घेतले नाही तर पुन्हा सीईटीची परीक्षा दयावी लागणार सीईटी परीक्षेच्या संदर्भात महाराष्ट्रात अंदोलन होत आहे विदयार्थी आत्महत्या करीत आहे त्यांना रूजू करून घेत नाही याचा अर्थ त्यात आपण आणखी भर टाकतो ३३ शिक्षकांना डावलून बदलीने येणा-यांना नियुक्ती देतो हे बरोबर वाटत नाही.१९९२ ठराव, शासनाचा जी.आर काय या खोलात जाणार नाही परंतु ३३ शिक्षकांची यादी आली त्यातील .८ शिक्षक राहिले त्यांचे पेक्षाही कमी गुण असलेल्यांना नोकरी मिळाली ८ शिक्षक त्यातून वंचित राहिले त्यांनी उपोषण अंदोलन केले तर सर्व निदर्शनास आणून दयावे लागेल.नियमानुसार ३३ शिक्षकांचा अगोदर विचार करावा.बाहेरील शिक्षक व इतर पदावरील कर्मचारी अधिकारी किती घ्यायचे या संबधीत काही नियम ठराव झाला काय महापालिकेत २०-२५ वर्षापासून अनेक कर्मचारी कार्यरत आहे थोडीशी चूक झाली की निलंबन व इतर कार्यवाही होते त्यांना समजून उमजून सांगिल्यास बरोबर काम करतील परंतु बाहेरील प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी यांना परत जायचे असते म्हणून नियमाच्या बाहेर जावून काम करणार असेल तर योग्य नाही. काम सुरळीत होणे ऐवजी कामात व्यत्यय येतो सिडकोचे हस्तांतरण झाले ५ वर्षात ७ उपआयुक्त बदलले काहीही काम केल्याचे दिसून येत नाही या शिक्षकांना नियुक्ती दिली त्यांना पेमेन्ट दयायचे म्हणून ठराव मंजूरीला येतो हे योग्य नाही.अमान्य केल्यास त्यांचेवर अन्याय होईल व लोकप्रतिनिधीमध्ये गैरसमज ,सदस्यांची बदनामी होते.बाहेरील अधिकारी कर्मचारी यांना नियुक्ती देणे अगोदर सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी यापूर्वी श्री. हिरे नावाचे अधिकारी आले त्यांना रूजू करून घेतले नाही वादविवाद वाढला त्यात लोकप्रतिनिधीची बदनामी होत गेली.बाहेरील अधिकारी यांना रूजू करून घेतल्यानंतर सर्व सोयी सुविधा पुरवाव्या लागतात तो खर्च महापालिकेचा होतो त्यासाठी सभागृहाची मंजूरी अगोदर आवश्यक असते.याचा विचार व्हायला पाहिजे. सिडको उपआयुक्त म्हणून श्री. खांडेकर यांना आदेश दिले काम श्री. जावळीकर बघतात सिडको विभागाचे काम नेमके कुणाकडे प्रश्न पडतो. आठ शिक्षकांना घेणार की नाही घेणार नसेल तर का घेणार नाही.त्यांनी उपोषण अंदोलन केल्यास व त्यातून काही अनुचीत प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी कुणाची राहिल.

श्री.समीर राजूरकर :या प्रस्तावातील ३ शिक्षकाचे प्रस्ताव एकतर्फी बदली म्हणून नोंद केलेले आहे. ते पती-पत्नी एकत्रिकरण यात बसत नाही.असे प्रस्ताव ठेवता येतात का याची चौकशी करावी.

श्री.संजय जोशी :आताच खुलासा झाला शासनाचा जीआर वगैरे आहे.या शिक्षकांना कामावर घेण्याची आयुक्ताकडून मंजूरी घेवून जे कुणी अधिकारी होते ते बदली करून निघून गेले. आता सभागृहावर सोपविले जे शिक्षणाधिकारी होते त्यानी सर्व कार्यवाही करून निघून गेले बाहेरील अधिकारी येतात पाहिजे तेंवढया एकतर्फी बदलीवर कर्मचारी घेतात.पती-पत्नी एकत्रीकरणाचा जीआर नुसार कार्यवाही करतो प्रस्ताव एकतर्फी बदलीचे येतात हे योग्य आहे का ? प्रशासनाने त्यांना नियुक्त करून घेणे बाबत

कशाच्या अधारे मंजूरी दिली किवा घेतली.यात एकच प्रस्ताव क्र. १ वरील सौ.उर्मीला भास्कर भालेराव यांचे पती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ मध्ये सेवेत आहे हे प्रकरण नियमाने आहे समजू शकतो परंतु उर्वरीत बदलीवर कसे घेतले गेले. ज्या अधिका-यांनी या शिक्षकांना घेणे बाबत संचिका मा.आयुक्ताकडे मंजूरीसाठी सादर केली त्याच वेळी संबधीत अधिका-याच्या बाबतीत शासनाकडे अहवाल पाठवून आयुक्तांची दिशाभूल करून अडचणीत आणतात म्हणून संबधीत अधिका-यावर कार्यवाही करावयास पाहिजे होती.काय कार्यवाही संबधीतावर करणार सभागृहाने निर्णय घ्यावा परंतु प्रशासनाने या प्रकरणात अमुक अधिकारी यांनी लिखाण करून अशी चूक केली महापालिकेचे यात नुकसान झाले शासनास कळवावे. जेणे करून त्याची जेथे बदली झाली तेथे असे नुकसान करणार नाही नागरीक व लोकप्रतिनिधीमध्ये वाद निर्माण होईल असे काम करणार नाही.जर ठराव नामंजूर केला येथे कर्मचारी अंदोलन उपोषण करतील १९९९ च्या ठरावाची प्रत घेवून न्यायालयात दाद मागतिल असे प्रकार होतील संबधीत अधिका-यांनी या प्रकरणात अशी चूक केली त्याचे परीणाम महापालिकेला भोगावे लागतात म्हणून शासनाकडे अहवाल पाठवावा.या ठरावात क्रमांक १ चा प्रस्तावच पतीपत्नी एकत्रीकरणा नुसार योग्य आहे सभागृह निर्णय धेईल

मा.महापौर :शासनाला हा प्रस्ताव पाठवून पुढील सभेत अहवाल मागवू.

श्री.प्रमोद राठोड :ज्या अधिका-यांनी मा.आयुक्तांची मान्यता घेवून ही कार्यवाही केली यापूढे सर्वसाधारण सभेची मान्यता धेतल्या शिवाय अशा नियुक्त्या होवू नये तशा सुचना देण्यात याव्यात.नसता वैयक्तिक स्वार्थासाठी अधिकारी असे नेहमीच प्रस्ताव आणतील हे योग्य नाही.जो प्रस्ताव आलेला आहे या कर्मचा-यांना परत पाठविण्यात यावे या प्रकरणाची चौकशी करावी जे अधिकारी यास जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे जर ते राज्य शासनाचे असेल तर संबधीत अधिकारी यांनी महापालिकेच्या जनतेच्या पैशाचा दुरूपयोग केला महापालिकेला फसविले त्यांचेवर कार्यवाही व्हावी असे शासनास कळविण्यात यावे.अशा पध्दतीने नियुक्त्या होत असेल व त्यांना पाठवून दिले जाणार असेल तर आताच सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे कर्मचारी हे न्यायालयात दाद मागतिल महापालिकेला तेथे उत्तर दयावे लागेल पैसा खर्च होईल परत अशा घटना घडू नये त्यासाठी कडक कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. या महापालिकेतील पती-पत्नी एकत्रिकरणानुसार काही कर्मचारी इतर महापालिकेत गेलेले आहे त्यांना सामावून घेतलेले आहेत का ? माझे माहितीनुसार समावून घेतले नाही असे असेल तर या महापालिकेने का घ्यायचे.

श्री.संजय केनेकर : सर्वांना बोलण्याची संधी दयावी त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :जे शिक्षक रूजू होण्यासाठी आलेले आहे त्या रूजू करून घेणार की नाही.त्यांचे नुकसान करू नये गुणवत्तेनुसार पाठविलेले आहे. त्यांचेपेक्षा कमी गुण असलेले शिक्षक जि.प. शाळेत रूजू करून घेतले कमी पगारावर ते काम करणार त्यांना वेठीस न घरता रूजू करावे.

श्री.महेश माळवंतकर :निर्णय घेत असतांना अधिका-यांनी खुलासा करायला पाहिजे की ज्यांचे पती शासकीय सेवेत आहे अशांचा जो प्रस्ताव आला आहे त्यात विषय क्र.९० मध्ये अनुक्रमांक १ मधील सौ. उर्मिला भालेराव यांचे पती विदयापीठ मध्ये सेवेत आहे ती शासकीय नोकरी आहे त्यांना महापालिकेत सामावून घेत असेल तर विषय क्र. ९० मधील अनु. क्र. १ चा प्रस्ताव मंजूर केला पाहिजे या बाबतीत खुलासा घ्यावा नंतर निर्णय घ्यावा जे शासकीय सेवेत कार्यरत आहे अशाच्या बाबतीतच निर्णय घेतला पाहिजे आणि तो निर्णय आपण आज घ्यावा असे माझे मत आहे.

श्री.संजय केनेकर . ठेवलेला ठराव बरोबर व नियमाने आहेत का ?असे ४-५ ठराव आहेत ते प्रशासनाच्या नियमात बसत नाही.सभागृहाला प्रशासन योग्य दिशेने नेत आहे का खुलासा ध्यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :चुकीच्या पध्दतीने का प्रस्ताव येतात.यादीनुसार दिलेले शिक्षकांना रूजू करून घेणार की नाही.

श्री.समीर राजूरकर :एकतर्फी म्हणून ठेवले.

श्री.प्रशांत देसरडा :आताच शिक्षण सभापती यांनी शिक्षण उपसंचालक यांचे पत्र वाचून दाखवले त्यानुसार महापालिकेचे जवळपास ६ कोटीचे नुकसान झाले जसे समाज कल्याण विभागाकडे १ कोटी भाडे येणे आहे. या सर्व प्रकरणाची मुख्यलेखा परीक्षक श्री. जाधव साहेब यांचे कडून चौकशी करून घ्यावी जे ६ कोटीचे झालेले नुकसान कुणामूळे झाले ते समोर येईल व जबाबदारी फिक्स करता येईल.८ प्रस्तावा बाबत जेंव्हा पती पत्नी एकत्रिकरणा बाबत अर्ज येतात त्यानुसार तसा प्रस्ताव या सभेपूढे यायला पाहिजे,योग्य निर्णय झाल्यानंतर बदलीने त्या शिक्षकांना घ्यायला पाहिजे असा नियम आहे.कार्योत्तर मंजूरी हे ठेकेदाराने केलेले काम नाही. मुख्यलेखाधिकारी हे एखादया वस्तूचे देयक देता येते की नाही याची तपासणी करतात परंतु सन २००९ पासून या कर्मचा-यांना २०-२५ हजार रूपये दरमहा पगार दिला गेला याकडे प्रशासनाचे लक्ष का नाही याची ही चौकशी होणे गरजेचे आहे.या संदर्भात नगरसेवकांनी शासनाच्या जी.आर विषयी निदर्शनास आणून दिले याचा अर्थ प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.नागपूर महापालिकेत अशा प्रकारचा ठराव मंजूर केल्याने महापालिकेचे नुकसान झाले होते म्हणून सदस्यांना तुंरूगात जावे लागले ज्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांचेवर कडक कार्यवाही व्हावी. जर प्रतिनियुक्तीचे अधिकारी असतील तर त्यांचेवर कार्यवाही करण्या संदर्भात शासनाला कळविण्यात यावे.हा प्रस्ताव सुध्दा अर्धवट आहे.एकूण १२ शिक्षक घेतले ८ शिक्षकाचे प्रस्ताव पाठविले.यावरून आलेली माहिती चुकीची आहे.माहिती देतांना बरोबर दिली पाहिजे.शिक्षण विभागातील अस्थापना विभागावर लक्ष देण्याची गरज आहे ३३ सह-शिक्षकांना प्र.मुख्यध्यापकाचा चार्ज दिला आहे.प्रस्तावात अनु.क्र.७ मध्ये कुमारी असे नमूद केले प्रस्ताव पती-पत्नी एकत्रिकरणा संदर्भात आहे जे दिले ते सत्य आहे की नाही शंका निर्माण होते.याच बरोबर समाज कल्याण विभागाकडील भाडे व महापालिकेच्या शाळेचे भाडे या संबधी सखोल चौकशी करण्याचे आदेशीत करावे.

श्री.प्रमोद राठोड :उपमहापौर यांना जर अशा प्रकारची तक्रार मांडावी लागत असेल तर आपला प्रशासनावर वचक नाही प्रशासनातील अधिकारी योग्य व नियमाने काम करीत नाही असा निष्कर्ष महानगरपालिकेचे नुकसान होत असेल तर त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.प्रशांत देसरडा :येथे भाजपा शिवसेनेची सत्ता आहे प्रशासनाचा प्रश्न नाही.

याच वेळी सभागृहात स.सदस्य एकाच वेळेस बोलतात.

श्री.गिरजाराम हळनोर:प्रशासन चुकते आहे हे सभागृह निदर्शनास आणून देत आहे त्यांना माफ करत नाही.उलट अभिनंदन व्हायला पाहिजे.

श्री.संजय केनेकर :उपमहापौर यांनी प्रशासनाच्या ठरावावर प्रस्तावित केले. पारदर्शकता रहावी यादृष्टीने त्यांनी मत मांडले.

याच वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळेस बोलतात.

श्री.प्रमोद राठोड :हा ठराव रद्य करावा त्या शिक्षकांना परत पाठवावे. व असे ठराव पून्हा येवू नये सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळत नाही तोपर्यत मान्यता देवू नये.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे मा.आयुक्तांनी या विषयाच्या बाबतीत सविस्तर खुलासा करावा.

श्री.प्रमोद राठोड :या शिक्षकाना सेवेत घेतांना त्यास का मान्यता देण्यात यावी याचा पण खुलासा करावा.

श्री.सुशिल खेडकर :प्रत्येक वेळी खुलासा होत असतांना विरोधी पक्ष नेता यांनी मध्येच बोलण्याची गरज नाही.

या वेळी सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळेस बोलतात.

मा.आयुक्त आठ शिक्षक यांना बदलीने आदेश देवून महापालिका सेवेत घेण्यात आले व कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव दिलेला आहे.या विषयामध्ये अनियमितता झालेली.आहे प्रशासनाने शिक्षण विभागाच्या मार्फत जे आठ शिक्षक भरती केले नव्याने ज्या रिक्त जागा भरावयाच्या होत्या त्या संबधी संबधीत विभागास कळविलेले होते त्यांचा ताळमेळ न घेता जागा भरण्यात आलेल्या आहे.यापैकी ऑलरेडी ६ शिक्षक रूजू झाले आहे. शिक्षकाचे जातीचा सवंर्गनिहाय एकूण किती पद रिक्त आहे याची माहिती देवून संबधीत खात्याला मागणी करावयाची असते.३३ शिक्षकाची मागणी करण्यात आली जेंव्हा शिक्षक सेवक आले तेंव्हा २५ शिक्षकाच्या जागा रिक्त होत्या केलेली मागणी ही मुळात चुकीची केली मागणी अगोदरच करण्यात आली नंतर हे आठ शिक्षक घेण्यात आले.३३ जागेचा प्रस्ताव दिला त्यात कोणत्या संवर्गासाठी किती जागा रिक्त आहे याचा तपशिल दयावा लागतो.३३ पदाचा प्रस्ताव पाठविला त्या जागेवर भरती बाबत जोपर्यत कार्यवाही होत नाही तोपर्यत या बाकीच्या जागा भरता येत नाही नेमणूक करतांना जरी अशा पध्दतीने शिक्षक सेवकाच्या माध्यमातून होते दुसरी एक पध्दत शासनाने दिली आहे ती बदली नाही नेमणूक करता येते.पती पत्नी एकत्रिकरण ही अन्य माध्यमातून आहे रिक्त जागा भरतांना शिक्षकाच्या नव्हते तर इतर संवर्गातील इतर जिल्हयामध्ये राज्यातील इतर ठिकाणी व इतर विभागामध्ये याच स्वरूपाचे अधिकारी काम करणारे असतील तर त्यांना बदलीने जागा भरण्याची तरतुद शासनाने केली आहे.परंतु ती जागा त्याच संवर्गातील

असली पाहिजे आम्ही ज्या जागा कळविल्या त्या व्यतिरिक्त असली पाहिजे.एकदा रिक्त जागे बाबत कळविले तर त्यावर इतर कर्मचारी भरती करता येणार नाही.जी भरती शिक्षण विभागात शिक्षकाची झाली त्यात अनियमितता झाली.जे ८ शिक्षक घेतले त्यांचा दोष नाही त्यांना एनओसी दिल्यानंतर ते आलेले आहे.त्यांना घ्यायचे की नाही हा सर्वसाधारण सभेचा निर्णय आहे.आताच म्हटल्या प्रमाणे ३३ असल्याचे कळविले २५ जागाच हया पुढील वर्ष सुरू होईपर्यत रिक्त होत्या एक वर्षानंतर सीईटीची परीक्षा होवून शिक्षकाची भरती होते.जेवढया जागा रिक्त असतात तेवढया जागेची मागणी केली जाते.३३ कर्मचा-यांना महापालिकेकडे पाठविले त्यापैकी आज रोजी फक्त १३ जागा रिक्त होत्या ८ लोकांना नेमणुका दिल्या ५ लोकांना त्यांचे कागदपत्र आणण्याचे सांगितले अशा १३ लोकांना शिक्षक सेवकांच्या नियुक्त्या दिलेल्या आहे.आणखी १४ जागा एप्रिलपर्यत रिक्त होणार आहे. ३३ शिक्षण सेवक जरी आले असेल तरी त्यातील १३ जागेवर भरती करू शकलो आणखी १४ जागेवर मार्च्र-एप्रिल पर्यत भरती करून घ्यावी लागणार आहे.या व्यतिरिक्त ६ जागा अशा असणार की शिक्षकसेवक म्हणून जे आले त्यांना पदस्थापना देता येणार नाही.८ पैकी ६ शिक्षक रूजू झाले ते व नव्याने येणारे  ६ शिक्षक सेवक ज्यांना आपल्याला भरती करून घेता येत नाही. यांचा निर्णय आपल्याला घ्यावा लागणार आहे यात अनियमितता झाली आहे.पगारावर ५० टक्के खर्च शासन देते ५० टक्के महापालिकेला करावा लागतो.राज्यभर बदलीची किंवा पतीपत्नी एकत्रिकरण करण्याची तरतूद आहे.जिल्हा परीषदेमध्ये जास्तीचे भरती  झालेले कर्मचारी नगरपालिका महानगरपालिकेला घ्यावे लागतात व महापालिकेकडे जास्त झालेले कर्मचारी जिल्हा परीषदेला घ्यावे लागतात.अखेरला पट पडताळणी केली जाते जूनमध्ये प्रवेश प्रक्रिया चालू असते त्यावेळी किती प्रवेश दिले किती तुकडया होवू शकतात शिक्षक किती पाहिजे हे पाहिल्या जाते.हे करण्याचे काम सर्व राज्यभर केले जाते. आता ही बाब जी आहे ३० तारखेपर्यत पूढील संधी अशी आहे की पट पडताळणी करून पाहता येते त्याप्रमाणे शिक्षक संख्या किती आहे.हे ठरवले जावू शकते विदयार्थी संख्या कमी जास्त झाली त्यानुसार शिक्षक संख्याही कमी जास्त होवू शकते.या पार्श्वभूमीवर नेमके किती पद भरायचे व किती रिजेक्ट करायचे हे आपल्यापर्यत येवू शकते.यासाठी ३० सप्टेंबर पर्यत वाट पाहण्याची गरज आहे.३० तारखेनंतर आताच म्हटल्याप्रमाणे यात अनियमीतता झाली आहे.कोणत्याही संचिकेवर जागा किती रिक्त कोणत्या संवर्गाच्या रिक्त आहे जे बाहेरील शिक्षक येतात त्यांना घेवू शकतो की नाही.या बाबतचे अभिप्राय देतांना यांना घेण्यास हरकत नाही असे अभिप्राय असावेत.पूर्वी जो ठराव घेतला त्यात महापालिकेतच सेवेत असेल तरच घ्यावे असे नमूद नाही.म्हणून संचिका सादर झाली अमुक यांचा अर्ज आलेला आहे जागा रिक्त आहे त्या संवर्गातील आहे घेण्यास हरकत नाही म्हणून सही होते.म्हणून ज्या पध्दतीने संचिका सादर करायला पाहिजे त्याप्रमाणे समोर आणलेले नाही. अनियमीतता झाली यामध्ये चौकशी करण्याची

गरज आहे.ज्यांनी अनियमीतता केली त्यांचेवर कार्यवाही करावी लागणार ती सुरू करीत आहे.प्रश्न हा आहे की जे ८ कर्मचारी रूजू झाले त्यांचा किंवा जे ६ कर्मचारी राहिले त्यांचा.

श्री.मुजीब खान :विनंती की या कर्मचा-यांना परत पाठवावे.

श्री.त्र्यंबक तुपे :या कर्मचा-याच्या बाबतीत काय करणार प्रशासनानेच खुलासा करावा.

मा.आयुक्त :आताच खुलासा करतांना म्हटले की ३० तारखेला पट पडताळणी होणार आहे. शिक्षक संख्या किती असणार हे ठरवले जाणार आहे.जर शिक्षक संख्या वाढणार असेल तर ६ कर्मचा-याचा विचार करू शकतो.

श्री.त्र्यंबक तुपे :८ शिक्षक घेतले त्यांना २५ हजार पेक्षा जास्त पगार आहे नवीन शिक्षक सेवक यांना ३ वर्ष ३००० पगारावर घेतले जाते.महापालिकेने आर्थीक नुकसान न होता विचार केला पाहिजे.

मा.आयुक्त :या शिक्षकांचा पगार जास्त आहे महापालिकेवर बोजा पडलेला आहे हे मान्य आहे.

श्री.मुजीब खान :आमची विनंती की यांना परत पाठवावे महापालिकेवर हा मोठा खर्च यायला नको.आताच खुलासा केला यात अनियमितता झाली.

मा.महापौर :जे अशासकीय सेवेत आहेत त्यांना परत पाठवून दयावे जे शासकीय सेवेत आहे विदयापिठ मध्ये सेवेत आहे त्यांनाच फक्त ठेवावे.

श्री.सुर्यकांत जायभाये:आंतर जिल्हा बदली म्हणजे जिल्हा अंतर्गत कि, जिल्हाच्या बाहेर सुध्दा माहिती दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे:यादीनुसार जे आले त्यांचा विचार करावा.

मा.आयुक्त :महापालिकेच्या काही शाळेमध्ये ८,९,१० वीचे वर्ग मिळालेले आहे.या विदयार्थ्यांना शिकविण्यासाठी शासनाने पद मंजूर केले नाही.म्हणून असा निर्णय घेण्यात आला की जे बी.ए बीएड ,एम.ए.बीएड, एमएससी बीएड शिक्षक महापालिकेकडे आहे त्यांना या ८ ते १० च्या विदयार्थ्यांना शिकविण्यासाठी देवू शकतो यामूळे काही जागा रिक्त होवू शकतात.

श्री.गजानन बारवाल :बन्सीलालनगर शाळेत ८ वी ते १० वीचे वर्ग सुरू करण्यात आले २७ विदयार्थी होते २० विदयार्थी शाळा सोउण्याचे प्रमाणपत्र घेवून इतर शाळेत गेले त्यामूळे वर्ग बदं पडले त्याचेवर अन्याय झाला त्यांना दुसरीकडे जावे लागले.याची कल्पना उपआयुक्तांना दिली होती टीसी दिली जाते चुकीची पध्दत आहे कार्यवाही व्हायला पाहिजे.

मा.आयुक्त : ज्या शाळेवर अतिरिक्त शिक्षक झाले महापालिकेकडे जवळपास ५५० शिक्षकाची संख्या आहे. काही शाळेवर १०,५,६ असे शिक्षक काम करतात एखादया शाळेवर १० शिक्षक ऐवजी १२ शिक्षक असेल काही शाळेत आवश्यकतेनुसार कमी शिक्षक असतील जेथे कमी शिक्षक काम करतात तेथील फरक काढला जात नाही जास्त शिक्षक असेल तोच फरक काढला जातो.जी रक्कम ६ कोटीची काढली त्यातील बरीचशी रक्कम अशी आहे की मंजूर पदापेक्षा जास्त शिक्षकांनी त्या शाळेवर काम केले.रिक्त ठिकाणी बदल्या केल्या असत्या तर हा प्रश्न निर्माण झाला नसता.याची चौकशी करण्याची गरज आहे बदली झाल्यानंतर तेथील शिक्षकांना कार्यमुक्त केले नाही.म्हणून काही शाळांवर वाजवीपेक्षा जास्त शिक्षकानी काम केले त्यानुसार त्यातील रक्कम जास्त निघालेली आहे.

श्री.संजय जोशी :अनेक शिक्षक शाळेच्या वेळात महापालिकेत, शिक्षण विभाग फिरतांना दिसतात काही शिक्षक लिडरशिप प्लॉटींगचा व्यवसाय करतात.शिक्षण सभापतीनी भ्रष्टाचार व इतर सर्व गोष्टी समोर आणल्या या विभागाच्या संदर्भात एक विषेश सभाच आयोजित करावी बदल्या झाल्यानंतर रूजू होत नसेल तर कार्यवाही करावी.परीक्षेचा कालावधी असल्याने बदल्या थांबवाव्या मी विनंती केली होती परंतु शिक्षणाधिकारी यांनी ऐकले नाही.बदल्या केल्या त्यात मोठा भ्रष्टाचार केला त्याच शिक्षणाधिका-यानी यांना घेतलेले आहे. या शिक्षकांना घ्यायचे की नाही सभागृह ठरवेल या प्रकरणात अनियमितता झाली आताच म्हटले शिक्षणाधिकारी यांचे वर काय कार्यवाही करणार आहे प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त :अनियमितता झालेली आहे कार्यवाही करणार आहे

श्री.संजय जोशी :त्यांचे विभागाला कार्यवाही करण्याबाबत कळवावे.

मा.आयुक्त :त्या विभागाला तर कळवूच परंतु काय कार्यवाही करायची ती प्रशासन म्हणून आयुक्तांना करता येते.ते पाहण्यात येईल.

श्री.संजय चौधरी :संत एकनाथ रंग मंदीर येथे शिक्षकांचा मेळावा घेण्यात आला त्यावेळी मा.आयुक्त यांनी माध्यमिक शाळेवर बीएड व उच्च शिक्षण घेतलेल्या शिक्षकांना देण्यात येईल असे म्हटले होते ३४ शिक्षकांच्या बदल्या केल्या त्यातील ६-७ शिक्षक हजर झाले उर्वरीत शिक्षकांनी १००००रूदेवून बदल्या रद्य केल्याचे समजले तसेच स्विपर, शिपाई यांचे ५०००रू देवून बदल्या केल्या जाते खेदजनक आहे.६ शिक्षकांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला या शिक्षकांना प्रत्येकी १.२५ लक्षची मागणी करण्यात आली आहे.या सर्व प्रकरणाची चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात यावी व जे दोषी अधिकारी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :शिक्षण सभापती यांनी गंभीर आरोप केले आहे मा.आयुक्तांच्या मार्फत या संबधीची चौकशी व्हावी.

श्री.गिरजाराम हळनोर:शिक्षण सभापती यांनी विचारपुर्वक गंभीर आरोप केले त्यास गांभीर्याने घ्यावे जे संबधीत अधिकारी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

मा.महापौर :या सर्व प्रकरणाची चौकशीसाठी समिती नेमू व आता मा.आयुक्त खुलासा करतील.

श्री.प्रमोद राठोड :सभापतीनी गंभीर आरोप केलेले आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधीतावर कडक कार्यवाही करावी

श्री.संजय चौधरी :अनेक शाळांना मी भेटी दिल्या प्रशासनाकउे अहवाल दिले त्यानुसार बदल्या झाल्या नाही आता एकतर्फी अनेक बदलीवर घेतले या चुकीच्या पध्दतीने कार्यवाही होत आहे.

श्री्.सुरेद्र कुलकर्णी :अनेक शिक्षकाच्या बदल्या त्यांचे सोयीनुसार वेळेनुसार केल्या जातात हे योग्य नाही.

मा.आयुक्त :शिक्षण विभागाच्या संदर्भात होत असलेली चर्चा गंभीर स्वरूपाची आहे.प्रशासनाने ती गांभीर्याने धेतलेलीच आहे.या बाबत शिक्षण विभागाचे अस्थापना जे शिक्षणाधिकारी यांचेकडे आहे ते अस्थापना विभागाकडे देण्यात येईल.तसेच उपआयुक्त महसूल यांचे अध्यक्षतेखाली ३ सदस्यांची कमेटी नियुक्त करून येत्या आठ दिवसाच्या आत जे ६ कोटीचा प्रश्न, शिक्षकाच्या बदल्या ,जे शिक्षक घेतलेले आहे ते , मागणी

केलेल्या जागा , तसेच बदल्याच्या संदर्भात ज्या तक्रारी आर्थीक बाबीतून झाल्या या सर्वांची चौकशी आठवडाभरात करून जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे:यात ३३ शिक्षकांना अगोदर घेवून नंतर यांना घ्यायचे किंवा कसे या विषयी स्पष्ट रूलींग आपण करावे अशी अपेक्ष आहे.पेपरवर जोपर्यत आणणार नाही तोपर्यत याला अर्थ नाही.३३ शिक्षकांना घेवून यांना मान्यता कशी दयायची ते नियमात बसून कार्यवाही करावी.जेणे करून कुणावरच अन्याय होणार नाही.

मा.महापौर :नियमानुसार बघू कार्यवाही करू.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शीविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावात नमूद कर्मचाऱ्यांपैकी जे शासकीय सेवेत आणि विद्यापीठाच्या सेवेत आहे, त्यांनाच अंतर जिल्हा बदलीवर घेण्यांस मंजुरी देण्यांत येते, वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, या वर्षी पर्जन्यमान कमी झाल्यामुळे जायकवाडी जलाशयात पाणी साठा अत्यंत कमी झालेला आहे. अशा परिस्थितीत जायकवाडी जलाशयातील मृत साठयातून पाणी उचल करतांना महानगरपालिकेच्या उपसा विहीरमध्ये पाणी येण्याचे प्रमाण कमी झालेला आहे. त्यामुळे यावर्षी औरंगाबाद महानगरपालिकेस जायकवाडी येथे आपत्कालीन योजना राबविणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने आपत्कालीन योजनेचे नियोजन व संकल्पन केले असून, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारच्या आकस्मिक कामाकरिता सिंकींग फंड (Sinking Fund) ची तरतुद ठेवण्यात आलेली आहे किंवा कसे या बाबत विचारणा केलेली असून अशा प्रकारच्या तरतुदीमधून आपत्कालीन योजना राबविणे बाबत सुचना दिल्या आहेत.

औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेंतर्गत दैनदिन देखभाल दुरुस्तीची कामे, जसे जॉईट दुरुस्ती, व्हॉल्व्हची दुरुस्ती, जलशुध्दीकरण केंद्रातर्गत करावयाच्या दुरुस्त्या तसेच जल वाहिनी फुटल्यास पाईप बदलणे ही कामे अचानक व युध्दपातळीवर करावी लागतात याकामासाठी लागणारा निधी वर नमुद (Sinking Fund) सिकींग फंडच्या माध्यमाने उभारला जाऊ शकतो.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेंतर्गत मार्गस्थ ग्राहकांना देण्यात येणाऱ्या पाणी बिलापोटी सन २००८-०९ मध्ये रु. ४.४६ कोटी तर सन २००९-१० मध्ये रु. ४.२२ कोटी रक्कम वसूल झालेली आहे. या वसूलीतुन वार्षिक ठराविक रक्कमेचा (Sinking Fund) सिंकींग फंड निर्माण करुन वेगळया स्वतंत्र खात्यामध्ये जमा केल्यास वर नमुद प्रमाणे तातडीची व अचानक उद्भवणारी कामे करण्यास अडचण निर्माण होणार नाही.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ कलम ९१ नुसार व उक्त अधिनियमाच्या प्रकरण ६ नियम ३ च्या तरतुदी नुसार औरंगाबाद महानगरपालिकेंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी (Sinking Fund) सिकींग फंड निर्माण करुन त्यामध्ये दर वर्षी ठराविक रक्कम जमा करणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :सिंकींग फंड म्हणजे काय ,पाण्याची लाईन वॉल दुरूस्ती ई. कामे केली का जेव्हापासून महानगरपालिका झाली, ज्या पध्दतीने काम चालते त्याच पध्दतीने कामे चालु द्यावी वेगळा फंड ठेवण्याची गरज नाही.

श्री.गजानन बारवाल :ही परीस्थिती पुर्वीची आहे आता पाणी पातळीत वाढ झालेली आहे मृत साठयातून पाणी घेण्याची गरज नाही.हा ठराव मंजूर करण्याची गरज आहे का ?खुलासा घेण्यात यावा.

श्री.संजय जोशी : प्रकरण ९ कलम ९१ काय आहे स्पष्ट खुलासा व्हावा.

मुख्यलेखाधिकारी :हा विषय पाणी पुरवठया संबधीत असून बीपीएमसी ॲक्टचे कलम ९१ हे विशेष निधी स्थापन करण्याच्या संदर्भात आहे

श्री.संजय जोशी :प्रकरण ९ कलम ९१ हे विशेष निधीची स्थापना करण्यासाठी नाही यात जल व मलनि:सारन यासाठी आहे.

मुख्यलेखाधिकारी :यात पुढे दिलेले आहे.

श्री.संजय जोशी :पुढे म्हणजे कुठे दिले मुख्य हे जल व मल नि:स्सारण यासाठी दिले आहे.

मुख्यलेखाधिकारी :कलम ९१ हे विशेष निधी स्थापन करणे या संदर्भात आहे.

श्री.संजय जोशी :कलम ९१ हे जल व मलनि:सारण या दोन्हीसाठी आहे प्रस्तावात फक्त जल यासाठीच का सादर केले.सदर नियमात काय आहे विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

मुख्यलेखाधिकारी :प्रकरण ९ हे नगरपालिका निधी व अन्य निधी आहे कलम ९१ हे विशेष निधी स्थापन करण्या संदर्भात आहे ९१ अ हे एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह निधी , कर्ज निधी स्थापन असे आहे.

श्री.संजय जोशी :कलम ९१ मध्ये जल व मलनि:स्सारन निधी स्थापन करणे असे दोन्हीही आहे.मल प्रवाह निधी यात का आलेले नाही.

मुख्यलेखाधिकारी :गरज नाही म्हणून घेतलेले नाही पाणी पुरवठा विभागाकडून हा विषय आलेला आहे. संबधीत अधिकारी खुलासा करू शकतील.

श्री.संजय जोशी : मा. प्रधान सचिव यांचे कडे पाणी पुरवठयाच्या संदर्भातील देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी हा प्रस्ताव देवून निधीची मागणी केली आहे.अशी माझी माहिती आहे.

मुख्यलेखाधिकारी :पाणीपुरवठयाची जी आकस्मीत कामे करावयाची असतात जे उन्हाळयामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली होती.त्यासाठी शासनास ४ कोटीचा प्राजेक्ट दिलेला होता. मा.प्रधान सचिव यांनी पाणी पुरवठा संदर्भात अशी सुचना केली की, जो सिंकिंग फंड आहे तो स्थापन करण्यात यावा. विशेष निधी अंतर्गत जे पुढे ११२ मध्ये कर्जनिधी व सिंकींग फड म्हणून दिलेले आहे.हा सिंकींग फंड कुठल्याही आकस्मीत उदभवलेल्या कामासाठी विशेष निधी म्हणून खर्च करता येतो.यात फक्त पाणी पुरवठा हाच विषय घेतलेला आहे मल नि:स्सारन यात घेतलेले नाही.

श्री.संजय जोशी :फक्त पाणी पुरवठयासाठीच निधी नाहीत का ?

मुख्यलेखाधिकारी :मा. प्रधान सचिव पाणी पुरवठा यांनी सिंकींग फंड स्थापन करावे असे सुचीत केले आहे.

श्री.संजय जोशी :समांतर जलवाहिनी झाल्यानंतर हा फंड कुठे खर्च केला जाईल.

| | |
|---|---|
| मुख्यलेखाधिकारी | :आकस्मित निधी म्हणून हे राहिल. |
| श्री.संजय जोशी | यापूर्वी ज्या पध्दतीने पाणी पुरवठयाची कामे होत होत होती त्या प्रमाणे चालू ठेवावी.स्वतत्र फंड ठेवून पुन्हा डायरेक्ट एखादे काम होईल अनियमितता झाली असे म्हणण्याची वेळ प्रशासनाला पुन्हा येवू नये.आता ते सभागृहाला ऐकावेसे वाटत नाही. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :विषय महत्वाचा आहे महापालिकेचा यात तोटा नाही. केंद्र शासनाचे धोरण राज्य शासनाची भुमिका यानुसार पाणीपुरवठा प्रधान सचिव यांची या संदर्भात विचारणा केली त्यानुसार हा ठराव केला का? यात फक्त महापालिकेला खाते ओपन करायचे आहे काही रक्कम जरी टाकणार असेल तरी सभागृहाची मान्यतेशिवाय पुढील कार्यवाही होणार नाही.ही प्रोसेस केली तर शासनाचे यासाठी जे स्वंतत्र विभाग काम करते या विभागाच्या माध्यमातून निश्चितपणे स्वच्छ पाणी देण्यासाठी निधीच्या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतला त्यामध्ये महापालिकेला निश्चित निधी प्राप्त करून घेता येईल.जे की ४० कोटीचा निधी जो आहे तोही शासनाकडूनच आलेला आहे.त्यावेळी अशीच अडचण आली होती.ती आता यापूढे येवू नये त्यासाठी यास मंजूरी देण्यात हरकत नसावी. |
| श्री.संजय जोशी | :मी माझे मत मांडले हा प्रस्ताव रद्य करावा. आता पर्यंत जे सांगत आलो ते खरे होत आले करु नये |
| श्री.त्र्यंबक तुपे | : ज्या वेळी हा प्रस्ताव आला त्यावेळची व आताची परिस्थिती कशी आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : आता सद्यस्थितीत पाणी मुबलक असावे असे सदस्यांनी म्हटले हा फंड राखीव ठेवतो जेंव्हा भविष्यात गरज वाटेल तेंव्हा खर्च करणार.सिंकींग फंड ठेवणे हे चुकीचे नाही तो ठेवावा भविष्यात या शहराच्या दृष्टीने मोठा प्रश्न निर्माण होणार नाही. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :संबधीत अधिकारी यांचा खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| कार्य.अभियंता(श्री.पानझडे): | पाणीपुरवठा व ड्रेनेज या दोन्ही विभागाशी संबधीत आहे.पाणीपुरवठा विभागाकडून मुख्यलेखाधिकारी यांना सिंकींग फंडची स्थापना करावी अशा आशयाचे पत्र दिले होते लेखा विभागातर्फे हा प्रस्ताव ठेवला आहे.यात पाणीपुरवठा व मलनि:स्सारण या दोहोंचाही समावेश असायला पाहिजे.सिकींग फंड महापालिकेत असणे आवश्यक आहे जो आजपर्यंत केलेले नव्हते.आकस्मीत कामे वगैरे करण्यासाठी असा प्रकार नाही पाणी पुरवठा व मल निस्सारण यासाठी ज्या योजना घ्यायच्या असतात त्यासाठी लागणारा फंड उपलब्ध होण्यासाठी हा फंड स्थापन करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने आतापर्यंत केले नव्हते आकस्मिक कामासाठी नाही. |
| मा.उपमहापौर | :या माध्यमातून शासनाकडून काही निधी येण्यासाठी ही कार्यवाही करतो काय ? |
| श्री.संजय जोशी | :प्रस्तावात पर्जन्यमान कमी झाल्याने जायकवाडी जलाशयात पाणी साठा अत्यंत कमी आहेउपसा विहीरमध्ये पाणी येण्याचे प्रमाण कमी |

झाले यामूळे यावर्षी जायकवझडी येथे आपत्कालीन योजना राबविणे आवश्यक आहे असे दिले.

कार्य.अभि.(श्री.पानझडे) :सिंकींग फंड स्थापन करण्या सदंर्भात लेखा विभागास कळविले होते मुख्यलेखाधिकारी यांचे मार्फत प्रस्ताव तयार केला तो सभेत ठेवण्यापूर्वी पाणीपुरवठा विभागाला दाखविला असता तर यातील अनावश्यक बाबी वगळल्या असत्या प्रस्ताव वाचल्यानंतर लाईन दुरूस्त करणे वॉल बदलणे ई. कामे करणार आहे.यासाठी हा निधी नाही.

श्री.संजय जोशी :एक दुस-या विभागाचे अधिकारी यांचे समन्वय नाही सभेपुढे ठेवण्यापूर्वी अधिका-यांची मा.आयुक्त बैठक घेत असतात एक अधिकारी प्रस्ताव ठेवतात दुसरे प्रस्ताव बरोबर नाही सांगतात आम्ही जे बोलतो ते खोटे ठरवावे दोन तास यावर चर्चा झाल्यानंतर अधिकारी सांगतात चुकीचा प्रस्ताव आहे सभागृहाचा वेळ वाया जातो ही पध्दत बरोबर नाही वाईट वाटते हे सर्व विरोधी पक्षाचे सदस्यांनी निदर्शनास आणून दयायला पाहिजे ते आम्हाला बोलावे लागते.

श्री.प्रमोद राठोड :मुळात प्रस्ताव चुकीचा आलेला आहे आघाडीचे सदस्य बोलल्यानंतर यांना वाईट वाटते जे योग्य असेल त्या पध्दतीने काम व्हावे.

याच वेळी सभागृहात अनेक स.सभासद एकाचवेळी बोलत असतात.

श्री.प्रमोद राठोड :सभागृहाचा वेळ महत्वाचा असतो. प्रस्ताव लेखी समोर येतो सभासद त्याचे वाचन करतात चर्चा करतात अधिकारी चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव सादर केला हे ऐनवेळी सांगत असेल तर हे योग्य नाही.

मा.महापौर :सभागृहाचे मत लक्षात घेता हा प्रस्ताव दुरूस्तीसह पूढील सभेत सादर करण्यात यावा.

**ठराव :-**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव पुढील सभेत दुरुस्तीसह सादर करण्यांस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र.९२:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिक हद्दिसाठी हस्तांतरणीय विकास हक्काची तरतुद दिनांक १६.०५.२००७ चे शासन निर्णयानुसार लागू झालेला आहे. मात्र सदर योजनेस अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती फारसी समाधान कारक नसल्याने तसेच हस्तांतरणीय विकास हक्क तरतुदी सहीत अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने विकास योजना अंमलबजावणीस मर्यादा पडत आहे. त्यामुळे हस्तांतरणीय विकास हक्क नियमावलीत काही बदल करणे आवश्यक वाटते.

वरील शासन निर्णयास अंतीम मान्यता होण्यापुर्वी देखील महानगरपालिका औरंगाबाद व बिल्डर्स ॲन्ड प्रमोटर्स असो.औरंगाबाद यांनी सदर नियमावलीत काही बदल सुचविले होते ते प्रामुख्याने पुढील प्रमाणे.

०१. सदर नियमावली झोन अे हा गावठाण क्षेत्रापुरता (विकास योजना नकाशावर दाटीवाटीचे क्षेत्र) मर्यादित करुन उर्वरित क्षेत्रास अे-१ झोन म्हणून बदल करुन त्यात झोन अे व प्रस्तावित झोन अे-१ मधून उपलब्ध होणारा टि.डी.आर. वापरण्यास अनुज्ञेय करणे.

सदर बदल आवश्यक वाटतो कारण दोन पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याची अनुमती असलेला गावठाण क्षेत्र व टि.डी.आर रस्त्याने बाधीत होणार एफ.एस.आय (प्रत्येकी ०.४) असा

१.८ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असणारे झोन बी, झोन सी, झोन डी आणि झोन ई यांचे मध्ये सध्या अे झोन मध्ये असलेला मात्र गावठाण क्षेत्रात नसलेला असा भाग येतो. ज्यावर की, सध्याच्या नियमावली नुसार केवळ एक एवढा चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होतो ही तफावत टाळण्यासाठी उपरोक्त बदल करणे योग्य वाटते.

०२. शहरातील काही रस्त्यालगत टि.डी.आर. वापरण्यास सध्याच्या नियमावतील प्रतिबंध आहे. हा प्रतिबंध केवळ वर्गीकृत रस्त्यांपुरता मर्यादित ठेवून उर्वरित रस्त्यांवरील प्रतिबंध काढून घेण्यात यावा अशी मागणी बिल्डर्स ॲण्ड प्रमोटर्स असो. औरंगाबाद यांनी केली होती. त्या प्रमाणे मान्यता झाल्यास पुढील रस्त्यावरील प्रतिबंध काढून घेता येईल.

अ. जालनारोड (सेव्हनहिल जंक्शन) ते गारखेडा सुतगिरणी रस्ता.

ब. क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन रोड

क. जालनारोड (हॉटेल अमरप्रित जंक्शन) ते रेल्वे लेव्हल क्रॉसींग (शहानूरमिया) घेतल्यास

टि.डी.आर वापरण्यास बांधकाम व्यवसाईक व जमीन मालक उद्युक्त होऊ शकतात.

०३. सध्याच्या मंजुर नियमावलीनुसार भुखंड क्षेत्राचे ०.४ एवढा टि.डी.आर व भुखंडाचे क्षेत्र रस्त्याने बाधीत होत असल्यास त्यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र ०.४ असे एकंदर १.८ पर्यंत चटई क्षेत्र देय होते. मात्र एकाच रस्त्यावरील काही भुखंड रस्त्याने बाधीत होतात तर काही बाधीत होत नाही. त्यामुळे अशा दोन प्रकारात अनुज्ञेय चटई क्षेत्र वेगवेगळे होते. त्यामुळे अश्ी फोड न करता सरसकट १.८ एवढया चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंत (म्हणजेच वाढीव ०.८ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक) अनुज्ञेय केल्यास वाढीव टि.डी.आर वापरला जाईल व टि.डी.आर घेण्याकडे नागरीकाचा कल वाढेल.

वरील तिन्ही बदल आजही टि.डी.आर चा वापर वाढण्यासाठी आवश्यक वाटतात. या शिवायही काही बदल करणे योग्य वाटते. जेणे करुन टि.डी.आर. घेणे व वापरणे याकडे नागरीकांचा कल वाढेल व महानगरपालिकेस विकास योजनेची अंमलबजावणी करणे सुकर होईल. त्यात प्रामुख्याने.

०१. टि.डी.आर वापरणाऱ्या इमारतीसाठी टि.डी.आर वापरण्यामुळे वाढणाऱ्या उंचीसाठी अतिरिक्त सामासिक अंतराची सक्ती न करता मुळ चटई क्षेत्राचा वापर करतांनाचे उंची नूसार आवश्यक सामासिक अंतरानुसारच बांधकाम परवानगी अनुज्ञेय करणे.

०२. टि.डी.आर. वापरणाऱ्या इमारतीसाठी जर त्या इमारतीत संपुर्ण मजला पार्किंग म्हणुन वापरला जात असल्यास इमारतीची उंची मोजतांना पार्किंगच्या मजल्याची उंची त्यामधून वगळणे.

वरील प्रमाणे बदल करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावा लागेल. त्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल बैठकीत हा विषय होता त्यावेळी याविषयी विशेष सभा आयोजित करावी असे ठरले होते या विषयावर विशेष सभा बोलवावी.

श्री. हुशारसिंग चव्हाण : असे विषय त्या त्या विषय समितीच्या मार्फत यावे शहर असे आपण मागिल बैठकीत रूलींग दिले होते शहर सुधार समिती अस्तित्वात आहे त्या संमिती मार्फत हा विषय घेण्यात यावा.यानंतर असे विषय डायरेक्ट सर्वसाधारण सभेत येवू नये असे आदेशीत करावे.

श्री.गिरजाराम हळनोर :हा विषय विशेष सभेपूढे घेण्यापूर्वी शहर सुधार समितीच्या मार्फत सादर करण्यात यावे.

श्री.संजय जोशी :जेंव्हा हा विषय येईल तेंव्हा झोनचे क्षेत्र कुठले येते त्याची माहिती सुध्दा दयावी.

मा.महापौर :या विषयावर विशेष सभा आयोजित केली जाईल त्यावेळी सर्व माहिती प्रशासनाने सादर करावी आता १५ मिनिट जेवणासाठी सभा तहकूब करण्यात येते.

**ठराव :-**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तृत प्रस्तावाच्या संदर्भात विशेष सभेचे आयोजन करण्यांस व त्यावेळी प्रशासनाने सविस्तर माहिती सादर करण्यांस मंजुरी देण्यांत आली.

(सभा तहकूब दु.३-१५ वा. पुन्हा सभेला सुरूवात ४-२० वा.)

मा.महापौर :मा.सभापती ,श्री.राजू शिंदे हे सन २०१०-२०११ चा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेपूढे सादर करीत आहे.

श्री.मुजीब खान :बजेट प्रस्तावित करण्यासाठी कमीत कमी १ तास लागेल त्या अगोदर विषयपत्रिकेवरील विषय घ्यावे त्यानंतर बजेट घ्यावे.

मा.महापौर :तहकूब सभा आज घेतली जाणार नाही.मा.सभापती बजेट सादर करीत आहे.

याच वेळी मा.सभापती स्थायी समिती श्री.राजू शिंदे हे मा.महापौराकडे सन २०१०-११ चा अर्थसंकल्प सादर करतात.

मा.सभापती (स्था.स.) :औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून शहराच्या जवळ अजिंठा, वेरुळ सारख्या जग प्रसिध्द लेण्या, १२ ज्योर्तीलिंगापैकी घृष्णेश्वराचे मंदिर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पवन झालेला नागसेनवन परिसर तसेच संतांची भूमी पैठण व तेथील जायकवाडी धरण व ज्ञानेश्वर उद्यानामुळे आपल्या शहरात हजारोंच्या संख्येने पर्यटक येतात. शहरातील उद्यानांचे व झाडांचे संगोपन न झाल्यामुळे प्रदुषणात वाढ होऊन त्याचा विपरीत परिणाम शहर सौंदर्यीकरणावर होत आहे व प्रदुषणामुळे शहरातील नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, या बाबींचा सखोल अभ्यासाअंती शहरातील सार्वजनिक रस्त्यावरील महानगरपालिकेच्या मोकळया जागी, महानगरपालिके च्या शाळा, दवाखाने, उद्याने इत्यादि ठिकाणी मोठया प्रमाणात नियोजनबध्दरित्या जास्तीत जास्त झाडे लावून हरित औरंगाबाद म्हणून शहराची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे. या प्रकल्पांतर्गत अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतुद आवश्यक आहे. हरित औरंगाबाद प्रकल्प अंमलबजावणीमुळे पर्यावरण स्वच्छ राहण्यास मदत होईल. यासाठी विशेष बाब म्हणून प्रशासनाने आवश्यक कार्यवाही त्वरीत सुरु करण्याच्या सुचना देण्यांत येत आहेत व हरित औरंगाबाद प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात रु. ३.०० कोटीची विशेष आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. एम.आय.डी.सी. चिकलठाणा भागातील रस्ते महानगरपालिकेकडे अनेक वर्षापुर्वी हस्तांतरीत झालेले आहेत असे दिसून येत आहे की, या परिसरातील विविध कारखान्याकडून मोठया प्रमाणावर मालमत्ता कर व जकात कराच्या माध्यमातून

महसूली उत्पन्न जमा होत असतांना देखील महानगरपालिकेतर्फे या परिसरातील रस्ते व इतर मुलभूत सोयी सुविधा यांकडे दुर्लक्ष होतांना दिसते. या बाबत काही उद्योजक, नागरीकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. या याचिकेद्वारे मुख्यत्वे महापालिका या भागात सोयी सुविधा देण्यास टाळाटाळ करीत आहे असा आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे महापालिकेचे या भागाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यावर्षी एम.आय.डी.सी. मधील रस्ते बांधणे, रस्ते दुरुस्तीचा एकात्मिक विशेष कार्यक्रम हाती घ्यावा. त्यास्तव एक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन रस्त्यांची कामे करुन घ्यावीत. या कामाकरीता रु. ३.०० कोटींची विशेष तरतूद अर्थसंकल्पात ठेवण्यांत येत आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असतांना फल ना फुलाची पाकळी या स्वरुपात शहरातील करदात्यांना मुलभूत सुखसोयी व नागरी सुविधा पुरविणे हे आपले कर्तव्य समजून स्थायी समितीमार्फत एकूण रक्कम रु. ३८.०० कोटींच्या नविन विकास कामांचा सामावेश करण्यांत आलेला आहे व त्यानुसार नियोजन करुन निधी उपलब्ध केला आहे. सन २०१०-११ चा अर्थसंकल्प हा फक्त महानगरपालिकेच्या महसूली व भांडवली उत्पन्नाचा विचार करुन तयार केला असून शासकीय अनुदानाची रक्कम व करण्यांत येणारी कामे ही स्वतंत्र परिशिष्टमध्ये अर्थसंकल्पासोबत जोडली आहे. पर्यायाने सदरील अर्थसंकल्प हा फक्त महानगरपालिकेच्या स्वत:चा उत्पन्नाचाच असल्यामुळे गतवर्षाच्यात तुलनेत कमी रक्कमेचा दिसून येतो. स्थायी समितीच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मला सभापती पदावर विराजमान केले, या बद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. माझ्या कार्यकाळात माझे सर्व सहकारी शहर विकासाच्या दृष्टीने योग्य ते सहकार्य करतील अशी मी आशा बाळगतो. प्रशासनिक पातळीवर मा.आयुक्त डॉ.पुरुषोत्तम भापकर व त्यांचे सर्व सहकारी अधिकारी तसेच कर्मचारी हे स्थायी समितीने शहर विकासाच्या दृष्टीकोनातून घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी तातडीने करतील अशी माझी अपेक्षा आहे. या ऐतिहासिक शहरातील सर्व प्रसार माध्यमे व वर्तमानपत्रांचे सर्व प्रतिनिधी यांचे मला भविष्यात सहकार्य लाभेल अशी भावना व्यक्त करतो. धन्यवाद!

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.सभापती यांनी या वर्षाचा अर्थसंकल्प आपल्याकडे सादर केला त्यांचे विशेष अभिनंदन करतो

मा.महापौर :आताच जो अर्थसंकल्प मा.सभापती यांनी सादर केला तो स्विकारलेला आहे.

**विषय क्र. ९३:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून शहर (वाढीव हद्द) करीताच्या मंजुर विकास योजने मधील औरंगाबाद मुंबई राज्य महामार्ग व भावसिंगपुरा -पडेगांव कत्तलखानाकडे जाणारा रस्ता या दोन्ही रस्त्यांना जोडणारा उत्तर -दक्षिण २४.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीत (Alignment) बदल करण्यासाठी

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नूसार प्रास्तावित २४.०० मीटर रुंद रस्ता पडेगांव ते पडेगांव कत्तलखाना असा जात असून पडेगांव येथील एम.एस.ई.बी.च्या उपकेंद्रा (१३२ के.व्ही.उपकेंद्रा) पर्यंत अस्तित्वातील कोपऱ्यापासून सदरील रस्ता उत्तर पुर्वेकडे पूढे वळण घेऊन नाला सदृष भाग तसेच नाल्यामार्गे भावसिंगपुरा स्मशानभूमीच्या पश्चिम बाजुने नाल्यामार्गे भावसिंगपुरा स्मशानभूमीच्या पश्चिम बाजुने नाल्यामार्गे भावसिंगपुरा गावाकडून येणाऱ्या २४.०० मीटर (पुर्व पश्चिम) विकास योजना रस्त्यास मिळतो. हा रस्ता भावसिंगपुरा सर्व्हे नंबर ६,७ व ९ मधून जातो. सर्व्हे नंबर ९ (प्रशासकीय जमीन) वगळता इतर जागा खाजगी आहेत तसेच बहुतांश रस्ता नैसर्गिक पाणी प्रवाहाच्या भागातुन (Along Natural water course) जात आहे. त्यामुळे सदर २४.०० मीटर विकास योजना रस्ता प्रत्यक्ष विकसीत करणे अडचणीचे होणार आहे. पडेगाव ते पडेगाव कत्तलखाना हा अस्तित्वातील डांबरी रस्ता सर्व्हे नंबर ६ व सर्व्हे नंबर ९ या सरकारी जागेतून तसेच सपाट भागातून जातो त्यामुळे वर नमुद २४.०० मीटर विकास योजना रस्त्याची आखणी (Alignment) बदल करुन अस्तित्वातील पडेगांव ते कत्तलखाना अशा जाणाऱ्या हया रस्त्याचे पुर्वेकडील बाजुन रस्ता रुंदीकरण करण्याचे प्रस्तावित करुन सदर रस्ता २४.०० मीटर विकास योजना रस्ता म्हणून विकसीत करण्याचे व मुळ विकास योजना मधील रस्ता एवढया क्षेत्रासाठी रद्द करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. विकास योजना रस्त्याची आखणीत बदल करुन निश्चित करणे आवश्यक आहे.

करीता मंजजुर विकास योजना वाढीव हद्द मधील विकास योजना आखणीत बदल करण्यासाठीचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनिमय १९६६ चे कलम ३७ अन्वये पुढील सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यात यावेत. त्यानूसार या प्रकरणी अधिसूचना प्रसिध्द करणे,सुचना/हरकती मागवून सुचना/हरकतीवर सुनावणी घेऊन त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास अंतिम मंजुरीस्तव पाठविणे इत्यादी कार्यवाही करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गिरजाराम हळनोर :हा प्रस्ताव रद्य करावा कारण यापूर्वी डीपी प्लॅन तयार करतांना हा रस्ता टाकलेला होता.इतकेवर्ष गेल्यानंतर हा रस्ता शिप्ट करण्याचे कारण काय ?ज्या भागातून हा रस्ता शिप्ट करायचा त्या ठिकाणी अनेक घरे असू शकतात खाजगी जागा असतील त्यामूळे हे करणे अवघड होईल त्यासाठी कुठल्याही प्रकारचे बदल न होता पूर्वी ज्या पध्दतीने डीपी रोड दाखविलेला आहे त्यानुसार तोच कायम करण्यात यावा हा प्रस्ताव नामंजूर करावा.

श्री.मुजीब खान :हा रस्ता शिप्ट करीत आहे त्या ठिकाणी किती घरे आहे हा कुठला भाग येतो. जेथे् लोकसंख्या आहे तेथे विकास करण्याची गरज आहे येथे गरज नाही.जेथे गरज आहे तेथे काम होत नाही जेथे गरज नाही तेथील ठराव समोर येत आहे.यात वादविवाद होतील परत मालमत्ता चेंज होतील ज्या मोकळया मालमत्ता आहे त्यांना पैसा देणार यात भुसंपाद करण्याचे जे मुद्यें आहे त्याचा खुलासा करावा यात किती जागा भूंसपादीत करायची आहे त्याचा सर्वे नंबर व मालकी हक्क सांगावे.ठरावात मंजूरी दिली जाते त्यानंतर असे काही लोक आहे की त्या मार्फत हे होते व प्रशासनाच्या मार्फत त्यांना मोबदला दिला जातो कोणत्या जागेतून हा रस्ता जातो व कुठे आहे

| | |
|---|---|
| | माहिती घ्यावी.हा प्रस्ताव ठेवण्याची भूमिका काय माझ्या माहिती प्रमाणे तेथे अदयाप तेथे भुंसपादन झालेले नाही मोकळी जागा आहे. |
| मा.महापौर | :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| सहा.संचालक (न.र) | :हा २४ मी.चा विकास योजना रस्ता पडेगाव स्लाटर हॉऊसकडे जातो १९९१ सालची मंजूर विकास योजना असून ५० टक्के रस्ता नाल्यामध्ये जात आहे जो नाल्यातून रस्ता करणे फिजीबल नाही.याच रस्त्याच्या बाजूला २०० मी.अंतरावर पडेगाव स्लॉटर हाउसला जाणारा डांबर रस्ता सध्या अस्तित्वात आहे.तो नॉनडिपी रोड आहे. जो ९ मीटर आहे. त्या ९ मी.ला २४ मी.करावे व नाल्यावरील जो रस्ता कन्स्ट्रक्शन करण्यास फिजीबल नाही.त्याला दोन डीपी रोड आहे २४ मीटरचा रस्ता करावा असा प्रस्ताव आहे. |
| श्री.मुजीब खान | :जे रस्त्याच्या आखणीत बदल चेंज करण्याचे बोलत आहे किती फुट व किती दुर आहे तेथे बिल्डरांनी जागा घेतली आहे लेआऊट करून तिकडच्या तिकडे रस्ता करण्याचा प्रयत्न केला जात आहे.प्रशासनाला किती फुट पर्यत करण्याचा अधिकार आहे बिल्डर लोकांच्या जमीनी घेवून ठेवतो १०,२०,३० फुट पर्यंत ठिक आहे. ते करता येईल याशिवाय प्रशासनाला करता येत नाही. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :जुना रस्ता हा नाल्यावरुन, नाला पहिले होता की रस्ता पहिले होता. ज्या वेळेस नाला होता त्यावेळेस विचार झाला असेल. |
| सहा.संचालक(न.र) | :नाला अगोदरचा आहे रस्त्याच्या बाबतीत नंतर ठेवण्यात आले. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :नंतर रस्ता केला तो विचार करूनच केला असेल. कूठे असावे . |
| सहा.संचालक(न.र) | :रस्त्याचे कन्स्ट्रक्शन तेथे फिजीबल नाही म्हणूनच हा प्रस्ताव ठेवलेला आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :या शहरात अनेक प्रकरणे आहेत की त्या जागेचा मोबदलाही दिला परंतु ती महापालिकेच्या ताब्यात नाही.नाही तेथे प्रशासन काम करते यात नाल्याचा रस्ता बंद करून दुसरीकडे टाकणार असा प्रस्ताव आहे जेथे जुना जो रस्ता आहे तोच ठेवावा हा प्रस्ताव रद्य करण्यात यावा. |
| मा.महापौर | :हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. |
| श्री.नासेर खॉन | :आताच नाल्याचा उल्लेख केला तेथे नालाच नाही खुलासा घ्यावा.पुर्ण वस्ती अनाधिकृत आहे. पडेगाव येथे रस्ता मोठा करण्यासाठी १९८०-८८ दरम्यान जागेचा मोबदला दिला पीआर कार्डवर महापालिकेचे नाव आले परंतु आजपर्यत तेथे असलेले इलिगल काम हटविले नाही. |
| सहा.संचालक(न.र) | :स.सदस्य मा.महापौर, उपमहापौर यांनी स्थळ पाहणी केली आहे. |
| श्री.नासेर खॉन | :सभागृहाची दिशाभूल होत आहे तेथे नाला नाही. यापूर्वी मा.आयुक्तांनी पाहणी केली होती खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :मी स्वत: येथे स्थळ पाहणी केली त्यामूळे हा प्रस्ताव नामंजूर केला. |

**ठराव :-**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तूत प्रस्ताव नामंजूर करण्यांत आला.

**<u>विषय क्र. ९४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहराच्या ज्या भागात जलवाहीनी टाकण्यात आलेला नाही तसेच ज्या भागात जलवाहिनीद्वारे पुरेसा पाण्ी पुरवठा होत नाही अशा भागात टॅकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. वार्ड अ व ड करीता कोटला पाण्याची टाकी वार्ड ब व क करीता सिडको एन-५ पाण्याची टाकी व वार्ड इ व फ करीता गिरीजा देवी सहकारी सोसायटी पंपगृह येथुन संबंधीत उपअभियंता (पाणी पुरवठा) यांच्या नियंत्रणाखाली टॅकरद्वारे आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. यासाठी महानगरपालिकेचे सर्वसाधारणपणे १०,००० लि.क्षमतेचे सात व सर्वसाधारणपणे ५,००० लि. क्षमतेचे चार असे एकुण अकरा टॅंकरकार्यरत आहेत. नागरीकांच्या मागणी प्रमाणे टॅकरद्वारे पाण्ी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे उपलब्ध टॅंकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर खाजगी पाण्याच्या टॅकरची आवश्यकता आहे. नागरीकांच्या आवश्यकते प्रमाणे वेळोवेळी टॅंकरलावण्यात येतील.

पाण्याच्या टॅंकरच्या भाडयापोटी एक वर्षासाठी सर्वसाधारणपणे रुपये ८७.३० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तथापि प्रत्यक्षात रु. ३०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आली आहे. प्रस्ताव मान्य झाल्यास सध्या केवळ रु. ३०.०० लक्ष च्या कामासाठी निविदा मागविण्यात येईल.

करीता प्राप्त होणाऱ्या निविदा दरानुसार आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठा करण्याकरीता खाजगी टॅंकरएक वर्षासाठी भाडे तत्वावर लावण्या करीता आणि त्यापोटी होणाऱ्या एकुण खर्चाला मंजुरी मिळणेसह प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :टॅंकर भाडयाने किती कुठल्या भागात पाणीपुरवठा होतो याचे नियोजन नाही.पावसाळयात पाणी साचते तेथे औषध फवारणी करण्यासाठी २-३ ट्रॅक्टरवर मशीन ठेवून फवारणी होते त्या ट्रॅक्टरचे भाडे महिण्याला ३०००० देतो एका ट्रॅक्टरची किंमत २.५० ते ३.०० लक्ष आहे एका वर्षात भाडे दयावे लागते तेवढया रक्कमेत ती मशीनरी खरेदी होवू शकते ठराव येतात मंजूर होतात परंतु नियोजन शुन्य असते अनेक टॅंकर खाजगी हॉटेलमध्ये पाणी देतात नगरसेवकांनी संपर्क केला तर टॅंकर वेळेवर मिळत नाही अशी परीसिथती आहे.प्रत्येक महिण्याला माहिती यायला पाहिजे. लहान मशीनरी खरेदी करावी भाडे देणे परवडणारे नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :किती टॅकर भाडेने आहे व किती लागतात

श्री.नासरेखॉन :कच-याच्या गाडीवर टाकी बसवून पाणी दिले जात असे ते टॅंकर कूठे आहे.दुस-यांचे नाव दाखवून येथील कुणाचे तरी टॅंकर भाडयाने घेतले जाते भाडयाने टॅंकर घेण्याची गरज नाही अनेक टॅंकर सेन्ट्रल नाक्यावर नादुरूस्त अवस्थेत आहे त्यावर खर्च केल्यास ते टॅंकर उपयोगात येईल. पावसाळयाचे दिवस आहे पाणी वाटपासाठी टॅंकर घेण्याची गरज आहे का अनेक भागात एक दिवसा आड पाणी दिले जाते जेथे नाही तेथे टॅंकरद्वारे पाणी दिले जाते त्याच टॅंकरने पाणी दयावे नवीन घेण्याची गरज नाही.

श्री.प्रमोद राठोड :जेंव्हा पाण्याची अडचण असेल तेंव्हा घ्यावे सध्या जसे आहे तसे चालू दयावे किती टॅंकरची आवश्यकता आहे सध्या पाण्याची पातळी वाढलेली आहे मा.आयुक्तांनी वार्ड निहाय बैठका घेतल्या वार्डात २-३ दिवसा आड टॅंकर येत असल्याची तक्रार सदस्यांनी त्यावेळी केली.यामूळे ओरड सुरू होते स.संजय चौधरी व मी एन-५ पाण्याची टाकी जेथे टॅंकर भरले जातात तेथे गेलो असता तेथे

वाहनचालकाशिवाय कुणीही कर्मचारी नव्हते वाहनचालक स्वत: ट्रिपा न करता रजिस्टरवर नोंदी करतांना आढळले विचारणा केली असता दोन ट्रिपा केल्या तिसरी भरलेली आहे असे सांगण्यात आले.अशा प्रकारे कामकाज होत असेल तर योग्य नाही किती ही टँकर घेतले तरी अर्थ नाही.सदर ठिकाणी पाहणी केल्यानंतर मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले मा.आयुक्त तातडीने तेथे आहे तरी सुध्दा एकही कर्मचारी तेथे उपस्थित नव्हते.तेथे पाण्याच्या टाकीत कुणी गैरप्रकार केला तर यास जबाबदार कोण जी सिस्टम आहे त्यात सुधारणा करावी. किमान तेथे वॉचमन तरी असावे अशा प्रकारे काम चालले तर नुसते बिल निघेल व पाणी पुरवठा होणार नाही. हा प्रश्न जनतेच्या व आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहेजेथे टँकर भरणा केले जाते तेथे एक चांगली सिस्टम ऑपरेट करावी कुणीही नोंद करेल व टँकर भरणा करून घेवून जाईल असे होवू नये.ज्यावेळी गरज असेल त्याच वेळी टँकर लावण्यात यावे.

श्री.कृष्णा बनकर :ज्या ठिकाणी पाण्याच्या लाईन नाही त्या लोकांनी पैसे भरणा करून टँकर मागविलेले आहे तेथे टँकर असणे आवश्यक आहे गैरप्रकार होत असेल तर कार्यवाही करावी परंतु टँकर भाडयाने लावणे आवश्यक आहे नसता खरेदी करावे.हा प्रस्ताव रद्य करू नये.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्ड क्र. ८१ मध्ये बाजूलाच ६०० फुटाच्या अंतरावर लाईन आहे गुंठेवारी भाग असल्यामूळे इतर लहान लाईन टाकत नाही टँकरने पाणी येते लाईन टाकल्यास टँकरचा खर्च वाचेल लाईन टाकल्यास लोक गुंठेवारीचे रक्कम भरणा करण्यास तयार आहे.

श्री.मुजीब खॉन एकूण किती टँकर आहे किती आवश्यक आहे कोणते कर्मचारी आवश्यक आहे कोणते काम करीत नाही हा प्रशासनाचा भाग आहे त्यात सुधारणा करावी. अनेक वसाहतीतून लोक टँकरचे पैसे भरणा करतात परंतु तेथे पाणी जात नाही पाणी पुरवठा करण्याचे काम महापालिकेचे आहे किती वसाहतीत पाणी पुरवठा केला जातो किती टँकरची गरज आहे सध्या किती टँकर आहे सविस्तर खूलासा घेण्यात यावा.

कार्य.अभि.(पापू) :दोन प्रभागाचा ग्रूप केलेला आहे वार्ड अ व ड येथे कोटला कॉलणी , वार्ड ब व क साठी एन-५ तर वार्ड ई व फ साठी गिरजोदेवी येथील संपवरून पाणी भरले जाते.मनपाच्या मालकीचे एकूण ११ टँकर आहे वार्ड अ व ड मध्ये दैनदिंन फे-या २४ होतात.ऐनवेळी जे लोक पैसे भरणा करून पाणी मागतात त्या साधारणत:९ ट्रिपा होतात.दररोज ३३ ट्रिपा वार्ड अ ड मध्ये केल्या जातात. वार्ड ब व क मध्ये दैनदिंन मागणी केल्या १३ ट्रीपा व महापालिकेच्या टँकर मार्फत २० अशा एकूण ३३ ट्रिपा एन -५ येथून केल्याजातात.वार्ड ई व फ मध्ये ५४ व ३९ अशा ९३ ट्रिपा होतात. एकूण वार्ड अ ते ड मध्ये एकूण ९३ ट्रिपा महापालिकेच्या टँकरने केल्या जातात.खाजगी एकूण १३ टँकर घेतलेले आहे त्या टँकरच्या ९२ ट्रिप होतात. एकूण

२४ टँकर असून सरासरी दिवसाला १८५ ट्रिप होतात. जेवढया ट्रिप केल्या तेवढे बिल काढले जाते.

श्री.राजू शिंदे :खाजगी टँकरवर आजपर्यंत किती खर्च झालेला आहे.

कार्य.अभियंता(पापू) :खाजगी टँकरचा वर्षाला ४० लक्ष खर्च येतो.

श्री.राजू शिंदे :खाजगी टँकरने फक्त २५ टक्के पाणी वार्डात जाते असे माझे मत आहे.महापालिकेच्या टँकरवर पिवळा रंग व काळया रंगाने महापालिकेचे नाव लिहिलेले असते परंतु खाजगी टँकरवर तसे काही लिहिलेले नसते त्यामूळे ते टॉकीवरून पाणी भरून खाजगी मालकास मंगलकार्यालयास पाणी विकत देतात व महापालिकेच्या खात्यावर पैसे पडतात त्यासाठी खाजगी टँकर बंद करावे वर्षाकाठी ४० लक्ष खर्च येतो त्या रक्कमेत नवीन टँकर खरेदी करण्यात यावे.प्रत्येक वार्डात दोन टॅकर दयावे नियोजन करावे पाणी पुरेल व आपली मालमत्ता वाढेल. पावसाळा चालू आहे लगेच पाण्याची तेवढी गरज नाही निधी कमी असेल तर या वर्षी काही व पुढील वर्षी उर्वरीत टँकर खरेदी करावे.हे तात्काळ करावे यामूळे महापालिकेचे नाव राहिल सेवा पुरवेल व जनतेला कळेल की महापालिकेचे टँकर येते.

श्री.आनंद घोडेले :माझ्या वार्डात रस्ता खराब असल्याचे कारण दाखवून खाजगी टँकरवाले येत नाही मला एन-५ येथून घेवून जावे लागते रस्ता खराब असल्याचे सांगून टँकर सध्या बंद केले आहे.नवीन टँकर येईल तो पर्यत खाजगी टँकरने माझ्या वार्डात पाणी चालू ठेवावे त्यावर महापालिकेचा नाव असावे.अनेक टँकर खाजगी मालकाकडे पाणी टाकल्याचे चित्र दिसते याकडे लक्ष देण्याची गरज आहे.सर्व विचार करावा हा प्रस्ताव रद्य करू नये. ही विनंती.

श्री.नासेर खान : आताच म्हटले की दररोज १८५ ट्रिपा होतात शहराला एक दिवसा आड पाणी येते टँकरने दोन दिवसा आड पाणी दिले जाते अधिकारी दररोज पाणी देत असल्याचा खुलासा करीत आहे.

कार्य.अभियंता(पापू) :टँकरने सुध्दा त्या त्या भागात एक दिवसा आड दिले जाते दररोज १८५ फे-या होतात.एका भागात आज पाणी दिले तर दुस-या दिवशी त्या भागात पाणी दिले जात नाही टँकर बंद केल्यास ज्या लोकांनी ९००रू भरणा केले त्या ट्रिपा बंद होतील आता टँकर खरेदी बाबत मुद्या मांडला त्याचे कॅल्क्युलेशन केले जास्त खर्च येतो

श्री.महेश माळवतकर :जेथे लाईन नाही तेथील गरीब वस्तींना टँकरद्वारे पाणी दिले जाते ज्यांनी पैसे भरणा केले त्यांना व काही ठिकाणी मोफत पाणी दिले जाते. याची किती नोंद ठेवली जाते हा संशोधनाचा विषय आहे.पाणी दिले जाते.या विषयावर स.सभापती यांनी जो विषय मांडला त्यास गांभीर्याने घेतले जावे.सध्या कोणतेही टँकर बंद करू नये परंतु भाडयाने घेतलेल्या टँकरसाठी लाखो रू. खर्च करतो ते भविष्यात बंद होईल असे नियोजन करावे.महापालिकेने टँकर घेवून जेथे पाणी मिळत नाही तेथे देण्याचे नियोजन केले पाहिजे.

श्री.राजू शिंदे :जेथे टँकरने पाणी दिले जाते तेथे अगोदर पाईपलाईन असेल जसे मुंकूदवाडी भागात एका वस्तीत लाईन टाकलेली आहे परंतु त्या

लाईनवरून पाणी का देवू शकत नाही तसेच स.सदस्य श्री.मुंडे यांचे वार्डात सुध्दा २०० फुटावर सर्व्हीस लाईन आहे तेथून लाईन टाकली तर त्यांचे वार्डात पाणी येवू शकेल.तेथेही टँकरने पाणी दिले जाते पुढील लाईन टाकल्यास टँकरचा खर्च येणार नाही. टँकरने दिलेले जाणारे पाणी ७५ टक्क्के वाया जाते फक्त २५ टक्केच पाणी नागरीकापर्यत जाते यासाठी पर्याय शोधणे आवश्यक आहे.

कार्य.अभि.(पापू) :टँकरने फक्त १०० लि.चा ड्रम भरून दिला जातो तेच पाणी लाईनमधून दिल्यास सिस्टीम लॉसेस होईल फक्त १०० लि. पाणी देणे इतकी सिस्टीम लाईनद्वारे नाही.गुंठेवारी भागात महापालिकेच्या मानवतेच्या दृष्टीकोनातून पाणी पुरवठा करीत आहोत

श्री.राजू शिंदे :जेथे लाईन आहे तेथे टँकरने पाणी न देता १० मिनिटे लाईनवरून पाणी दयावे.

कार्य.अभियंता(पापू) :अशा पाणी देण्याची शिस्टम नाही.त्यात लिकिजेसचा विचार केला तर १०-१५ मिनीट पाणी देवू शकत नाही.

श्री.राजू शिंदे :नवीन लाईन टाकलेली असेल एकदाही ओपन केली नाही तेथे लिकिजेसचा प्रश्न येत नाही एका गल्लीत ४५ मिनीटे दुसऱ्या गल्लीत १०-१५ मिनीटे पाणी देवू शकत नाही का? टँकरने सुध्दा पाणी लिकिजेस होते.

कार्य.अभियंता(पापू) :वाढीव जेंव्हा पाणी येईल तेंव्हा विचार करता येईल सध्याच्या सिस्टीमनुसार १०-१५ मिनिटे पाण्ी देणे शक्य नाही टँकरने पाणी देणे वेगळे आहे.टँकरने तेवढे पाणी वाया जात नाही.१५-२० लिटर पाणी वाया जात असेल.

श्री.राजू शिंदे :कमी प्रमाणात वॉल ओपन करून १०-१५ मिनिटे पाणी देवू शकतो.

कार्य.अभियंता(पापू) :असे अनेक भाग आहे. १८५ फे-या होत असलेल्या ठिकाणी लाईन टाकणे शक्य होत नाही.

श्री.राजू शिंदे :लाईन टाकण्याची गरज नाही जेथे लाईन आहे तेथील प्रश्न मांडला.

कार्य.अभि.(पापू) :१-२ भाग असतील तेथे लाईन असेल.ते तपासून घेतले जाईल.

श्री.राजू शिंदे :स.श्री. मुंडे यांनी आताच म्हटले चुकीचे बोलले नाही.

कार्य.अभियंता(पापू) :स.सदस्या सोबत जावून तेथे पाहणी केली जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :यामध्ये पॉलीसी डिसीजन घेण्याची गरज आहे. गुंठेवारी भागात पाणी दयावे आदेशीत करावे चर्चेचा विषय येत नाही.

श्री.राजू शिंदे :लिगल इलिगल ज्याही भागात लाईन टाकलेली असेल तेथे १०-१५ मिनिटे पाणी देण्याचे रूलींग दयावे.तसेच टँकर खरेदीसाठी मंजूरी दयावी.एक गल्लीत पाणी दिले जाते बाजूच्या गल्लीत पाणी देवू शकत नाही का?

कार्य.अभियंता(पापू) :त्यासाठी पाणी जास्त लागेल तेवढे पाणी नाही.एकदा पाणी सुरू झाल्यावर कन्ट्रोल करता येत नाही ३० मिनीट नंतर ४५ मिनीट असे ठेवावे लागते.

श्री.राजू शिंदे :ज्या वार्डात पाईपलाईन टाकलेली आहे तेथे १५ मिनिटे तरी पाणी दयावे तसेच १००-२०० फुटापर्यत लाईन असेल अशा भागातीलही पाण्याचा प्रश्न सोडवावा.

श्री.संजय जोशी :जेथे टँकरने ड्रम मध्ये पाणी दिले जाते वसूली किती होते.व एकूण किती लि. पाणी दिले जाते.

कार्य.अभियंता(पापू) :वार्ड अ मध्ये १० हजार लि. चे ३ ,एक ५ हजार लि.चे आहे. वार्ड ब व क साठी १० हजार लि.चे २ टँकर आहे.५०००,३००० हजार लि.चे एक वार्ड ई व फ साठी १०००लि. २ व ५००० लि.चे एक असे एकूण ११ टँकर हे महापालिकेचे आहे.एकूण २५ लक्ष लि. पाणी टँकरद्वारे दिले जाते.

श्री.सुशिल खेडकर :रामकृष्ण नगर येथे १०-१२ वर्षापूर्वी एक लाईन टाकलेली आहे.अदयाप कनेक्शन का दिले नाही. त्या भागातील नागरीक गुंठेवारीत नाही स्लमपण नाही १०० टक्के टॅक्स जमा होतो असे असतांना त्या नागरीकांना पाणी का दिले जात नाही जर पाणी देवू शकत नाही तर लाईन का टाकण्यात आल्या.खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :संबधीत अधिका-यांना सुचना देण्यात येते की टँकरला पिवळा रंग लावावा त्यावर महानगरपालिकेचे नाव लाल अक्षरात ठळक असावे ज्या टँकरवर अशा प्रकारे लिहिलेले नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी.एकूण टँकर किती त्यावर किती कर्मचारी आहेत किती लिटर पाणी टँकरद्वारे पुरविले जाते.त्याचा अहवाल माझेकडे प्रशासनाने तात्काळ सादर करावा.गुंठेवारी भागात पाण्याची लाईन टाकत नाही तरी सुध्दा जेथे जेथे पाण्याच्या लाईन टाकलेल्या आहेत परंतु काही ठिकाणी पाणी दिले जात नाही अशा ठिकाणी संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी देणे शक्य असले तर तेथे पाणी देण्याची व्यवस्था करावी

श्री.राजू शिंदे :जेथे लाईन टाकलेल्या आहे तेथे १५ मिनिटे तरी पाणी दयावे असे रूलींग दयावे.

श्री.सुशिल खेंडकर :जेथे लाईन टाकल्या आहे तेथे पाणी देण्याचे आदेशीत करावे.

श्री.संजय चौधरी :वार्ड २३ मध्ये शहानगर भागात ४ वर्षापूर्वी लाईन टाकलेली होती पाणीही देण्यात आले आता ते पाणी बंद केले पाण्याची अडचण येते म्हणून बंद केले असे उत्तर दिले जाते यापूर्वी त्या भागास पाणी दिले आता देण्यास हरकत नसावी.

मा.महापौर :या संबधी सविस्तर अहवाल मागवून घेते व निर्णय देते.

श्री.राजू शिंदे. :एका वार्डचा प्रश्न नाही जेथे जेथे गुंठेवारी भाग येतो.व इतर ठिकाणी जेथे लाईन टाकली असेल तेथे १५ मिनिटे तरी पाणी दयावे अशी विनंती.

मा.महापौर :पाणी दिल्यानंतर टँकरचे पैसे पण मंजूर करतील.आता समांतर जलवाहिनी सुरू करतोच आहोत संपूर्ण शहराला पाणी देणार आहोत.

श्री.राजू शिंदे :समांतर जलवाहिनी येईल त्यास वेळ लागेल.आता जी अडचण आहे ती सोडवावी सर्वच वार्डातीलहा प्रश्न आहे.

श्री.नासेर खॉन :वार्ड ६२ मध्ये कोटला कॉलनीत पाण्याची टाकी असून त्या लगत माझा समतानगर वार्ड आहे या भागात पाण्याची लाईन टाकलेली आहे अदयाप पाणी दिले नाही अशा प्रकारे शहरात अनेक ठिकाणी लाईन टाकलेल्या आहेत याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

| | |
|---|---|
| मा.महापौर | विषय क्र.९४ मंजूर करण्यात येतो जेथे जेथे जलवाहिनी टाकलेली आहे परंतु पाणी दिले नाही अशा ठिकाणची संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी आणि त्या भागात १५-१५ मिनिटे पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| श्री.नासेर खान | :सेन्ट्रल नाक्यावर नादुरूस्त टँकर आहे ते दुरूस्त करून घ्यावे नवीन घेण्याची गरज पडणार नाही तसे भाडयाने घ्यावे लागणार नाही. |
| मा.महापौर | :उन्हाळयात टँकरची आवश्यकता पडते. त्यासाठी ठेवणे आवश्यक आहे. |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहराच्या ज्या भागात जलवाहीनी टाकण्यात आलेल्या नाही तसेच ज्या भागात जलवाहिनीद्वारे पुरेसा पाण्ी पुरवठा होत नाही अशा भागात नागरीकांच्या मागणी प्रमाणे टॅकरद्वारे पाण्ी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे उपलब्ध टँकर कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर खाजगी पाण्याच्या टँकरच्या भाडयापोटी एक वर्षासाठी सर्वसाधारणपणे रुपये ८७.३० लक्ष खर्च अपेक्षित असून प्रत्यक्षात रु. ३०.०० लक्ष ठेवण्यात आलेल्या तरतुदीनुसार रू.३०.०० लक्ष च्या कामासाठी निविदा मागविण्यास व प्राप्त होणाऱ्या निविदा दरानुसार आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठा करण्याकरीता खाजगी टँकर एक वर्षासाठी भाडे तत्वावर लावण्या करीता आणि त्यापोटी होणाऱ्या एकुण खर्चाला मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सध्या पट्टीयोग्य मूल्यावर आधारीत आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कराऐवजी भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीचा पर्याय उपलब्ध करुन देणाच्या उद्देशाने महानगरपालिका व नगरपालिका अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या असून, यासंबंधीचा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१०/२०१०, दिनांक २७ एप्रिल, २०१० रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील तरतूदी दिनांक १ जून, २०१० पासून लागू करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाचे सचिव, मनु कुमार श्रीवास्तव नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी अशापत्र क्रमांक: एमएमसी २०१०/२०८/ प्र.क्र.९६/ नवि३२ दिनांक ३१/०७/२०१० द्वारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

वरीलप्रमाणे महानगरपालिका/नगरपालिका कायद्यामध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने भांडवली मूल्यावर आधारीत कर प्रणाली आपल्या महानगरपालिकांमध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ पासून लागू करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकांची मान्यता मिळविण्यात यावी.

ही कर प्रणाली लागू करण्यासाठी पूर्व तयारी करणे आवश्यक असून त्यासाठी सर्व मालमत्तेचे सर्वेक्षण करुन त्या ठिकाणी लागू असलेल्या मुद्रांक शुल्क शिघ्र गणकाच्या आधारे प्रत्येक मालमत्तेचे भांडवली मूल्य ठरवून या भांडवली मूल्यावर महानगरपालिकेमार्फत आकरण्यात येणाऱ्या विविध कराचे दर ठरवून कायद्यातील तरतूदीनुसार एकुण येणाऱ्या मालमत्ता कराची परिगणना करणे आवश्यक आहे. ही कार्यवाही दिनांक ३१ मार्च, २०११ पूर्वी पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्वरीत पुढील पाउले उचलावीत. म्हणजे सदर कर प्रणाली दिनांक १ एप्रिल, २०११ पासून लागू करण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

वरील पत्रानुसार १ एप्रिल २०११ पासून सदर कर प्रणाली लागु करण्यासाठी उपरोक्त शासनाच्या पत्रानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे. त्यासाठी शहरातील सर्व नविन मालमत्तेचे सर्वेक्षण करुन मुद्रांक शुल्क शिघ्र गणकाच्या आधारे प्रत्येक

मालमत्तेचे भांडवली मुल्य ठरवून त्या भांडवली मुल्यावर महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या विविध कराचे दरानुसार कर आकारणी करण्यात येईल.

सदरील कराची अंमलबजावणी दि. १ एप्रिल २०११ रोजी अस्तित्वात येणाऱ्या मिळकतीवर (मालमत्तावर) करण्यात येईल.

वरीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तसेच मंजुरीस्तव सादर.

श्री. मुजीब खान :कर आकारणी वाढविण्या संदर्भात यापूर्वी विशेष सभा घेतली होती.प्रशासनाकडील घराची संख्या व कोर्टनुसार असलेली सख्या याचा ताळमेळ लागत नव्हता म्हणून प्रशासनास सर्व माहिती घेवून दुरूस्ती करून सादर करण्यासाठी एक महिण्याचा वेळ दिला जे लोक इमानदारीने कर भरतात त्यांचेवरच हा कर लादला जावू शकतो हे आपण एप्रिल २०११ पासून लागू करणार आहे. त्या अगोदर शहरातील पूर्ण सर्वे करावा जो की जेथे टॅक्स लागलेला नाही ,कमी लागलेला आहे,घरे किती कमर्शियल ही सर्व माहिती आली तर त्यानुसार किती कर वाढवू शकतो याचा विचार करता येईल तुर्त हा प्रस्ताव स्थगित ठेवावा शहरात कमर्शियल किती, घरे किती, वार्डनिहाय आरसीसी, मोठे/लहान तसेच स्लम भागातील घर याची अ,ब,क,ड वर्गवारी करून माहिती देणार होते ती ही आजपर्यत सादर केली नाही.या बाबतीत सर्व सर्वे करण्यासाठी १ महिण्याचा वेळ घेतला होता तो होऊ दयावा माझ्या बाजूच्या एका बिल्डीगला ३२४रू दोन रूम असलेल्यांना ६०००रू टॅक्स त्यांचेच करात पुन्हा वाढ होईल त्यासाठी हे सर्व क्लिअर करून आणावे त्यानुसार किती प्रमाणात वाढ करावी किती सर्वे झाला, किती उत्पन्न आहे किती यायला पाहिजे एक महिना प्रशासनाने वेळ घेतलेला आहे.माहिती समोर यावी त्यानंतर यास मंजूरी दयावी तोपर्यत यास स्थगिती दयावी.

श्री.संजय जोशी :रेडीरेकनर प्रमाणे टॅक्स लावणार परंतु किती टक्के लावणार उदा.समर्थनगर किंवा इतर ठिकाणी शासनाच्या नियमाने २०००रू क्वे.फुट रेट आहे तर त्या रेडीरेकनरच्या किती पर्सेन्टेंज प्रमाणे टॅक्स आकारणी करणार यापूर्वी ४.५० रू च्या ऐवजी ९.५०रू प्रमाणे मंजूरी करून घेतली होती.किती प्रमाणात टॅक्स लागेल प्रशासनाने खुलासा करावा.उदा. पन्नालालनगर भागात एक घर त्यास जर प्रतिवर्ष २०००रू कर भरावा लागतो त्या समोर असलेल्या रिकाम्या प्लॉटवर एप्रिल २०११ मध्ये घर झाल्यास त्यांना किती कर भरावा लागेल. याची माहिती दयावी. त्यानंतर यावर विचार करता येईल.

श्री.गिरजाराम हळनोर :एखादया इमारतीचा एनआरव्ही फिक्स केला तर तो बदलत नाही. सध्या मार्केटमध्ये काय रेट चालू आहे ती इमारत कशा पध्दतीची बांधलेली आहे.त्यावर एनआरव्ही फिक्स होते. एकाच इमारतीस दोन एनआरव्ही असूच शकत नाही एनआरव्ही चेंज करता येते का लिगल विभागाकडून खुलासा घ्यावा?

श्री.संजय जोशी :यात १ एप्रिल २०११ पासून दिले सर्व प्रॉपर्टीसाठी आहे का ?

श्री. त्रिंबक तुपे :हे २०११ नंतर की पुर्वी, इतर महानगरपालिकेने केले का ?

श्री.राजू शिंदे :सध्या ज्या इमारतीस,घरास टॅक्स आकारतो त्याच घरांना कर धारकांना हा टॅक्स लावणार आहे का ?विद्यमान की नविन कर

भरतात त्यांना की नविन जे कर भरणा करीत नाही त्यांचेवर आजपर्यंत काय केले.स्थायी समिती व या सभागृहात सुध्दा यापूर्वी प्रभाग कार्यालय निहाय उपआयुक्त नियुक्त करून नवीन मालमत्ता शोधून टॅक्स आकारणी करावी असे सुचना दिल्या होत्या आजपर्यंत त्या अधिका-यांनी किती मालमत्ता शोधल्या त्यांना टॅक्स आकारणी केली याची माहिती दयावी नसता जे नागरीक कर भरतात त्यांचेवर पुन्हा हा कर लादला जाईल.

श्री.संजय जोशी :किती टक्के टॅक्स लागणार याचा खुलासा करावा.

सौ.किर्ती शिंदे :ज्या मिळकतीवर थकबाकी आहे त्याची वसुली करावी ज्यां इमारतीना टॅक्स लागलेला नाही तो लावून घ्यावा ज्या मिळकतीचा कराच्या संदर्भात वाद चालू आहे समझोता करून ते रेग्यूलर करण्यात यावे यामूळे वसुलीत वाढ होईल.

श्री.राजू शिंदे :ही कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक प्रभागासाठी उपआयुक्तांची नेमणूक केली होती.१-२ महिने झाले असेल आतापर्यंत किती वादग्रस्त प्रकरणे व टॅक्स न लागलेल्या नवीन इमारती शोधून प्रकरणे निकाली काढली.किती घरापर्यंत महापालिकेचे अधिकारी यांनी संपर्क केला याचा सविस्तर अहवाल ठेवावा.यासाठी स्वतंत्र बैठक आयोजित करावी जेथे टॅक्स लागलेला नव्हता तो लावून घेणेसाठी उपआयुक्तांची नेमणूक केली त्यांनी आतापर्यंत काय काम केले खुलासा घ्यावा.सभागृहात स.सदस्य तळमळीने बोलतात.चर्चा करतात प्रशासनाला आदेशीत केले जाते अधिकारी त्याची दखल घेत नसेल तर याला अर्थ नाही.

श्री.प्रमोद राठोड :उपआयुक्तांची टॅक्स वसुलीच्या संदर्भात जी नियुक्ती केली होती त्यांनी कोणकोणत्या प्रभागात कोणत्या मालमत्तेला टॅक्स आकारणी केली याचा सर्वे जोपर्यंत सादर होत नाही तोपर्यंत हा विषय स्थगित ठेवावा.

श्री.राजू शिंदे :जे अधिकारी नियुक्त केले होते त्यांनी काम केलेले आहे का प्रभाग निहाय खूलासा घ्यावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कर निर्धा. व संकलक :कॅपीटल व्हॅल्यू जो टॅक्स आहे त्या संबधीत जे प्रश्न उपस्थित केले.

श्री.राजू शिंदे प्रभाग निहाय कार्यवाही करण्यासाठी अधिकारी यांची नियुक्ती केली होती त्यांनी टॅक्स नसलेल्या किती मालमत्तांना टॅक्स आकारणी केली किती वादग्रस्त प्रकरणे निकाली काढली हा अगोदर खुलासा करावा.मालमत्ता संख्येत वाढ झाली पाहिजे उत्पन्न आले पाहिजे या मताशी सभागृह आहे

कर निर्धा.व संकलक :१ एप्रिल २०१० ते १६ सप्टेंबर पर्यंत मालमत्ता कराची एकूण वसुली वार्ड कार्यालय अ ते फ मिळून १०,६५,८७,९१०रू इतकी झालेली आहे.याच कार्यकाळात पाणीपटटीची एकूण वसुली रू.३,४७,७६,४०० /-इतकी झाली आहे.

श्री.राजू शिंदे :अशी माहिती देवून सभागृहाची दिशाभूल होते प्रभाग वाईज ही माहिती दयावी की अधिका-याची नियुक्ती केलेली होती किती वसुली

झाली नवीन किती मालमत्ता शोधल्या किती वादग्रस्त कराची प्रकरणे निकाली काढली.

कर निर्धा. व संकलक :नवीन इमारतींना टॅक्स आकारणी करणे हे वार्ड कार्यालयाच्या स्तरावर आहे.चालू वर्षात जवळपास ३००० मिळकतींना मालमत्ता कर आकारणी केली आहे.

श्री.राजू शिंदे :पूर्ण वर्षाची माहिती नको आहे.मा.आयुक्तांनी उपआयुक्त यांना प्रभाग निहाय नवीन प्रॉपर्टी शोधाव्या त्यास,टॅक्स आकारणी करावी ज्यांना जास्तीचे लागलेला टॅक्स बाबत कार्यवाही करणे , वादग्रस्त प्रकरण निकाली काढावे या संबधीत आदेश काढलेले होते संबधीत अधिकारी यांनी काय कार्यवाही केली पूर्ण वर्षाची माहिती देवू नये.

कर निर्धा.व संकलक :कर निर्धा. व संकलक या नात्याने मागिल ०२ महिण्यात २० प्रकरणाच्या बाबतीत सुनावणी घेतली आहे.

श्री.राजू शिंदे :कोणत्या प्रभाग कार्यालयातील प्रकरणे आहे.

कर निर्धा. व संकलक :वार्ड निहाय माहिती देता येणार नाही मात्र संपूर्ण शहरातील एकूण २० प्रकरणाच्या सुनावणी घेतल्या आहेत.

श्री.राजू शिंदे :वार्ड निहाय माहिती अपेक्षीत आहे.की किती मिळकती नवीन शोधल्या कितींना टॅक्स लावला किती मिळकतीचे वादग्रस्त प्रकरण निकाली काढले.कर निर्धा. व संकलक यांचेकडे कोणते वार्ड कार्यालय होते उर्वरीत उपआयुक्ताकडे कोणते होते सर्वांची माहिती घ्यावी

कर निर्धा. व संकलक :वार्ड अ व क माझेकडे दिलेले होते. कर निर्धा. व संकलक म्हणून सर्व शहराची जबाबदारी माझेकडे आहे गेल्या दोन महिण्यात २० प्रकरणाची सुनावणी घेतली आहे.सोबत वार्डाची आकडेवारी उपलब्ध आहे.

श्री.राजू शिंदे :संबधीत अधिकारी यांचेकडे जे प्रभाग कार्यालय होते त्याचीच माहिती त्यांचेकडे नाही हे योग्य नाही.

कर निर्धा. व संकलक : २ महिण्यात २० प्रकरणाची सुनावणी घेतली ही सुनावणी महापालिकेत कर निर्धा. व संकलकच घेतात.

श्री. राजू शिंदे :चुकीची माहिती देवून सभागृहाचा वेळ वाया घालत आहे.ज्या अधिका-याकडे ज्या प्रभाग कार्यालयाची वसुलीची जबाबदारी सोपविली होती ते अधिकारी एकाही नवीन मालकत्ता धारकापर्यत पोहचले नाही वादग्रस्त प्रकरण निकाली काढले नाही त्या प्रभागात गेलेच नाही.कर निर्धा व संकलक यांचेकडे जे प्रभाग होते त्या वार्ड कार्यालयात बैठक आयोजित केली त्या बैठकीत संबधीत अधिकारी हजर नव्हते.

कर निर्धा. व संकलक :वार्ड अधिकारी यांचे स्तरावर दोन बैठक घेतलेल्या आहेत.

श्री.राजू शिंदे : प्रभाग समितीची बैठक होती संबधीत अधिकारी हजर होते का ?

कर निर्धा. व संकलक :सदर बैठकीला मी हजर नव्हतो.

श्री.राजू शिंदे :प्रभाग समितीची बैठक होते हजर न राहण्याचे कारण काय यास कोण जबाबदार आहे कराच्या संदर्भात वादग्रस्त असलेली किती प्रकरणे दोन महिण्यात निकाली काढली.किती नवीन मालमत्ता शोधल्या व त्यांना कर आकारणी केली २ महिण्यात अधिकारी काहीच करू शकत नसतील तर वर्षभरात काहीही करणार नाही असे वाटते.मा.आयुक्त व पदाधिकारी यांनी मालमत्ता व पाणीपटटी

वसुलीच्या संदर्भात कितीही तळमळीने विषय मांडले व परीस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला तरी सक्सेस होणार नाही कारण कनिष्ठ स्तरावरील कामाची सिस्टम बरोबर नाही.शासनाकडील जे अधिकारी येथे येवून सुध्दा जर अधिकारी सांगितलेले काम करीत नसेल वसुली होत नसेल व उत्पन्नात वाढ होत नसेल तर अशा अधिका-यांनकडून येथील सेवा घेण्याची गरज आहे का असा प्रश्न पडतो.

श्री.प्रमोद राठोड प्रत्येक वार्डमध्ये किती वसुली बाकी आहे व कोणत्या मालमत्तेला किती टॅक्स लागलेला आहे याची यादी त्या त्या वार्डच्या स.सदस्यांना देणार होते अदयाप यादी दिली नाही स.सभासद महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे सभागृहात स.सदस्यांनी प्रश्न करायचे प्रशासन पाठपुरावा करणार नाही हे योग्य नाही.अदयापपर्यंत का माहिती दिली नाही.प्रत्येक वार्डातील घर नं. निहाय वसुलीच्या संदर्भात माहिती देत नाही तोपर्यंत कुणाकडे किती थकबाकी आहे हे कळणार नाही.वार्ड निहाय थकबाकी व वसुली किती झाली हे सांगण्याला अर्थ नाही.जनतेच्या हितासाठी व महापालिकेचेही उत्पन्न वाढवावे.माहिती देण्याचे सांगितले का दिली नाही.

मा.महापौर : रेकॉर्ड तयार ठेवावे सभेत माहिती विचारली जाईल ४ वेळेस सुचना दिल्या तरी ही पुर्ण माहिती दिली नाही.

श्री.प्रमोद राठोड :मागिल बैठकीत चर्चा झाली त्यानुसार सर्व सदस्यांना याची माहिती देण्याचे ठरले माहिती देत नाही याचा अर्थ वेगळे उत्पन्न मिळवून भष्ट्राचार होतो काय जालना रोडवरील कमर्शियल नळ कनेक्शनची संख्या किती माहिती दिली होती प्रशासन वार्डवाईज थकबाकीदाराची यादी देवू शकले नाही याला अर्थ नाही.कॅनॉट प्लेस येथील एका बॅकेंत आपले कर्मचारी वसुलीसाठी सुरक्षारक्षकाकडे विचारणा करतात त्यांनी सांगितले की साहेब कामात आहे नंतर यावे कर्मचारी परत येतात अशा पध्दतीने वसूली होणार नाही.स.सदस्यांना विश्वासात घेवून थकबाकीदाराची यादी दिली तर कुणाकडे किती बाकी आहे ते कळेल प्रत्येक वेळी अशी अयोग्य उत्तरे देणे बरोबर नाही.

मा.महापौर :उर्वरीत उपआयुक्त यांनीही काय काम केले माहिती दयावी

श्री.प्रमोद राठोड :मा.आयुक्त, मा.महापौर,सर्व पदाधिकारी तसेच मी ही ४ वेळेस या संबधी माहिती देण्याचे कळविले दिली जात नाही.माहिती न देण्यास कोण मदत करीत आहे.

मा.उपमहापौर :उपआयुक्तांचा खुलासा घ्यावा काम केले नसेल तर कार्यवाही करावी.

कर निर्धा. व संकलक :ज्या डिमांड नोटीस उपलब्ध आहे त्या वार्डनिहाय नाही.एका प्रभाग कार्यालय अंतर्गत कमीत कमी १७ वार्ड येतात.

श्री.राजू शिंदे :१७ वार्ड असेल तरी एक उपआयुक्ताची नेमणूक केली आहे.माहिती कलेक्ट करायला पाहिजे होती.

श्री.मुजीब खान :अधिकारी योग्य खुलासा देत नसेल शासनाकडील जे अधिकारी आले ते काम करीत नसेल तर त्यांना परत पाठवावे वार्डनिहाय माहिती देता येत नाही असे उत्तर अपेक्षीत नाही.काम करीत नसेल वसुली वाढत नसेल तर त्यांना परत पाठवावे.उपआयुक्त पदावर जे

| | |
|---|---|
| | आले त्यांना परत पाठवावे प्रशासनातील इतर अधिका-याकडून काम घेता येईल. |
| श्री.राजू शिंदे | :एक प्रभाग कार्यालय अंतर्गत १७ वार्ड तर दोन मिळून एकूण ३४ वार्ड येतात त्यासाठी एक उपआयुक्त व त्यांचेकडे दिलेला कर्मचारी वर्ग काम करू शकतात |
| श्री.संजय चौधरी | :नवीन कर आकारणीसाठी कोणते अधिकारी नेमलेले आहे. |
| श्री.राजू शिंदे | :नियुक्त्या केल्यावेळेवर एवढी मोठी जबाबदारी पेलणार नाही असे अधिका-यांनी सांगायला पाहिजे होते २ महिण्याचा कालावधी गेल्या नंतर अधिकारी सांगातात कामाचा व्याप मूळे काम करता आले नाही किंवा माहिती देता येत नाही.याचा अर्थ अधिकारी अकार्यक्षम आहे काम करू शकत नाही.अशी कबुली मिळते दिलेल्या प्रभागाची माहिती घेता येत नसेल , काम करता येत नसेल, कामाचे नियोजन करता येत नसेल तर अशा अधिका-यांना येथे ठेवणे योग्य नाही त्यांना त्या पदावर राहण्याचा काहीही अधिकार नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :वार्ड निहाय माहिती देण्याचे मा.महापौर यांनी आदेशीत केले त्यानुसार माहिती का देता येत नाही याचा खुलासा करावा.स.सदस्य उत्पन्न वाढविण्यासाठी यादीची मागणी करीत आहे आम्ही सर्व मदत करण्यास तयार आहोत. |
| श्री.राजू शिंदे | :कर आकारणी विभागासाठी नवीन कार्य. अभियंता नेमावे त्यांचेकडे जबाबदारी दयावी. |
| श्री.विजेंद्र जाधव | : शासनाकडून आलेले जेवढे अधिकारी आहे ते योग्य प्रकारे काम करीत नसेल तर त्यांना परत पाठवावे. |
| श्री.राजू शिंदे | मा.महापौर,नगरसेवक किंवा मा.आयुक्तामूळे महापालिकेची आर्थीक परीस्थिती खराब झाली नसून संबधीत जे निष्क्रीय अधिकारी आहे ते वसुलीचे काम चांगले करीत नसल्यामूळे ही परीस्थिती निर्माण झाली यामूळे महापालिकेची अधोगती होणार आहे.अशा अधिका-यावर कार्यवाही करावी ज्यांच्या नियुक्त्या केल्या होत्या त्या सर्वांकडून खुलासा घ्यावा. |
| मा.महापौर | :उपआयुक्त (प्र.) यांनी त्यांचे प्रभागा विषयी माहिती दयावी. |
| श्री.राजू शिंदे | :संबधीत अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे |
| प्र.उपआयुक्त (प्र.) | :माझेकडे वार्ड ब ची जबाबदारी दिली होती.वार्ड ब चे मा.सभापती यांचे सोबत कर वसुलीच्या बैठकीला उपस्थित होतो.तसेच स्वतंत्र बैठक सुध्दा वार्ड अधिकारी ,कर निरीक्षक यांचे समवेत घेतली .१ लक्ष पेक्षा जास्त रक्कमेचे थकबाकीदार यांची यादी तयार करून ती माझेकडे देण्याच्या सुचना केल्या त्यानुसार संबधीताकडे जावून वसूलीसाठी कार्यवाही करता आली व त्यांचे सोबत पर्सनल बैठक घेवून कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.तसेच अशा प्रकारे वार्ड क मध्ये ही बैठक घेतली आहे.मोठे थकबाकीदांची काहींची नावे माझेपर्यत आलेली आहे.त्यानुसार संबधीताकडे जावून लवकरच वसुलीसाठी प्रयत्न करणार आहोत. |
| श्री.राजू शिंदे | :किती थ्रकबाकीदारांना नोटीसा दिल्या नवीन किती मिळकती शोधल्या.वादग्रस्त प्रकरणे किती निकाली काढली. |

| | |
|---|---|
| श्री.मीर हीदायत अली | :डिमांड नोटीस दिल्या त्यानंतर काय कार्यवाही केली. आयुक्त श्री.भोगे साहेब असतांना थकबाकी यांचे घरासमोर ढोल वाजविले जात होते ज्यामूळे थ्रकबाकीदार अपमानीत होवून कर भरणा करीत होते त्या प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना मागिल बैठकीत दिल्या तशी कार्यवाही होते का ? |
| श्री.मुजीब खान | :कोणत्या वार्डात किती नोटीसा व कुणास दिल्या माहिती दयावी. |
| उपआयुक्त (प्र) | :वार्ड क मध्ये ३४ नवीन मिळकती शोधल्या सदर रेकॉर्ड सेक्शनमध्ये आहे. |
| श्री.त्र्यंबक तुपे | :२-३ लोकांची नावे सांगावी. |
| श्री.मुजीब खान | :हीच माहिती अपेक्ष्ीत आहे.जेंव्हा विषय समोर येतो त्या संबधी सर्व माहितीसह प्रशासनाने यायला पाहिजे नुसती चर्चा करणार प्रश्न मांडणार कार्यवाही होणार नसेल तर योग्य नाही आर्थीक परीस्थितीचा विचार करता करावा नोटीसा देवून वसुली केंव्हा करणार आहे.सदस्यांना माहिती असते अधिका-यांकडे नाही हे योग्य नाही. |
| श्री.हिदायत अली | :रेकॉर्डवर १.४३ लक्ष तर शहरात एकूण २ ते २.५ लक्ष मालमत्ता असतील ज्या रेकॉर्डवर नाही त्या आतापर्यत किती मिळकती शोधल्या . |
| श्री.राजू शिंदे | :अधिकारी मा.आयुक्तांची दिशाभूल करतात बैठका घेतल्या अमुक प्रयत्न केले सभागृहात स्पष्ट खुलासा देवू शकत नाही हे योग्य नाही. |
| मा.महापौर | :मालमत्ता आणि करा विषयी विशेष सभा लावू तोपर्यत प्रशासन अहवाल तयार करतील विषय क्रमांक ९५ हा रद्य करण्यात येतो. |
| श्री.राजू शिंदे | :विषय रद्य करू नये स्थगित करावा परंतु ज्या प्रमाणे आताच काही अधिकारी यांनी वार्डात जावून बैठका घेतल्या वसुलीच्या सुचना दिल्या उर्वरीत प्रभागाचे अधिकारी याचाही खुलासा घ्यावा. |
| श्री.मुजीब खान | :प्रस्ताव स्थगित ठेवावा. |
| श्री.प्रमोद राठोड | :प्रत्येक वार्डमध्ये कुणाकडे किती थकबाकी आहे त्याची यादी केंव्हा मिळेल मा.आयुक्तांनी खुलासा करावा. |
| श्री.मुजीब खान | :शासनाकडून जे उपआयुक्त पदावर अधिकारी आले त्यांनी कुणीही काम केलेले नाही त्यांना परत पाठवावे.सभागृहातील अधिकारी चर्चा गांर्भीर्याने घेत नाही.त्यांना काम दयावे.माहिती देता येत नाही असे उत्तर अपेक्षीत नाही सभागृहाने निर्णय घेतलेला आहे वार्ड निहाय थकबाकीदाराची नावे स.सदस्यांना देणे आवश्यक होते.जेणे करून वसुलीत वाढ होवून महापालिकेची आर्थीक परीस्थिती सुधारेल अशी माहिती देता येत नाही असे अधिकारी सांगतात हे योग्य नाही.एक मताने ठराव घ्यावा शासनाकडील अधिकारी त्यांना परत पाठवावे.प्रशासनातील इतर अधिकारी यांचेकडून काम करून घेता येईल. |
| श्री.राजू शिंदे | :ज्या अधिका-यांनी काम केले असेल त्यांना राहू दयावे ज्यांनी नवीन मालमत्ता शोधली नसेल टॅक्स लावला नसेल वादग्रस्त प्रकरणी निकाली काढले नसेल अशांना शासनाकडे परत पाठवावे. |

उपआयुक्त(सिडको) :माझेकडे वार्ड समिती ई व फ देण्यात आले होते.माझेकडील विभागाचे काम सांभाळून वार्ड फ मध्ये दोन वेळा वार्ड अधिकारी /कर्मचारी यांच्या बैठका घेतल्या व वसुली वाढविण्यासाठी जी पध्दत आहे ती सुधारण्याचा प्रयत्न केला तसेच वार्ड ई कार्यालय अंतर्गत एक वेळा बैठक घेतली.संबधीत अधिकरी व कर्मचारी यांना सुचना दिलेल्या आहे.

श्री.राजू शिंदे :आतापर्यत किती नोटीसा दिल्या किती प्रकरणे निकाली काढली किती नवीन मालमत्ता शोधल्या किती लोकांनी थकबाकी भरणा केली कीतीकडे बाकी आहे वार्ड ई व फ ची माहिती दयावी.

उपआयुक्त(सिडको) :पुढील महिण्यापर्यत कार्यवाही केली जाईल.

श्री. राजू शिंदे :दोन महिण्यात का कार्यवाही केली नाही.महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रभाग वाईज सिस्टम केली होती त्यानुसारही कार्यवाही होत नसेल तर वेगळा पर्याय काय अधिकारी वसुली करीत नसेल तर लोकप्रतिनिधींनी वसुली करावी का असा प्रश्न पडतो.

श्री.प्रमोद राठोड :यापूर्वी मा.आयुक्त यांनी प्रभाग निहाय बैठका घेतल्या अधिका-याचें काम पाहता मा.आयुक्तांना पुन्हा प्रभाग वाईज बैठका घेण्याची गरज आहे. बैठकीला त्या त्या प्रभागातील सदस्यांना पण बोलविण्यात यावे.ज्या अधिका-यांची नियुक्ती केली त्यांना समोर बोलवावे ते काय उत्तरे देतिल त्यानुसार ज्या अडचणी येतील त्या दूर करण्यासाठी सदस्य मदत करतील.

श्री.राजू शिंदे :अधिका-यांनी दिलेली माहिती बरोबर नाही.उत्पन्न वाढविणे हे महापालिकेच्या हिताचे आहे.यासाठी प्रशासन गांर्भीर्याने घेत नसेल तर यापेक्षा दुसरे दुर्देव नाही.कोणतेही विकास काम करण्यासाठी उपत्न वाढविणे आवश्यक आहे अधिकारी काम करीत नसेल तर मा.आयुक्त काय कार्यवाही करणार आहे खुलासा करावा व संबधीत अधिकारी यांना एक महिण्याचा कालावधी देवून पुन्हा वसुलीसाठी कार्यवाही करावी संबधीत अधिकारी यांना मुख्य कार्यालयात न बसता त्यांनी त्या त्या प्रभाग कार्यालयात जावून काम करावे अशा प्रकारेच यापूर्वी आदेशीत केले होते परंतु संबधीत अधिकारी हे वार्ड कार्यालयात जावून वसुलीच्या संदर्भात बैठका घेवून थकबाकीदार किती नवीन मालमत्ता किती वादग्रस्त किती याची माहिती त्यांनी घेतलेली नाही. अशा अधिका-यावर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

श्री.संजय जोशी :अथँटीकेशन व ऑडप्शन हे जोपर्यत सुरू करीत नाही तोपर्यत हया प्रॉपर्टी कुठल्या आहे समजणार नाही मागिल सभेत या बाबत कार्यवाही करण्याचे सुचविले होते अदयाप कार्यवाही सुरू झाली नाही.३१ मार्चच्या अगोदर जुन्या प्रॉपर्टी ऑडप्शन केल्या असत्या अथँन्टीकेशन करून नवीन प्रॉपर्टी ॲड केल्या असत्या तर किती नवीन टॅक्स आकारला पुर्वीचा किती आहे लगेच माहिती घेता आली असती.कार्यवाहीस सुरूवात केली असती तर ही वेळ आली नसती.वर्षानुवर्षा पासून हा गलथान कारभार चालू आहे पुढेही असाच चालू राहिल अशी शंका येते.टॅक्स आकारणीस अडचणी येत असेल

तर कार्य.अभियंता पद निर्माण करावे व दरवर्षी अथेंटीकेशन व ॲडॉप्शनची कार्यवाही सुरू करावी.हे जोपर्यत सुरू करीत नाही तोपर्यत नवीन मालमत्ता किती आहे हे सांगता येणार नाही.वार्डात अनेक रजिस्टर आहेत कोणती कॉलनी कोणत्या रजिस्टरमध्ये नोंद आहे याचा ताळमेळ नाही.उदा वार्ड ८७ चे रजिस्टरच्या पान क्र. २०० वर इतर वार्डाचेही नाव दिसून येतील.ही सुसूत्रता आणण्यसाठी अनेकदा सभागृहात सुचना केल्या परंतु अमलबजावणी होत नाही.रजिस्टर हे वार्ड वाईज होवू शकते. एका वार्डातील मालमत्ता टॅक्स किती वसुल याची माहिती क्लिअर होवू शकत नाही.ही सिस्टीम सुरू केली तर कुठल्या मिळक्तीला टॅक्स आकारणी केली किंवा केली नव्हती. हे लगेच समजेल.शहरात २०-२५ टक्के मालमत्तेला अजूनही टॅक्स आकारलेला नाही.त्या मालमत्ता १०-१५ वर्षापासूनच्या आहे जेंव्हा लक्षात येते तेंव्हा आपले कर्मचारी जातात व मागिल वर्षांचा टॅक्स आकारू शकत नाही म्हणून तो रद्द करतो त्यासाठी पैशाची मागणी करतात नियमाने मागचा टॅक्स घेवू शकत नाही सामान्य नागरीकांना हे माहित नसते.या सिस्टीम प्रमाणे सुधारणा केली तर कोणत्याही क्षणी कोणत्या वार्डचा किती टॅक्स वसुल झाला याची माहिती मिळू शकते.

श्री.काशिनाथ कोकाटे :या विषयावर खुप चर्चा झाली शासनाकडील अधिकारी जेंव्हा मागविण्याचे या सभागृहात ठरलेले होते त्यावेळी ६ अधिकारी हे येणार त्यांना ६ प्रभागातील नवीन मालमत्ता ,वसुली असेल वादग्रस्त प्रकरणे या सर्व कामाची जबाबदारी सोपविणार होतो.उपआयुक्त दर्जाचे अधिकारी यांना वार्ड कार्यालयाच्या कामासाठी जबाबदारी दिली परंतु त्यांना कोणते अधिकार दिले आहे.आताच कर निर्धा. व संकलक यांनी म्हटले सुनावणी केली एकूण किती सुनावण्या केल्या किती प्रकरणे निकाली काढली कोणते निर्णय घेतले निर्णय घेणेसाठी अधिकारी मागविलेले आहे ते घेतले नसेल तर त्याचा काय परीणाम होतो ६ प्रभागातील जबाबदारी कुणाला दिली एकूण मालमत्ता धारक किती ,किती मिळकतीला टॅक्स लावण्यात आले कितींना नाही किती प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे याची आकडेवारी दिली नाही.स.सदस्य पोटतिडकीने बोलतात सर्व मुद्ये समोर मांडतात.मा.सभापती यांनी जे मत मांडले त्यांचे अखत्यारीत त्यांनी वसुलीच्या संदर्भात प्रशासनाला आदेशीत केले पाहिजे.अधिका-यांना बैठका घेण्याचे आदेशीत करावे.विषय नसतांना इतर अधिका-यांना एकत्रित बोलविले जाते ज्यांचे काम आहे त्यांना बरोबर घ्यावे व त्यांचा प्रश्न निकाली काढावा मा.आयुक्तांनी अमुक स्टेटमेंन्ट दिले यामूळे चुकीची प्रसिध्दी जाणीवपुर्वक होवू लागली आहे.जे अधिकारी बोलले असेल त्यांचेवर कार्यवाही केली पाहिजे. काय स्टेटमेंन्ट करायचे ते नियमात राहू करावे. जे स्टेटमेंन्ट होत आहे ते सर्वाच्या साठी हाणीकारक आहे जे अधिकारी नियुक्त केले होते त्यांना काय अधिकार दिले व त्यांना दिलेले प्रभाग यामध्ये प्रत्येकी किती मालमत्ता आहेत ही माहिती मिळाली तर संपूर्ण कामकाजास सोयीस्कर होईल क.अभियंता यांना वसुलीचे काम दिले

त्यांना त्यांचे विभागामध्ये परत पाठवावे वसुलीची जबाबदारी ज्याची आहे त्यांचेकडून काम करून घ्यावे.चांगले काम करणारे अधिका-यांचे अभिनंदन होईल चुकीचे काम करणा-यांना माफही करणार नाही जे जबाबदार आहे त्यांचेवर कार्यवाही झालीच पाहिजे.

श्री.गजानन बारवाल डिमांड नोटीस वेळेवर न गेल्यामूळे वसूली होत नाही.आतापर्यंत नोटीसेस नाही मा.आयुक्तांनी वसुलीच्या संदर्भात सुचना दिल्या त्याचा इफेक्ट काही प्रमाणात झाला नोटीसा मोठे इमारत धारक ज्यांनी टॅक्स भरला त्यांनाच देण्यात आल्या यासाठी पूर्वीपासून सेन्ट्रलाईजेशन केले असते तर वसुलीत मोठया प्रमाणात फरक पडला असता.

श्री.राजू शिंदे : स.माजी महापौर सभागृहात वसुलीच्या संदर्भात मत मांडत असतांना अधिकारी हसत आहे सभागृहात थांबणे योग्य वाटत नाही.

श्री.गजानन बारवाल :कुणी अधिकारी हसत असेल तर योग्य नाही.

याच वेळी सभागृहात स.सदस्य एकत्र बोलतात.

श्री.त्र्यंबक तुपे :स.सदस्य महापालिकेच्या हिताचे विषय मांडत असतांना कुणी हसण्यावर घेत असेल त्या अधिका-यांना महापालिकेशी देणे-घेणे नाही का ?असे होत असेल तर योग्य नाही आम्ही सर्व बाहेर जातो.

श्री.गजानन बारवाल :मी माझ्या परीने विषय मांडत असतांना जे कुणी अधिकारी हसले असतील त्यांचा मी निषेध करतो.सभा तहकूब करावी.

मा.महापौर :संबधीत अधिका-यावर कार्यवाही होईल

श्री.गिरजाराम हळनोर : ज्या अधिका-यांनी गैरवर्तन केले असेल त्याचा आम्ही निषेध करतो.या निषेधासाठी ०५ मिनिटे सभा तहकूब करावी

याच वेळी सभागृहातील स.सदस्य सभागृहाच्या बाहेर निघून जातात.

मा.महापौर :०५ मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ सायं.६.०५ वा.पुन्हा सभेला सुरूवात ६.१५ वा.)

श्री.राजू शिंदे :जेष्ठ स.सदस्य श्री. गजानन बारवाल हे विषय मांडत असतांना तो विषय संबधीत अधिका-याच्या संबधीत असतांना जर ते सिरीयस्ली घेत नसेल तर त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.अशा अधिका-यांना परत पाठवावे.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी या संबधी खुलासा करावा.

मा.आयुक्त :ज्या अधिका-यांनी या चर्चेच्या संदर्भात हसण्यावर घेतले त्यांचेवर जरूर ती कार्यवाही प्रशासन करेल.ख-या अर्थाने सर्व सदस्यांचे आयुक्त म्हणून अभिनंदन करतो मागील बैठकीत म्हटले होते की वसुलीच्या संदर्भात जो निर्णय घेतला आणि सभागृहाने सुचविल्यानुसार वसुलीच्या बाबतीत प्रत्येकी दोन वार्ड कार्यालयासाठी १ उपआयुक्त देणे,स्पेशल कर्मचारी वर्ग त्यांना देणे,वास्तविक स.सदस्यांनी वसुलीच्या कामावर लक्ष ठेवणे ही अभिनंदणीय व आगळीवेगळी बाब आहे.या बध्दल खरोखरच आपले अभिनंदन करायला पाहिजे.सभागृहाच्या सुचनेनंतर गेल्या महिणाभरापासून एक नवीन पध्दतीने जोरदारपणे वसुलीची कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला दिं.१६-०८-२०१० ते २१-०८-२०१० या पाच दिवसाच्या कालावधीसाठी १०० कर्मचारी देण्यात आले होते.२वार्ड कार्यालयासाठी एक उपआयुक्त,महापालिकेकडे विकास कामासाठी पैसाच नाही म्हणून

वसुलीच्या कामाला सुरूवात केली या पध्दतीने कर्मचारी नियुक्त केले होते.त्यावेळी टेक्नीकल विभागामध्ये फारसे काम चालू नव्हते. असे वाटू लागले की या सर्वांना मिळून वसूलीचे काम करावे.या ५-६ दिवसासाठी १० कोटी टारगेट ठरवले होते तर फक्त ८० लक्ष वसुली झाली.यानंतर २७ ऑगस्ट ते १३ सप्टेबर या दरम्यान मोहिम सुरू केली या कालावधीत जी फक्त ५६ लक्ष वसुल झाले एकूण ७९ कर्मचारी वार्ड निहाय दिले सर्व वार्ड अधिकारी व उपआयुक्त यांना सक्त सुचना दिल्या की , इतके कर्मचारी त्याची यादी व त्यांना वार्डात पाठवायचे व काम करतांना पहिल्यांदा त्यांनी नवीन प्रॉपर्टी शोधने ॲसीसमेंन्ट करणे, टॅक्स आकारणी करणे हा एक मुद्या जरी असला तरी ७ हजार मालमत्ताधारकांकडे जी १२ ते १३ कोटी वसूली होती.त्यांचे यादया हातोहात दिलेल्या होत्या जे १०० कर्मचारी नियुक्त केले त्यांचेकडे सर्व वार्डातील यादया देण्याचे आदेशीत केले होते.साधारणत: १० हजार पेक्षा जास्त रक्कम असलले ५०० ते ५५० खातेदार येत होते एका कर्मचा-यांना फक्त ५-६ खातेदार वसुलीसाठी येत होते.अपेक्षा अशी होती या २-३दिवसात त्या कर्मचा-यांनी तेथे संबधीत थकबाकीदार असेलेल्याकडे संपर्क करायचा व १२ ते १३ कोटीची जी थकबाकी होती ती वसूल करायची होती परंतु दुर्दैवाने फक्त त्या कालावधीत ८० लक्ष वसुली झाली आहे.नंतर ५६ लक्ष अशी महिणाभरामध्ये जवळपास फक्त १.५० कोटीच वसुली होवू शकली.१२-१५ कोटीपर्यत वसुली व्हावी असे अपेक्षीत होते.दुर्दैवाने झाले नाही.उपआयुक्त, वार्ड अधिकारी यांना एक ते दीड महिण्यापासून ज्या सोयीसुविधा आर्थीक दृष्टया असेल, कर्मचारी देणे असेल, वाहने देणे असेल व इतर ही जी काही मदत लागत असेल ती सर्व देण्याचा प्रयत्न केलेला आहे.यामध्ये फारशी प्रगती झालेली नाही.सभागृहाला आज आश्वासन देतो की , जे अधिका-यांना पाहिजे ते आपण ठरवा वसुलीचे काम जे पाहतात ते जॉईन्टली पाहतात.ज्या ज्या बाबीचे अधिकार त्यांना पाहिजे त्यांचे स्टॉफला पाहिजे.वार्ड अधिका-यांना पाहिजे जे काम प्रशासनानेच सांगितले त्यांना वसुलीचे अधिकार देण्याचे पत्र प्रशासनाला देण्यास काहीच अडचण नाही.जेंव्हा मी रस्त्याचे काम ,सभा असेल त्यामध्ये इतर कामे माझेमागे असतील त्यावेळी अधिका-यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले असे प्रशासनाचे मत झालेले आहे. आता संबधीत अधिकारी यांना त्यांनी काम चांगले केले नाही, कोणतीच माहिती त्यांचेकडे नाही कारण सोपविलेले काम , विषय असो किंवा नसो याची सर्व माहिती उपआयुक्ताकडे प्रत्येक अधिका-याकडे असायला पाहिजे.आजच्या बैठकीसाठी अधिकारी यांनी सभा सुरू झाल्या पासून सभा संपेपर्यत सभागृहात असायला पाहिजे अशा सुचना दिल्या होत्या इथून पुढे त्या सुचना पाळण्याचा प्रयत्न करणार आहोत.ज्यांनी काम नीट केले नाही त्यांचेकडे माहिती नाही तीनही उपआयुक्तांना जे कामात मागे पडले त्यांना तातडीने नोटीसा दिल्या जातील.त्यांचे कामाची प्रशासनाने नोंद घेतली आहे.सीआर मध्ये त्याची नोंद होणार आहे.एक महिण्याचा अंतिम कालावधी दिला

एक महिण्यात प्रत्येक उपआयुक्तांना प्रत्येक अध्िाका-यांना त्यांचे टारगेट ठरवून दिले जाईल.जर काम केले नाही तर उपआयुक्तांना सेवा मुक्त करण्याची कार्यवाही पुढील महिण्यात प्रशासन घेईल.खरे म्हणजे वादग्रस्त असलेल्या प्रकरणा बाबत आदेशीत केले होते की, कुणाच्या तक्रारी आल्या,फायनल झालेले नाही. कर आकारणी किती केली याची माहिती नाही या संदर्भात वार्डात जावे वादग्रस्त प्रकरणे हाती घ्यावे जे जे शक्य आहे ते ताबडतोब करावे परंतु कोणत्याच स्वरूपाचा प्रस्ताव समोर आला नाही. कोणतेही फारसे काम झालेले दिसून येत नाही.सर्व मोहिमेमध्ये ताकद आयुक्त म्हणून मी लावलेली असतांना सुध्दा या कामामध्ये फारसा रिस्पॉन्स दिला गेला नाही.मध्यंतरी सफाईचे ,रस्त्याचे कामे बघीतले असेल अनेक प्रकारे मदत करूनही सतत दुर्दैवाने म्हणावे लागत होते की जी यंत्रणा आहे ती काम करीत नाही.यापूढे जावून सुचना देवूनही कळत नाही तर कार्यवाही करणे, निलंबीत करणे,हे करूनही काही फरक पडला नाही. १०० पेक्षा जास्त कर्मचारी निलंबीत केले.तरी काही फरक पडला नाही. आता या पध्दतीने कार्यवाही करणार मागिल महिण्यात अधिका-यांना असंसदीय भाषा वापरली पेपरला आले तरी सुधारणा होत नाही.कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला अजूनही करणार आहे आता या पूढे काही कालावधीसाठी टारगेट नुसार काम दिले जाईल.या कालावधीत काम केले नाही तर दोन्ही उपआयुक्तांना येथील सेवेतून परत पाठविण्यात येईल.

**ठराव:**

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.९६**:-

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र. ९ येथील न्यु नंदनवन कॉलनी भुजबळ नगर हा भाग दलित वस्ती मध्ये मोडतो. या भागामध्ये शासनाच्या (दलित वस्ती सुधार) योजने अंतर्गत सिमेंटचे रोड तयार करणे करीता रुपये दहा लाखची तरतुद करुन मान्यता द्या हि विनंती.

सुचक :श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

अनुमोदक : श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद, श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ९ येथील न्यु नंदनवन कॉलनी भुजबळ नगर भागामध्ये शासनाच्या (दलित वस्ती सुधार) योजने अंतर्गत सिमेंटचे रोड तयार करणेस व या कामा करीता रुपये दहा लाखाची तरतुदीस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सन २०१०-२०११ औरंगाबाद शहरातील कराटे खेळाडूंना राज्यस्तरावर वाव मिळावा या उद्देशाने राज्यस्तरीय "महापौर चषक" कराटे स्पर्धेचे आयोजन औरंगाबाद जिल्हा कराटे संघटनेमार्फत आयोजित करण्यात येऊन त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

अनुमोदक : श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

मा.महापौर :हा विषय स्थगित करण्यात येतो.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तुत प्रस्तावास स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ९८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अस्मितादर्श मासीकाच्या माध्यमाने वास्तववादी साहित्याची जगाला ओळख करुन देणारे, अलौकिक साहित्य निर्मिती केल्यामुळे पहिले अखिल विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले, मैलाचा दगड ठरावा असे दलीत साहित्य निर्माण करणाऱ्या सुप्रसिध्द समिक्षक, सिध्दहस्त लेखक ज्यांच्या साहित्यकृतीस शासनातर्फे पुरस्कृत करुन सन्मानित करण्यात आले, अशा वयोवृध्द, मराठी साहित्याचे पितामह, आंबेडकरी चळवळीचे निष्ठवान अभ्यासक, विद्यार्थी डॉ.गंगाधर पानतावणे यांना यावर्षीचा "डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन पुरस्कार" सन्मानपुर्वक प्रदान करण्यात यावा.

गतवर्षा प्रमाणे पुरस्कार म्हणून रु. ५१,०००/- धनादेश, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल प्रदान करण्यात यावे.

सुचक :श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

अनुमोदक :श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे, श्री.भुईगळ अमित सुधाकर, श्री.बनकर कृष्णा सांडुजी

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.गंगाधर पानतावणे यांना यावर्षीचा "डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन पुरस्कार" म्हणून रु. ५१,०००/- चा धनादेश, मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल प्रदान करण्यास मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-औमपा-२०१०/८८३/प्रक्र-१४०/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २०.०८.२०१० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम, २३ आणि ३१-अ नुसार स्थायी समितीच्या रिक्त पदावर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांसाठी दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड यांची स्थायी समिती वर नामनिर्देशन करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ४५१(१) अन्वये शासनाने निलंबीत केली आहे.

वरील अधिनियमाच्या कलम ४५१(२) नुसार सदर आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस राज्य शासनाकडे यासंदर्भात अभिवेदन सादर करण्यांची तरतुद आहे. तसेच कलम ४५१(३) अन्वये असे अभिवेदन ३० दिवसांच्या मुदतीत शासनास मिळाले नसल्यास शासन त्यावर पुढील निर्णय घेऊ शकते.

दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ शासनाने निलंबीत केल्यामुळे सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार विहीत मुदतीत शासनास महानगरपालिकेचे अभिवेदन सादर करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर अनुमोदक :श्री.सुर्यकांत जायभाये,श्री.अनिल जयस्वाल

<u>संवाद:-</u>

श्री.गिरजाराम हळनोर :विषय क्र.९९ या ठिकाणी सभागृहासमोर अभिवेदन मी वाचून दाखवतो.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये अभिवेदन सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने सविनय अभिवेदन सादर करण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ आणि ३१ -अ अन्वये स्थायी समिती रिक्तपदी निवड/नामनिर्देशीत करण्याबाबत दिनांक १७.०८.२०१० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सदरील विशेष सभेत विषय क्र -६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री कैलास गायकवाड यांना स्थायी समितीवर सदस्य म्हणून महानगरपालिकेने नामनिर्देशित केलेले आहे.

तथापि वरील संदर्भीय शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१० अन्वये स्थायी समितीच्या रिक्त पदावर एका सदस्याचे नामनिर्देशन करणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्र -६३ च्या अनुषंगाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री. कैलास गायकवाड यांना स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ (१) अन्वये निलंबित केली आहे.

तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४५१ (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे खालीलप्रमाणे अभिवेदन सादर करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ मध्ये शासनास महापालिकेच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वय निलंबित करण्याचा अधिकार आहे. परंतु सदरील श्री. कैलास गायकवाड यांचे नामनिर्देशन हा ठराव किंवा आदेश नसून नामनिर्देशित करण्याचा निर्णय आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ -अ (३) अन्वये पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार श्री राजू शिंदे हे स्थायी समितीचे सभापती झाल्याने व त्यांना कॉंग्रेसने मतदान केल्याने संख्याबळाच्या प्रश्नांसंबंधी सर्वसाधारण सभेने निर्णय घेऊन श्री. कैलास गायकवाड यांचे नाव स्थायी समितीसाठी नैमत्तिक रिक्त जागेवर निवड /नामनिर्देशन केले आहे. करिता या तरतुदीनुसार महानगरपालिकेस हा अधिकार असून सर्वसाधारण सभेचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम आहे.

तसेच स्थायी समितीची रिक्त जागा भरण्यासाठी नामनिर्देशित करतांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने गटनेता म्हणून मी महापौरांना रितसर बंद पॉकीटातून नाव कळविले आहे. परंतु संयुक्त

लोकशाही आघाडीच्या वतीने त्यांचे गटनेता यांनी कोणतेही नाव कळविले नसल्याने व त्यांना सदरील नाव कळविणे बाबत सभा तहकुब करुन १५ मिनिटांचा अवधी सर्वसाधारण सभेतर्फे देण्यात आला होता. तरीसुध्दा ही संधी देऊन संयुक्त लोकशाही आघाडीच्यावतीने उपस्थित असलेले गटनेते श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांनी कोणाचेही नाव कळविले नसल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेता म्हणुन मी मा.महापौरांकडे रितसर नांव बंद पॅकिटामध्ये नियमानुसार स्थायी समितीच्या रिक्त जागेवर श्री. कैलास गायकवाड यांच्या नावाच्या केलेल्या शिफारसीस महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे. हा निर्णय सर्वसाधारण सभेत बहुमताने घेण्यात आलेला आहे. कारण सदरील स्थायी समितीची रिक्त जागा ही नैमत्तिक रिक्त जागा असल्याने व ती दीर्घकाळ रिक्त ठेवणे हे वैधानिक दृष्टया योग्य नसल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेता यांनी केलेल्या नावाच्या शिफारशीस महानगरपालिकेने मान्यता दिली.

श्री.राजु शिंदे :आमच्याकडे जो ठराव आहे त्यात कुठेही हे दिलेले नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :तेच निवेदन मी निर्देशनास आणुन देत आहे.

श्री.राजु शिंदे :विषय ९९ मध्ये पुढील पानावर दिले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :जे नियमाला अनुसरून आहे सदरील नियुक्ती नामनिर्देशनामुळे शांततेचा भंग व लोकहिताविरूध्द नगरपालिका निधी्चा दुरूपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव उदभवत नसल्याने महानगरपालिकेचे कुठलेही म्हणणे विचारात न घेता शासनामार्फत घेण्यात आलेला एकतर्फी निर्णय हा महानगरपालिकेवर अन्यायकारक असून महानगरपालिकेच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ (३) मधील महानगरपालिकेच्या प्राप्त अधिकाराकडे दुर्लक्षीत करणारा आहे. तसेच दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील स्थायी समिती पदावरील निवड ही निवडणूक प्रक्रियेचाच एक भाग असल्याने सदरील प्रक्रियेमध्ये शासनास हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याने उपरोक्त निलंबन आदेश हा शासनाच्या अधिकार कक्षे बाहेरील असल्याचे सभागृहाचे मत आहे.

श्री.मुजीब खान :जे ही स.सदस्य बोलत आहे. ठराव समोर आहे. त्यासाठी बोलण्याची गरज नाही. १ तास जर ते बोलत राहतील.तर बरोबर आहे का?

श्री.गिरजाराम हाळनोर :त्यानुसार महानगरपालिकेने दिनांक १७.०८.२०१० रोजी स्थायी समितीच्या नैमत्तिक रिक्त जागेवरील नामनिर्देशना संबंधीचा घेतलेला निर्णय हा कायदेशीर असून वैध आहे.

करिता उपरोक्त संदर्भीय शासननिर्णय दिनांक २०.०८.२०१० रोजीच्या अन्वये स्थायी समितीच्या रिक्त जागी नामनिर्देशना संबंधी कार्यवाहीसंबंधीचा निर्णय कलम ४५१ (१) अन्वये शासनाने निलंबित केलेला आहे.

श्री.मुजीब खान :स.सदस्यांना काय म्हणायचे आहे?

श्री.प्रमोद राठोड :मागच्या वेळेला जे काही निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे तो योग्य आहे जो निर्णय निलंबनाचा राज्य शासनाने घेतला तो अतिशय

योग्य आहे कारण जे स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन केले होते ते चुकीचे आहे त्यामूळे आम्ही राज्य शासनाचे स्वागत करतो.

श्री.गिरजाराम हाळनोर : सदरील निलंबन आदेश हा उपरोक्त महानगरपालिकेचे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ (२) चे विहीत मुदतीत सादर केलेल्या अभिवेदनावर विचार करुन व ते मान्य करुन केलेले निलंबन मागे घेण्यात यावे ही विनंती. तसेच दिनांक १७.०८.२०१० रोजी श्री. कैलास गायकवाड यांची करण्यात आलेली नियुक्ती कायम करण्याबाबत मा. राज्यशासनास विशेष अधिकारी नियुक्त करुन तात्काळ महानगरपालिका प्रशासनास कळविण्यात यावे ही विनंती. विशेष दुत पाठवून हे कळविण्यात यावे.

श्री.मुजीब खान :स.सदस्यांना काय म्हणायचे आहे शासनाने जो निर्णय घेतला तो योग्य नाही का

श्री.गिरजाराम हळनोर :स. कैलास गायकवाड यांची नियुक्ती केल्या गेलेली होती आणि त्या आपल्या महानगरपालिकेच्या निर्णयावर शासनाने सदर नियुक्तीचे निलंबन केलेले आहे महानगरपालिकेला राज्य शासनाकडे या संदर्भात अभिवेदन करता येते आणि ते ३० दिवसाच्या आत करावे लागते त्याप्रमाणे आज या ठिकाणी अभिवेदन करण्यात आले आहे ते मंजूर करून शासनास पाठवावे.

याच वेळी डायस समोर स.सदस्य एकत्रित बोलतात.

मा.महापौर :राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गट नेते श्री. गिरजाराम हाळनोर यांनी स्थायी समिती चे जे ( याच वेळी सभागृहात अनेक सदस्य एकत्रित बोलतात)रिक्त पद आहे त्याचे नियुक्ती प्रकरणी शासनाने निलंबीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने जे अभिवेदन सादर केले त्या अभिवेदनाची जशीच्या तशी इतिवृत्तामध्ये नोंद करून त्याचे रूपांतर ठरावामध्ये करून तो ठराव /अभिवेदन ठरावात महानगरपालिकेचा निर्णय म्हणून प्रशासनाने तात्काळ आजच्या आज विशेष अधिका-या मार्फत पाठवावा.अभिवेन /ठराव मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रमोद राठोड :आपण चूकीचे वाचत आहेत राज्य शासनाने केलेली कार्यवाही ही योग्य आहे जे करीत आहात महापौर यांचा आम्ही निषेध करतो राज्य शासनाने योग्य निर्णय दिलेला आहे याची नोंद येथे करावी.

श्री.राजू शिंदे :शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आहे.

श्री.प्रमोद राठोड :या ठिकाणी जे नामनिर्देशन सादर करावयाची कारवाई झाली होती स्थायी समिती सदस्यासाठी राज्य शासनाने जो आदेश कार्यवाहीचा दिला तो अतिशय योग्य आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :आम्ही या ठिकाणी तेच निवेदन केले आहे की, स.विरोधी पक्षाचे जे संयुक्त लोकशाही आघाडीचे गट नेते आहे. त्यांनी नांव सुचवायला पाहिजे होते त्यांनी नांव न सुचविल्यामुळे

याच वेळी मोठमोठयाने स.सदस्य बोलतात....

श्री.प्रमोद राठोड :२६ जुलै २०१० चा शासन जि.आर आहे. जी निवड आपण केली ती त्यानुसार बरोबर नाही.

श्री.गजानन बारवाल :जे आता स.सभागृह नेता यांनी निवेदन केले ते शासनापर्यंत पाठवावे अशी आमची विनंती आहे.

श्री.प्रमोद राठोड :शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आहे. त्यावेळी यांनी पॉकिट दिले यांनी दिले नाही. त्या ठिकाणी विधी सल्लागार यांनी सल्ला दिला की, आमच्या आघाडीचा खुलासा घ्यायला पाहिजे होता. शासन जी.आर प्रमाणे जो लखोटा सादर केला होता. तो अतिशय योग्य होता.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड यांची स्थायी समिती वर नामनिर्देशन करण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-औमपा-२०१०/८८३/प्रक्र-१४०/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २०.०८.२०१० प्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ४५१(१) अन्वये शासनाने निलंबीत केले आहे. या संदर्भात सदर अधिनियमाचे कलम ४५१(२) नुसार सदर आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस राज्य शासनाकडे अभिवेदन सादर करण्यांची तरतुद आहे. त्यानुसार सभागृहात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेते श्री.गिरजाराम हाळनोर यांनी स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशना संदर्भात शासनाने दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विषय क्रमांक ६३ निलंबीत केले त्यावर त्या अनुषंगाने श्री. गिरजाराम हाळनोर राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेते यांनी सभृगहात जे अभिवेदन सादर केलेले आहे. ते अभिवेदन जशे च्या तसे मान्य करण्यांत येत असून सदर अभिवेदन महानगरपालिकेचा निर्णय म्हणून प्रशासनाने आजच्या आज विशेष अधिकाऱ्यामार्फत शासनास पाठविण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

मा.महापौर : पुरवणी विषय क्र. १०० ते पुढील सर्व विषय मंजुर करण्यात येते.

**विषय क्र. १००:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. ७५ संजयनगर येथे जालना रोडलगत बांधीव गटार असून गटारीचे बांधकाम अनेक ठिकाणी पडलेले आहे. गटारावरील ढापे तुटलेले आहे. गटारीत गाळ साचलेला आहे त्यामुळे पावसाचे वाहणारे पाणी जमिनीवरुन वाहून रोड लगतच्या घरात घुसून नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. करिता दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत सदरील गटारीचे बांधकाम करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :बाळुलाल वर्धाजी गुर्जर अनुमोदक :श्री.कावडे रवि साहेबराव

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७५ संजयनगर येथे जालना रोडलगत गटारीचे बांधकाम दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत करण्यास मंजुरी देण्यांत येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. २६ गणेशनगर येथील सप्तपदी मंगल कार्यालय ते राजे संभाजी चौक हा नाला अरुंद असल्याने पावसाच्या पाण्याने नाला तुडुंब भरुन वाहतो. यामुळे पावसाचे पाणी आसपास राहणाऱ्या नागरीकांच्या घरात शिरत आहे. त्यामुळे नागरीकांची अत्यंत गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरील नाल्याचे रुंदीकरण करणे व नाल्याची पुर्नबांधणी करणे आदी कामे तात्काळ हाती घेणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक तयार करुन या कामासाठी लागणारी संभाव्य आर्थिक तरतुद करण्यात येवून अंदाजपत्रकासह मान्यता देण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी.

सुचक: सौ प्राजक्ता मंगेश भाले

अनुमोदक:श्री.विरभद्र रामलींग गादगे,श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण, श्री. किशोर बाबुराव नागरे

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २६ गणेशनगर येथील सप्तपदी मंगल कार्यालय ते राजे संभाजी चौक हा नाला अरुंद नाल्याचे रुंदीकरण करणे व नाल्याची पुर्नबांधणी करणे तसेच सदरील कामासाठी लागणारी संभाव्य आर्थिक तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर अंतर्गत देवगिरी बॅक ते श्रीकृष्ण हौसिंग सोसायटी एन-८ पर्यंत वाहणाऱ्या मुख्य मलनिःस्सारण वाहीनीही सिडकोच्या स्थापनेपासून बदलण्यात आलेली नसून या मलनिःस्सारण वाहिनीवर वाढलेल्या दाबामुळे सदरील वाहीनी अनेक ठिकाणी खचलेली असून सदरील वाहीनी तांत्रिक दृष्टया बाहय झाली आसल्या कारणाने बदलणे आवश्यक आहे. सदरील काम हाती घेण्याबाबत कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चाची तरतुद अर्थसंकल्पात करुन अंदाजपत्रकास मान्यता देण्यात यावी.

सुचक: सौ प्राजक्ता मंगेश भाले

अनुमोदक:श्री.विरभद्र रामलींग गादगे, श्री. किशोर बाबुराव नागरे, श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ गणेशनगर अंतर्गत देवगिरी बॅक ते श्रीकृष्ण हौसिंग सोसायटी एन-८ पर्यंत नविन मुख्य मलनिःस्सारण वाहीनी टाकण्यास व सदरील कामासाठी लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर एन-८ येथिल जलकुंभ परिसरात काही विघ्नसंतोषी लोक जलकुंभा लगत अनेक प्रकारचे उपद्रव करत असल्याचे आढळून आले आहे. सुरक्षा रक्षक नसल्यामुळे जलकुंभाच्या पायऱ्या चढून जलकुंभावर चढत असून ही एक अक्षम्य गंभीर बाब आहे. यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त बाबीचे गांर्भीय लक्षात घेता एन-८ येथील जलकुंभास संरक्षण भिंत बांधणे व वाचमनसाठी खोली बांधणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन होणाऱ्या संभाव्य खर्चाची तरतुद अर्थसंकल्पात करणे व अंदाजपत्रकास मान्यता देण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी.

सुचक: सौ प्राजक्ता मंगेश भाले  अनुमोदक:श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण, श्री.विरभद्र रामलींग गादगे

**<u>ठराव-:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२६ गणेशनगर  येथील जलकुंभास संरक्षण भिंत बांधणे व वाचमनसाठी खोली बांधणेच्या कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कार्यकारी अभियंता वार्ड ब या विभागाकडून शिवछत्रपतीनगर व भारतमातानगर येथे जलवाहीनी टाकण्याच्या कामास महानगरपालिका प्रशासनाने मंजुरी दिली असून वार्ड क्र.१४ रोजाबाग अंतर्गत शिवछत्रपती नगर व भारतमातानगर येथे जलवाहिनी टाकण्याचे काम अद्यापही हाती घेतलेले नाही.

वार्ड क्र. १४ रोजाबाग मधील विविध ठिकाणी जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली असून यासाठीची तरतुद उपलब्ध करुन दिली

आहे. कामाची निकड व स्वरुप लक्षात घेता काम हाती घेणे बाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी.

सुचक :सौ.संगिता राजू अहिरे अनुमोदक :श्री.समिर सुभाष राजुरकर

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१४ रोजाबाग अंतर्गत शिवछत्रपती नगर व भारतमातानगर येथे जलवाहिनी टाकण्याचे कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.४७ ई सेक्टर मध्ये मनपाची खुली जागा असून त्या जागेत आरोग्य केंद्रासाठी जागा आरक्षित आहे सदर जागेमध्ये रहिवासीयांच्या सुविधासाठी आरोग्य केंद्र बांधण्यात यावे जेणे करुन येथील गरीब व मध्यमवर्गीय रहिवासीयांना या आरोग्य केंद्राचा फायदा होईल व त्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

वार्ड क्र. ४७ ई सेक्टर मध्ये आरक्षित जागेवर मनपा तर्फे आरोग्य केंद्र बांधण्यास रक्कम रुपये १५ लाखाची आर्थिक तरतुद करुन आरोग्य केंद्र बांधण्यात यावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण

अनुमोदकः श्री.विरभद्र रामलींग गादगे, श्री. किशोर बाबुराव नागरे

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४७ ई सेक्टर मध्ये आरक्षित जागेवर मनपा तर्फे आरोग्य केंद्र बांधण्यास रक्कम रुपये १५ लाखाची आर्थिक तरतुद करुन आरोग्य केंद्र बांधणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.४७ ई सेक्टर मध्ये मनपाची खुली जागा असून त्या जागेत व्यायाम शाळेसाठी जागा आरक्षित आहे सदर जागेमध्ये रहिवासीयांचे व युवकाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी या जागेत व्यायाम शाळा बांधण्यात यावे जेणेकरुन येथील गरीब व मध्यमवर्गीय युवकांना आपले आरोग्य अबाधित राहण्यासाठी या व्यायाम शाळेचा फायदा होईल व त्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल.

वार्ड क्र. ४७ ई सेक्टर मध्ये आरक्षित जागेवर मनपा तर्फे व्यायाम शाळा बांधुन व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी रक्कम रुपये १५ लाखाची आर्थिक तरतुद करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः श्री.हुशारसिंग मांगेराम चव्हाण

अनुमोदकः श्री.विरभद्र रामलींग गादगे, श्री. किशोर बाबुराव नागरे,

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ४७ ई सेक्टर मध्ये आरक्षित जागेवर मनपा तर्फे व्यायाम शाळा बांधुन व्यायाम साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी रक्कम रुपये १५ लाखाची आर्थिक तरतुदीस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळीचे विषय**

**विषय क्र.१०७**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, यापुर्वी सर्वसाधारण सभा दिनांक २३.०६.२००९ रोजी विषय क्र.५३३ अन्वये इयत्ता ८ वी ते १० वी च्या वर्गाना ३४ शिक्षण सेवकांना नियुक्ती देणेबाबत व शासन निर्णयानुसार प्रतिमहा रु.४०००/- प्रमाणे मंजुरी देण्यांत आली आहे.

तथापि महानगरपालिकेची आर्थिक बाब लक्षात घेता मा.आयुक्त यांनी मानद शिक्षक भरती बाबत अधिकाऱ्यांची समिती गठीत केली. शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होणार नाही त्यासाठी १००% खर्च मनपास करावा लागणार आहे. सदरील समितीमध्ये उपआयुक्त (म), उपआयुक्त (प्र), मुख्यलेखापरिक्षक व मुख्यलेखाधिकारी आहेत. या समितीने घडयाळ तासिकाप्रमाणे रु.५४/- प्रति तास (शासननिर्णया प्रमाणे) नियुक्ती देणेबाबतचा अहवाल प्रशासनास सादर केला आहे. तसेच खालील प्रमाणे अपेक्षीत खर्च असेल.

प्रति शिक्षक ३ तास रु.५४/- प्रमाणे प्रति दिन रु. १६२ X २४ = रु. ३८८८ X९ म.X३४ = रु. ११,८९,७२८/- इतका खर्च अपेक्षीत असेल.

शिक्षण सेवक नियुक्ती करणे ऐवजी महानगरपालिकेची आर्थिक हीत लक्षात घेता घडयाळ तासिकाप्रमाणे एकूण ३४ मानद शिक्षक (३० मराठी माध्यम व ४ उर्दू माध्यम) यांना सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये नविन माध्यमिक शाळा या शिर्षामध्ये तरतुद करुन सदरील ३४ मानद शिक्षकांना घडयाळ तासिकाप्रमाणे करारनामा करुन शिक्षकांची सेवा घेण्याचा सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेची आर्थिक बाब लक्षात घेता महानगरपालिकेस शिक्षकांच्या वेतनासाठी अनुदान प्राप्त होणार नसल्यामुळे गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवाला नुसार घडयाळ तासिकाप्रमाणे एकूण ३४ मानद शिक्षक (३० मराठी माध्यम व ४ उर्दू माध्यम) यांना सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये नविन माध्यमिक शाळा या शिर्षामध्ये तरतुद करुन सदरील ३४ मानद शिक्षकांना घडयाळ तासिकाप्रमाणे करारनामा करुन शिक्षकांची सेवा घेण्याच्या सुधारित प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१०८.</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रदुषण आणी तापमानवाढ हा विषय आता एखादा राज्य, देश किंवा प्रांतापुरता मर्यादित राहिला नसून तो जागतिक प्रश्न बनला आहे. वाढते तापमान आणी त्यामुळे बिघडत चाललेले पर्यावरणाचे संतुलन यावर उपाय सुचविण्यासाठी जागतीक पातळीवर प्रयत्नांची पराकाष्टा होतांना दिसून येते शासकीय स्तरावर याविषयी विविध प्रयत्न होत असतांना आपल्या वसूंधरेच्या संवर्धनासाठी पंचमवेद बालरंगभुमी आणी पीआर इम्पॅक्ट माध्यम व्यवस्थापन संस्थेतर्फे "एक पाऊल वसूंधरेसाठी" या बालनाटयातुन हाच प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

तब्बला सव्वा तालाच्या या प्रयोग असलेल्या बालनाटयात १२ बालकलाकार संदेश देत आहेत याचा उद्देश केवळ आणी केवळ जनप्रबोधन आहे या प्रयोगास प्रायोजकत्व देऊन औरंगाबाद महानगरपालिकेची पर्यावरणाविषयी कटिबध्दता दिसून येईल.

करीता सदरील बालनाटयास औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आर्थीक मदत म्हणून रु.६५,०००/- देणेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन रामकिसन बारवाल अनुमोदक :श्री.घोडिले आनंद राधाकिसन

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पंचमवेद बालरंगभुमी आणी पीआर इम्पॅक्ट माध्यम व्यवस्थापन संस्थेतर्फे "एक पाऊल वसूंधरेसाठी" या बालनाटयास औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आर्थीक मदत म्हणून रु.६५,०००/- देणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०९.</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भारतीय कुस्ती महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील हिंद

केसरी कुस्ती स्पर्धा दि. २८ ते ३१ ऑक्टोबर २०१० या कालावधीत या शहरात आयोजित केलेली आहे. या स्पर्धेचे प्रायोजकत्व महानगरपालिकेने स्विकारावे व स्पर्धेसाठी र.रु.२५ लक्ष अर्थिक मदत देण्यात यावी या स्पर्धेत महानगरपालिकेस मानाचे स्थान देण्याची काळजी कुस्ती परिषदेने घ्यावी करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,

अनुमोदक : श्री.शिंदे राजू रामराव, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.केनेकर संजय किसनराव, श्री.तुपे त्रिंबक गणपतराव, श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ, श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, श्री.ज्ञानेश्वर जाधव, श्री.संजय जोशी, श्री.कैलास गायकवाड, श्री.राजगौरव वानखेडे,श्री.गजानन बारवाल,श्री.जगदीश सिध्द, श्री.मोहण मेघावाले

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भारतीय कुस्ती महासंघाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील हिंद केसरी कुस्ती स्पर्धा दि. २८ ते ३१ ऑक्टोबर २०१० या कालावधीत औरंगाबाद येथे आयोजित केलेली आहे. या स्पर्धेचे प्रायोजकत्व महानगरपालिकेने स्विकारण्यास व स्पर्धेसाठी रक्कम रु.२५ लक्ष अर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.११०.</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८८ मधिल शहनाई मंगल कार्यालया मागील महानगरपालिकेच्या जागेत माजी आमदार मा.श्रीकांतजी जोशी यांच्या निधीमधून हॉल बांधण्यात आलेला आहे. स्व.रज्जुभैय्या व्यायाम शाळा नावाने बांधण्यात आलेल्या या हॉलचा वापर बॅडमिंटन साठी करण्यात येत आहे. तथापि सदरील हॉलपासून महानगरपालिकेस कोणतेही आर्थिक उत्पन्न प्राप्त होत नसल्यामुळे हॉलची देखभाल दुरुस्तीही करता येत नसल्यामुळे सदरी हॉल "आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ" या संस्थेला भाडे तत्वावर चालविण्यासाठी दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न प्राप्त होईल व हॉलची देखभाल दुरुस्ती करणे शक्य होईल करीता सदरील हॉल उपरोक्त संस्थेस भाडे तत्वावर देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.साधना सुरडकर, अनुमोदक :सौ.सविता घडमोडे, सौ.कमलताई नरोटे

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८८ मधिल शहनाई मंगल कार्यालया मागील महानगरपालिकेच्या जागेत माजी आमदार मा.श्रीकांतजी जोशी यांच्या निधीमधून बांधलेला हॉल "आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ" या संस्थेला नियमानुसार भाडे तत्वावर देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१११:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद जिल्हा तलवारबाजी संघटना यांनी निवेदन सादर केले आहे की, महानगरपालिकेच्या सहकार्याने व महापौर चषक राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा आयोजित करण्यात यावी. सदरील स्पर्धेस अंदाजे रक्कम रुपये ६ लक्ष खर्च अपेक्षीत आहे. या स्पर्धेसाठी संस्था ०२ (दोन) लक्ष खर्च करणार आहे व उर्वरीत रक्कम रुपये ०२ (दोन) लक्ष मनपाच्या वतीने खर्च करण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.राजगौरव हरिदास वानखेड,

अनुमोदक :श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.मनिष दहिहंडे, श्री.विरभद्र गादगे

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या सहकार्याने महापौर चषक राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धा घेण्यास तसेच सदरील स्पर्धे करीता रु. ०२ (दोन) लक्ष आर्थिक मदत देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११२.**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२३३/३, दि.२०/१/२००४ अन्वये सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या २०९.८८ हेक्टर क्षेत्राची विकास योजना तयार करणे व त्याच प्रकरणात सुधारित ठराव क्र.१९४/३, दि.१८/२/२००६ सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेला भाग व महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या शिवाजीनगर व इतर भाग औरंगाबाद शहर वाढीव हद्द भागासाठी विकास योजना तयार करण्यासाठी नगररचना विभागाच्या विशेष घटकाची नियुक्ती करण्याबाबत शासनास दि.६/५/२०१० च्या पत्रान्वये विनंती करण्यांत आली आहे.

त्यानुषंगाने संचालक, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.वियोविघ/औरंगाबाद मनपा/अर्थसंकल्प/४६३५.दि.२६/७/२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार सदरील विकास योजना विशेष घटकात खालीलप्रमाणे एकूण १५ अस्थायी पदे आहेत.

उपसंचालक,नगर रचना,विकास योजना, विशेष घटक कार्यालयातील
विविध संवर्गातील पदांचा/वेतनश्रेणीचा तपशिल

| अ. क्र. | संवर्ग | वेतनश्रेणी | ग्रेड पे | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १) | उपसंचालक, नगर रचना | १५६००-३९१०० | ७६००/- | ०१ |
| २) | नगर रचनाकार | १५६००-३९१०० | ५४००/- | ०१ |
| ३) | सहायक नगर रचनाकार | ९३००-३४८०० | ४४००/- | ०२ |
| ४) | रचना सहायक | ९३००-३४८०० | ४३००/- | ०३ |
| ५) | कनिष्ठ आरेखक | ५२००-२०२००<br>९३००-३४८००<br>(५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २४००/-<br>४२००/- | ०२ |
| ६) | अनुरेखक | ५२००-२०२००<br>५२००-२०२००<br>(७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २०००/-<br>२४००/- | ०२ |
| ७) | उच्चश्रेणी लघुलेखक | ९३००-३४८०० | ४४००/- | ०१ |
| ८) | वरिष्ठ लिपीक | ५२००-२०२०० | २४००/- | ०१ |
| ९) | कनिष्ठ लिपीक | ५२००-२०२०० | १९००/- | ०१ |
| १०) | शिपाई | ४४४०-७४४० | १३००/- | ०१ |
| | एकूण पदे :- | | | १५ |

उपसंचालक, नगर रचना यांचे अधिपत्याखाली वरीलप्रमाणे विविध संवर्गातील अस्थायी १५ पदांचे सदरील कार्यालय कार्यान्वित करणे आवश्यक आहे. सदर कार्यालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते,आस्थापनाविषयक येणारा वार्षिक किमान अंदाजित रु.४० लाख खर्च करण्यास व सदर कार्यालयास जागा,वाहन,दुरध्वनी,संगणक,स्टेशनरी, फर्निचर इ.आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास तयार असल्याबाबत महानगरपालिकेची मान्यतेची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेसाठी विविध संवर्गातील १५ अस्थायी पदांचे विकास योजना,विशेष घटक कार्यालय स्थापन करण्यासाठी आस्थापनाविषयक येणारा वार्षिक किमान अंदाजित रु.४० लाख खर्चास व सदर कार्यालयास जागा, वाहन, दुरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इ.आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास मान्यता देण्याबाबत प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२३३/३, दि.२०/१/२००४ अन्वये सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या २०९.८८ हेक्टर क्षेत्राची विकास योजना तयार करणे व त्याच प्रकरणात सुधारित ठराव क्र.१९४/३, दि.१८/२/२००६ सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेला भाग व महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या शिवाजीनगर व इतर भाग औरंगाबाद शहर वाढीव हद्द भागासाठी विकास योजना तयार करण्यासाठी नगररचना विभागाच्या विशेष घटकाची नियुक्तीसाठी विविध संवर्गातील १५ अस्थायी पदांचे विकास योजना, विशेष घटक कार्यालय स्थापन करण्यासाठी आस्थापनाविषयक येणारा वार्षिक किमान अंदाजित रु.४० लाख खर्चास व सदर कार्यालयास जागा, वाहन, दुरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इ.आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.
या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव ,**
महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.
दिनांक १८-०९-२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत.

कारणापुरता उतारा
केवळ कार्यालयीन उपयोगाकरिता

चर्चा

श्री.संजय जोशी :दिनांक १२-८-२०१० रोजी पत्र देवून अग्निशमन विभागाकडे विचारणा केली की या शहरात १५ मीटर पेक्षा उंच इमारती किती अशा इमारतीला आग लागल्यास महापालिकेकडे काय व्यवस्था आहे. व्यवस्था नसल्याचे.उंच शिडी वगैरे घ्याव्या लागणार असे उत्तर मिळाले.जसे सन २०३५ या वर्षापर्यत होणा-या लोकसंख्येला पाणीपुरेल या दृष्टीने समातर लाईन करीत आहोत त्याच प्रमाणे अग्निशमन विभागाच्या बाबतीत श्री.रंगदळ यांनी युनोत भारताचे डिझ ाास्टर मॅनेजमेंन्टचे नेतृत्व केले होते.अशा तज्ञ व्यक्तीला आमंत्रित करून शासनाला विनंती करून त्यांचेकडून शहरातील १५ मीटर पेक्षा जास्त किंवा अशा इमारतीच्या ४ थ्या १० व्या मजल्यावर आग लागल्यास १५ मीटर वरील व्यक्तीला खाली कसे आणायचे यासाठी काय साहित्य लागेल त्यांचेकडून शहराचा सर्वे करून माहिती घ्यावी.जे आवश्यक साहित्य आहे ते नियमानुसार टेंडर वगैरे काढून खरेदी करावे हे करीत असतांना तज्ञ व्यक्ती जे आहे त्यांचे सजेशन घ्यावे.

मा.महापौर :स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी आताच जो मुद्दा मांडला येनो मध्ये ज्यांनी डिझास्टर मॅनेजमेंन्टचे प्रतिनिधीत्व केले असे श्री्.रंगदळ यांना बोलावून अग्निशमन दलाचे काय काय साहित्य पाहिजे कोणत्या स्पेशिफिकेशनमध्ये पाहिजे हे ठरवावे तदनंतरच खरेदी करावे.

नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

महापौर
महानगरपालिका औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.
दिनांक १८-०९-२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत.

कारणापुरता उतारा
केवळ कार्यालयीन उपयोगाकरिता

विषय क्र. ९४ :

| | |
|---|---|
| मा.महापौर | :संबधीत अधिका-यांना सुचना देण्यात येते की टँकरला पिवळा रंग लावावा त्यावर महानगरपालिकेचे नाव लाल अक्षरात ठळक असावे ज्या टँकरवर अशा प्रकारे लिहिलेले नसेल त्यांचेवर कार्यवाही करावी.एकूण टॅकर किती त्यावर किती कर्मचारी आहेत किती लिटर पाणी टँकरद्वारे पुरविले जाते.त्याचा अहवाल माझेकडे प्रशासनाने तात्काळ सादर करावा.गुंठेवारी भागात पाण्याची लाईन टाकत नाही तरी सुध्दा जेथे जेथे पाण्याच्या लाईन टाकलेल्या आहेत परंतु काही ठिकाणी पाणी दिले जात नाही अशा ठिकाणी संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी देणे शक्य असले तर तेथे पाणी देण्याची व्यवस्था करावी |
| मा.महापौर | :गुंठेवारी भागात पाणी देता येत नाही या संबधी सविस्तर अहवाल मागवते व निर्णय देते. |
| मा.महापौर | :पाणी दिल्यानंतर टँकरचे पैसे पण मंजूर करतील.आता समांतर जलवाहिनी सुरू करतोच आहोत संपूर्ण शहराला पाणी देणार आहोत. |
| मा.महापौर | :विषय क्र.९४ मंजूर करण्यात येतो. जेथे जेथे जलवाहिनी टाकलेली आहे परंतु पाणी दिले नाही अशा ठिकाणीची संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी आणि त्या भागात १५-१५ मिनिटे पाणी देण्याची व्यवस्था करावी. |

| नगरसचिव | महापौर |
|---|---|
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
दिनांक १८-०९-२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवत्त.

कारणापुरता उतारा
केवळ कार्यालयीन उपयोगाकरीता

विषय क्र. ९९:

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-औमपा-२०१०/८८३/प्रक्र-१४०/नवि-२४ मंत्रालय मुंबई दिनांक २०.०८.२०१० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम, २३ आणि ३१-अ नुसार स्थायी समितीच्या

रिक्त पदावर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यांसाठी दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड यांची स्थायी समिती वर नामनिर्देशन करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ४५१(१) अन्वये शासनाने निलंबीत केली आहे.

वरील अधिनियमाच्या कलम ४५१(२) नुसार सदर आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस राज्य शासनाकडे यासंदर्भात अभिवेदन सादर करण्यांची तरतुद आहे. तसेच कलम ४५१(३) अन्वये असे अभिवेदन ३० दिवसांच्या मुदतीत शासनास मिळाले नसल्यास शासन त्यावर पुढील निर्णय घेऊ शकते.

दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ शासनाने निलंबीत केल्यामुळे सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार विहीत मुदतीत शासनास महानगरपालिकेचे अभिवेदन सादर करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :श्री.गिरजाराम हाळनोर अनुमोदक :श्री.सुर्यकांत जायभाये,श्री.अनिल जयस्वाल

संवाद:-

श्री.गिरजाराम हळनोर :विषय क्र.९९ या ठिकाणी सभागृहासमोर अभिवेदन मी वाचून दाखवतो.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये अभिवेदन सादर करणे बाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने सविनय अभिवेदन सादर करण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ आणि ३१ -अ अन्वये स्थायी समिती रिक्तपदी निवड/नामनिर्देशीत करण्याबाबत दिनांक १७.०८.२०१० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सदरील विशेष सभेत विषय क्र -६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री कैलास गायकवाड यांना स्थायी समितीवर सदस्य म्हणून महानगरपालिकेने नामनिर्देशित केलेले आहे.

तथापि वरील संदर्भीय शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१० अन्वये स्थायी समितीच्या रिक्त पदावर एका सदस्याचे नामनिर्देशन करणे बाबत औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्र -६३ च्या अनुषंगाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री. कैलास गायकवाड यांना स्थायी समितीवर नामनिर्देशित करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ (१) अन्वये निलंबित केली आहे.

तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४५१ (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे खालीलप्रमाणे अभिवेदन सादर करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ मध्ये शासनास महापालिकेच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वय निलंबित करण्याचा अधिकार आहे. परंतु सदरील श्री. कैलास गायकवाड यांचे नामनिर्देशन हा ठराव किंवा आदेश नसून नामनिर्देशित करण्याचा निर्णय आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ -अ (३) अन्वये पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार श्री राजू शिंदे हे स्थायी समितीचे सभापती झाल्याने व त्यांना काँग्रेसने मतदान केल्याने संख्याबळाच्या प्रश्नांसंबंधी सर्वसाधारण सभेने निर्णय घेऊन श्री. कैलास गायकवाड यांचे नाव स्थायी समितीसाठी नैमत्तिक रिक्त जागेवर निवड /नामनिर्देशन केले आहे. करिता या तरतुदीनुसार महानगरपालिकेस हा अधिकार असून सर्वसाधारण सभेचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम आहे.

तसेच स्थायी समितीची रिक्त जागा भरण्यासाठी नामनिर्देशित करतांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने गटनेता म्हणून मी महापौरांना रितसर बंद पॉकीटातून नाव कळविले आहे. परंतु संयुक्त लोकशाही आघाडीच्या वतीने त्यांचे गटनेता यांनी कोणतेही नाव कळविले नसल्याने व त्यांना सदरील नाव कळविणे बाबत सभा तहकुब करुन १५ मिनिटांचा अवधी सर्वसाधारण सभेतर्फे देण्यात आला होता. तरीसुध्दा ही संधी देऊन संयुक्त लोकशाही आघाडीच्यावतीने उपस्थित असलेले गटनेते श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांनी कोणाचेही नाव कळविले नसल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेता म्हणुन मी मा.महापौरांकडे रितसर नांव बंद पॉकिटामध्ये नियमानुसार स्थायी समितीच्या रिक्त जागेवर श्री. कैलास गायकवाड यांच्या नावाच्या केलेल्या शिफारसीस महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे. हा निर्णय सर्वसाधारण सभेत बहुमताने घेण्यात आलेला आहे. कारण सदरील स्थायी समितीची रिक्त जागा ही नैमत्तिक रिक्त जागा असल्याने व ती दीर्घकाळ रिक्त ठेवणे हे वैधानिक दृष्टया योग्य नसल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गटनेता यांनी केलेल्या नावाच्या शिफारशीस महानगरपालिकेने मान्यता दिली.

श्री.राजु शिंदे :आमच्याकडे जो ठराव आहे त्यात कुठेही हे दिलेले नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :तेच निवेदन मी निर्देशनास आणुन देत आहे.

श्री.राजु शिंदे :विषय ९९ मध्ये पुढील पानावर दिले आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :जे नियमाला अनुसरून आहे सदरील नियुक्ती नामनिर्देशनामुळे शांततेचा भंग व लोकहिताविरूध्द नगरपालिका निधीचा दुरूपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव उदभवत नसल्याने महानगरपालिकेचे कुठलेही म्हणणे विचारात न घेता शासनामार्फत घेण्यात आलेला एकतर्फी निर्णय हा महानगरपालिकेवर अन्यायकारक असून महानगरपालिकेच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१-अ (३) मधील

महानगरपालिकेच्या प्राप्त अधिकाराकडे दुर्लक्षीत करणारा आहे. तसेच दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील स्थायी समिति पदावरील निवड ही निवडणूक प्रक्रियेचाच एक भाग असल्याने सदरील प्रक्रियेमध्ये शासनास हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याने उपरोक्त निलंबन आदेश हा शासनाच्या अधिकार कक्षे बाहेरील असल्याचे सभागृहाचे मत आहे.

श्री.मुजीब खान :जे ही स.सदस्य बोलत आहे. ठराव समोर आहे. त्यासाठी बोलण्याची गरज नाही. १ तास जर ते बोलत राहतील.तर बरोबर आहे का?

श्री.गिरजाराम हाळनोर :त्यानुसार महानगरपालिकेने दिनांक १७.०८.२०१० रोजी स्थायी समितीच्या नैमत्तिक रिक्त जागेवरील नामनिर्देशना संबंधीचा घेतलेला निर्णय हा कायदेशीर असून वैध आहे.

करिता उपरोक्त संदर्भीय शासननिर्णय दिनांक २०.०८.२०१० रोजीच्या अन्वये स्थायी समितीच्या रिक्त जागी नामनिर्देशना संबंधी कार्यवाहीसंबंधीचा निर्णय कलम ४५१ (१) अन्वये शासनाने निलंबित केलेला आहे.

श्री.मुजीब खान :स.सदस्यांना काय म्हणायचे आहे?

श्री.प्रमोद राठोड :मागच्या वेळेला जे काही निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे तो योग्य आहे जो निर्णय निलंबनाचा राज्य शासनाने घेतला तो अतिशय योग्य आहे कारण जे स्थायी समिती सदस्यांचे नामनिर्देशन केले होते ते चुकीचे आहे त्यामूळे आम्ही राज्य शासनाचे स्वागत करतो.

श्री.गिरजाराम हाळनोर : सदरील निलंबन आदेश हा उपरोक्त महानगरपालिकेचे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ (२) चे विहीत मुदतीत सादर केलेल्या अभिवेदनावर विचार करुन व ते मान्य करुन केलेले निलंबन मागे घेण्यात यावे ही विनंती. तसेच दिनांक १७.०८.२०१० रोजी श्री. कैलास गायकवाड यांची करण्यात आलेली नियुक्ती कायम करण्याबाबत मा. राज्यशासनास विशेष अधिकारी नियुक्त करुन तात्काळ महानगरपालिका प्रशासनास कळविण्यात यावे ही विनंती. विशेष दुत पाठवून हे कळविण्यात यावे.

श्री.मुजीब खान :स.सदस्यांना काय म्हणायचे आहे शासनाने जो निर्णय घेतला तो योग्य नाही का

श्री.गिरजाराम हळनोर :स. कैलास गायकवाड यांची नियुक्ती केल्या गेलेली होती आणि त्या आपल्या महानगरपालिकेच्या निर्णयावर शासनाने सदर नियुक्तीचे निलंबन केलेले आहे महानगरपालिकेला राज्य शासनाकडे या संदर्भात अभिवेदन करता येते आणि ते ३० दिवसाच्या आत करावे लागते त्याप्रमाणे आज या ठिकाणी अभिवेदन करण्यात आले आहे ते मंजूर करून शासनास पाठवावे.

याच वेळी डायस समोर स.सदस्य एकत्रित बोलतात.

मा.महापौर :राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे गट नेते श्री. गिरजाराम हाळनोर यांनी स्थायी समिती चे जे ( याच वेळी सभागृहात अनेक सदस्य एकत्रित बोलतात)रिक्त पद आहे त्याचे नियुक्ती प्रकरणी शासनाने निलंबीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने जे अभिवेदन सादर केले त्या अभिवेदनाची जशीच्या तशी इतिवृत्तामध्ये नोंद करून त्याचे रूपांतर ठरावामध्ये करून

तो ठराव /अभिवेदन ठरावात महानगरपालिकेचा निर्णय म्हणून प्रशासनाने तात्काळ आजच्या आज विशेष अधिका-या मार्फत पाठवावा.अभिवेन /ठराव मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रमोद राठोड :आपण चूकीचे वाचत आहेत राज्य शासनाने केलेली कार्यवाही ही योग्य आहे जे करीत आहात महापौर यांचा आम्ही निषेध करतो राज्य शासनाने योग्य निर्णय दिलेला आहे याची नोंद येथे करावी.

श्री.राजू शिंदे :शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आहे.

श्री.प्रमोद राठोड :या ठिकाणी जे नामनिर्देशन सादर करावयाची कारवाई झाली होती स्थायी समिती सदस्यासाठी राज्य शासनाने जो आदेश कार्यवाहीचा दिला तो अतिशय योग्य आहे.

श्री.गिरजाराम हळनोर :आम्ही या ठिकाणी तेच निवेदन केले आहे की, स.विरोधी पक्षाचे जे संयुक्त लोकशाही आघाडीचे गट नेते आहे. त्यांनी नांव सुचवायला पाहिजे होते त्यांनी नांव न सुचविल्यामुळे

याच वेळी मोठमोठयाने स.सदस्य बोलतात....

श्री.प्रमोद राठोड :२६ जुलै २०१० चा शासन जि.आर आहे. जी निवड आपण केली ती त्यानुसार बरोबर नाही.

श्री.गजानन बारवाल :जे आता स.सभागृह नेता यांनी निवेदन केले ते शासनापर्यंत पाठवावे अशी आमची विनंती आहे.

श्री.प्रमोद राठोड :शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य आहे. त्यावेळी यांनी पॉकिट दिले यांनी दिले नाही. त्या ठिकाणी विधी सल्लागार यांनी सल्ला दिला की, आमच्या आघाडीचा खुलासा घ्यायला पाहिजे होता. शासन जी.आर प्रमाणे जो लखोटा सादर केला होता. तो अतिशय योग्य होता.

<u>ठराव:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ अन्वये राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड यांची स्थायी समिती वर नामनिर्देशन करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ४५१(१) अन्वये शासनाने निलंबीत केल्याने व कलम ४५१(२) नुसार सदर आदेशाची प्रत मिळाल्यावर महानगरपालिकेस राज्य शासनाकडे यासंदर्भात अभिवेदन सादर करण्यांची तरतुद असल्याने कलम ४५१ (३) अन्वये दिनांक १७.०८.२०१० रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक ६३ शासनाने निलंबीत केल्यामुळे सदर अधिनियमाच्या तरतुदीनुसार विहीत मुदतीत शासनास महानगर पालिकेचे अभिवेदन श्री.गिरजाराम हाळनोर यांनी स्थायी समितीचे जे रिक्त पद आहे त्याचे नियुक्ती प्रकरणी शासनाने निलंबीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेले अभिवेदन शासनास महानगरपालिकेचा निर्णय म्हणुन प्रशासनाने तात्काळ विशेष अधिकाऱ्यामार्फत पाठविण्यास मंजूरी देण्यात येते.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.